
# कर्मवीर भाऊराव पाटील
## (काल आणि कर्तृत्व)

डॉ. रा. अ. कडियाळ



४

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.



## लेखकाचा संक्षिप्त परिचय

डॉ. रामचंद्र अनंत कडियाळ (एम. ए., एम. एड., पीएच. डी., एलएल. बी.); जन्म पुणे शहरी गंजपेठेत ता. ३ जून १९२४ रोजी. लहानपणीच मातृपितृविहीन झाल्याने सोलापुरी मावशीने सांभाळ केला. प्राथमिक शिक्षण पुणे व सोलापूरी येथे. १९४० साली सातवी पास झाल्यानंतर रयत शिक्षणसंस्थेच्या महाराजा सयाजीराव विद्यालय या पहिल्या माध्यमिक शाळेत दाखल. 'कमवा व शिका' या योजनेनुसार अंगमेहनतीची कामे करून १९४५ साली मॅट्रिक पास. संस्थेच्या पुण्यातील युनियन बोर्डिंग हाऊसमध्ये अंगमेहनतीची कामे करून सन १९५० साली फर्ग्युसन महाविद्यालयातून पुणे विद्यापीठाची बी. ए. (ऑ.) पदवी घेतली. १९५० ते १९६० पर्यंत रयतशिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालयात अध्यापक व मुख्याध्यापक. सन १९५४ साली रयत शिक्षणसंस्थेचे आजीव सेवक. सन १९५५ ते १९६१ सालात अहमदनगर जिल्ह्यात रयत शिक्षणसंस्थेच्या सुमारे १५ शाळा व श्रीरामपूर येथे बोरावके महाविद्यालयाची स्थापना. सन १९६१ ते १९६८ श्रीरामपूर, कऱ्हाड, पंढरपूर येथील

29
A

'महाराष्ट्राचे शिल्पकार'-२

# कर्मवीर भाऊराव पाटील

## (काल आणि कर्तृत्व)

डॉ. रा. अ. कडियाळ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

आवृत्ती पहिली : फेब्रुवारी १९९८

© महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रकाशक :
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ,
मुंबई ४०० ००१

मुद्रक :
मायक्रोग्राफ
रामदूत, २ रा मजला,
डॉ. भालेराव मार्ग, गिरगांव,
मुंबई ४०० ००४.
टेलिफोन : ३८७६९५९/३८८४७३०

किंमत : रु. २३/-

कर्मवीर भाऊराव पाटील यांची प्रेरणा



छत्रपती शिवाजी महाराज



राजर्षि छत्रपती शाहू महाराज



महात्मा गांधी



महात्मा जोतिराव फुले



डॉ. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

कर्मवीर-पिता :
तीर्थस्वरुप पायगोंडा पाटील






मातोश्री गंगूबाई व कर्मवीर आण्णा.

कर्मवीर व सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील.
(१९१४)



कर्मवीर व छ. शाहू बोर्डिंगचे विद्यार्थी.
(१९२६)



तीन कर्मयोगी



कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेमहाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मान्यवर श्री. यशवंतराव चव्हाण व कर्मवीर भाऊराव पाटील.




अहमदनगर जिल्ह्यातर्फे संस्थेस एक लाख रुपये निधी अर्पण सोहळा.



कर्मवीरांच्या उजवीकडे श्री. धनंजयराव गाडगीळ तर डावीकडे
श्री. सी. डी. देशमुख दिसत आहेत.

महात्मा गांधींनी स्वत:च्या हस्ताक्षरात कर्मवीर भाऊराव पाटील
यांना दिलेला अभिनंदनपर संदेश (९-१-१९४८)


श्री भाऊराव पाटिलजी की
सेवा ही उनका सच्चा कीर्ति
स्तंभ है। फिर भी भाईओंने
जो प्रशस्तिकी है वह उनकी
कीर्तिको अनुरूप है। श्री भाऊराव
दीर्घ काल तक सेवा
करते रहें।

मो. क. गांधी

९-१-४८
न. दि.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे हस्ताक्षर.

N. S. KAJROLKAR
PROPRIETOR
STAR OF INDIA DAIRY CO
BOMBAY

TELEPHONE No. 24928

112 MEDOWS STREET FORT
BOMBAY 13-1-1943
१३.१.४३

चि. रा. रा.
ठोंबरे यांस
आशीर्वाद
मी आपल्या[illegible] पांच रुपयांचा
येता नाही काही [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] आहे
[illegible] [illegible] आहे
कळावे हे आशीर्वाद
B P Patil



पुणे विद्यापीठाने कर्मवीर भाऊराव पाटील यांना (ते आजारी असल्याने
ससून हॉस्पीटल, पुणे येथे) डी. लिट्. पदवी प्रदान केली. (५ एप्रिल १९५९).



कर्मवीर भाऊराव पाटील यांची सातारा येथील अंत्ययात्रा
(१० मे १९५९)

# निवेदन

"महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजनेतील हे एक पुस्तक. माणसाला जगायला अन्नाप्रमाणे शिक्षण देखील आवश्यक ठरते. स्वत:ची सर्वप्रकारे प्रगती करून जीवन आनंदमय करायचे तर ज्ञान व परिस्थितीचे भान असायलाच हवे. ते शिक्षणाविना लाभणें कठीणच.

अशा ह्या मौलिक शिक्षणाचा प्रसार सर्वसामान्य जनतेत होणे आवश्यक. हे जाणून ह्या महाराष्ट्रात प्रथम जोतीराव फुले ह्यांनी हे शिक्षण प्रसाराचे व्रत स्वीकारले. त्यांचा वसा पुढे महाराष्ट्रात अनेकांनी घेतला व चालवला. त्यांच्यापैकी कर्मवीर भाऊराव पाटील हे एक अग्रगण्य शिक्षणतज्ज्ञ. त्यांनी "रयत शिक्षण संस्था" स्थापन करून शिक्षण प्रसाराचे सर्वदूर जाळे विणिले.

त्यांच्या काळची परिस्थिती व त्या पार्श्वभूमीवरील त्यांचे कर्तृत्व समाजाला कळावे व कर्मवीर भाऊराव पाटलांचे चरित्र आणि चारित्र्य आदर्श म्हणून लोकांना अवलोकिता यावे या उद्देशाने हे लिहून घेतलेले आहे.

लेखक डॉ. रा. अ. कडियाळ, ह्यांचे मंडळ आभारी आहे. ह्या पुस्तकाचे मुद्रक व मंडळाचे सचिव श्री. चंद्रकांत वडे ह्यांनी हे पुस्तक लवकर व उत्तम प्रकारे निघावे म्हणून बरेच श्रम घेतले आहेत. मंडळ त्यांचेही आभारी आहे.

रसिक ह्याचे स्वागत करतील ही मनीषा.

डॉ. मधुकर आष्टीकर
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

दिनांक १३ फेब्रुवारी, १९९८

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | अव्वल इंग्रजीतील महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती | १ |
| २. | जन्म, बाळपण, परंपरा व संस्कार | ८ |
| ३. | भाऊरावांचे शिक्षण व जडणघडण | १४ |
| ४. | उपजीविकेच्या शोधात | २२ |
| ५. | संस्थानी पोलिसांच्या विळख्यात | ३० |
| ६. | स्वदेशी उद्योजकांच्या सहवासात | ३८ |
| ७. | अक्रोडाची फळे | ४७ |
| ८. | रयत शिक्षण संस्थेची घटना व प्राथमिक कार्य | ६२ |
| ९. | शिक्षणातील प्रयोग | ७६ |
| १०. | भाऊरावांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान | ९७ |
| ११. | रयत शिक्षण संस्थेची अर्थव्यवस्था | १०६ |
| १२. | भाऊरावांच्या कर्तृत्वाचा सन्मान | ११२ |
| १३. | भाऊरावांचे कुटुंबीय | १२९ |
| | संदर्भ ग्रंथसूची | १३६ |

## प्रकरण पहिले

# अव्वल इंग्रजीतील महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती

१) आपले चरित्रनायक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बाळपणी व तारुण्यात महाराष्ट्रात सामाजिक परिस्थिती कशी होती याचा मोजका आढावा घेऊन त्यांच्या कार्य व कर्तृत्वाकडे वळणे उचित ठरेल.

२) सन १८७० च्या सुमारास ब्रिटिश राजसत्तेची पाळेमुळे भारतात व महाराष्ट्रात खोलवर रुजली होती. त्यास पुढील कारणे प्रमुख होती : १) इंग्रजांचे अजिंक्य आधुनिक सैन्यबळ. (२) प्रमुख धर्मातील लोकांत 'फोडा व झोडा' नीतीचा अवलंब. (३) एतद्देशीय संस्थानिकांना करारमदाराने जखडून ठेवून गुलाम केलेले होते. (४) आधुनिक सुधारणांनी व इंग्रजी न्यायपालिकेच्या प्रस्थापनेने सामान्य लोकांना दीपविले. (५) पाश्चात्य शिक्षण देऊन भारतीय तरुणांना इंग्रजी राज्यकारभारात नोकऱ्या देण्याची सोय. (६) शास्त्री, पंडित तसेच मुल्ला, मौलवींना व संस्कृत, अरबी व पर्शियन भाषांच्या पाठशाळांना मदत देऊन त्यांचा विरोध बोथट केला.

३) महाराष्ट्रात सत्तास्थानी असलेल्या व सत्तेपासून पराभूत झालेल्या ब्राह्मणांची तरुण पिढी पाश्चात्य शिक्षणाचा लाभ मिळाल्याने इंग्रजी राज्यास वरदान मानून इंग्रजांची सेवा करण्यात रमली होती. मात्र वर्णाश्रम व्यवस्थेस चिकटून होती. १८५७ च्या समराच्या खुणा बुझल्या होत्या. लोकहितवादी गोपाळराव देशमुख, न्यायमूर्ती रानडे, प्राचार्य आगरकर

आदी ब्राह्मण समाजसुधारक नेते ब्राह्मणवर्गात सामाजिक सुधारणांची चळवळ चालवीत असले तरी मनुवादी सनातनी ब्राह्मण पुरोहित वर्गापुढे ते हतबल होते. या पुरोहितांनी बहिष्काराचे हत्यार उचलताच हे सुधारक प्रायश्चित्त घेत व त्यांना शरण जात. यास लोकमान्य टिळकसुद्धा अपवाद नव्हते.

४) सनातनी ब्राह्मणवर्ग वर्णाश्रम व्यवस्थेस चिकटून आपली संस्कृत विद्या किंवा पाश्चात्त्य शिक्षण ब्राह्मणांखेरीज इतरांत झिरपू देण्यास तयार नव्हते. इंग्रजी शिक्षणाचा स्वत: लाभ घेऊन इंग्रजी शासनातील नोकऱ्या स्वत:साठी कशा राहतील याचा ते प्रयत्न करीत होते. त्यामुळे इंग्रजी शासनातील कायदे अम्मलबजावणीची सत्ता त्यांचेच हाती होती. **शेतकऱ्यांच्या कैफियती** 'ओरिएन्टल ट्रान्सलेटर' नावाचा ब्राह्मणापैकी जो एक वर्ग होता तो ब्राह्मणांना अनुकूल अशा पद्धतीने इंग्रजी भाषेत वरिष्ठांना सादर करी. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळणे कठीण असे. खेड्यापाड्यांतील गरीब जनतेस व शेतकऱ्यांना त्यांच्या जुलमास शरण जावे लागे. सन १८७५ च्या सुमारास निघालेल्या आर्यसमाज, ब्राह्मो किंवा प्रार्थना समाज, थिओसॉफिकल सोसायटी आदी धार्मिक सुधारणा करणाऱ्या संस्थांचे कार्य इंग्रजी शिक्षणाचा लाभ झालेल्या सुशिक्षितांपुरतेच मर्यादित होते.

५) ब्राह्मणाखेरीज, तुरळक ब्राह्मणेतर सोडल्यास, सारा महाराष्ट्रीय समाज शिक्षणाच्या दृष्टीने अज्ञानांधकारात बुडालेला होता. ख्रिश्चन धर्मप्रसाराचा हेतू मनात ठेवून फक्त परदेशी किंवा एतद्देशीय ख्रिश्चन मिशनरी संस्थाच अस्पृश्यासह शूद्र समजल्या जाणाऱ्या लोकांत शिक्षणाचा प्रसार करीत होत्या. इंग्रजांच्या मदतीने सावकारी करणारे ब्राह्मण, शेतकऱ्यांना नाडणारा ब्राह्मण पुरोहित, ब्राह्मण कुळकर्णी व कोर्टातील ब्राह्मण कारकून व शिरस्तेदार यांच्या मदतीने अडाणी शेतकऱ्यांच्या जमिनी लाटून गबर झालेला ब्राह्मण जमीनदार या सर्वांच्या गुलामगिरीत सारी ग्रामीण अडाणी जनता राबत होती.

६) ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत शिक्षण घेऊन शूद्र, अतिशूद्र,

अस्पृश्य आदी ग्रामीण व शहरी जनतेत शिक्षणाचा प्रसार करण्याचे महात्मा जोतीराव फुल्यांनी १८४८ साली ठरविले. शिक्षणाबरोबरच इतर सुधारणा करण्याचे योजिले. याच साली ब्राह्मण मित्राच्या लग्नात सनातनी ब्राह्मणांनी त्यांचा शूद्र म्हणून अपमान केल्याने साऱ्या हिंदू धर्मग्रंथांच्या अभ्यासाकडे त्यांचे लक्ष वळले. ब्राह्मणांखेरीज इतरांना आपल्या गुलामगिरीत ठेवण्यासाठी या धर्मग्रंथांची रचना आहे, हे त्यांच्या लक्षात आल्यावर शूद्र व अतिशूद्रांत शिक्षणप्रसार व ब्राह्मणासह सर्वांत सामाजिक सुधारणा यासाठी म. फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी केली. व सनातनी कर्मठ ब्राह्मण पुरोहितवर्गाच्या ब्राह्मण्याविरुद्ध लढ्याचे रणशिंग फुंकले आणि अर्वाचीन काळातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादास सुरुवात झाली.

७) बहुजनसमाजातील भेदाभेद, शिवाशिव अमंगळ आहे हे दाखवून त्यांच्यात एकी घडविण्याचा म. फुल्यांनी प्रयत्न केला. ब्राह्मणांतील केशवपन चाल, भ्रूणहत्या याविरुद्ध बंड करून ब्राह्मणांकडूनच स्वत:च्या स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची जाणीव त्यांना करून दिली. शिक्षणासह विविधांगी सामाजिक सुधारणांचा पाया घातला. सनातनी पुरोहितवर्गामुळे समाज दुभंगतो म्हणून त्यांच्यावर महात्मा फुल्यांचा विशेष राग होता.

८) सन १८८५ साली राष्ट्रीय सभेची स्थापना झाली, ती उच्चवर्णीयांच्या अडचणी सोडवून घेण्यासाठी होती. सुशिक्षित उच्चवर्णीय लोकांच्या मोजक्या प्रतिनिधींची ती संघटना होती, असे सी. वाय्. चिंतामणीनी ('इंडियन पॉलिटिक्स सिन्स दि म्युटिनी) बंडानंतरचे राजकारण (१९३७) या ग्रंथात (पृ. ४-५, १७, ४३) म्हटले आहे. तिचा हेतू सनदशीररीत्या इंग्रज शासनात उच्चवर्णीय सुशिक्षितांना स्थान मिळविणे व शेवटी भारतात ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतीचे स्वातंत्र्य मिळविणे हा होता. या सभेस जोडून न्यायमूर्ती रानडे आदींनी सामाजिक परिषद भरविण्यास सुरुवात केली होती. पुढारलेल्या वर्गातच सामाजिक सुधारणा करण्याचा तिचा मर्यादित हेतू होता.

९) लोकहितवादी गोपाळराव देशमुख, न्यायमूर्ती रानडे, प्राचार्य गोपाळ गणेश आगरकर आदी सुधारक दिवंगत झाल्यानंतर नामदार गो. कृ. गोखले, नामदार फेरोजशहा मेहता यांच्या हाती राष्ट्रीय सभा आल्यानंतर काही काळ सनदशीर राजकारण व समाजकारण चालले. सुरत काँग्रेसनंतर लोकमान्य टिळक आदी जहालांच्या हाती राष्ट्रीय सभेची सूत्रे गेल्यानंतर सामाजिक परिषदा भरविण्याचे थांबले. तत्पूर्वी सन १८९० साली महात्मा फुल्यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे काम थांबले. १८९५ ते १८९७ मधील पुण्यातील प्लेगही त्यास कारणीभूत आहे. सत्यशोधक समाज अनुयायांना एकत्र बांधून ठेवणारा प्रभावी नेताच महात्मा फुल्यानंतर नव्हता.

१०) दक्षिणेतील, विशेषत: महाराष्ट्रातील संस्थानी जनताच नव्हे तर संस्थानिकही त्यांच्या संस्थानातील सनातनी ब्राह्मण व पुरोहितवर्गाच्या वर्चस्वापुढे हतबल होते. त्यातूनच सन १८९९ च्या सुमारास कोल्हापूर संस्थानात वेदोक्त प्रकरण उपस्थित झाले. संस्थानातील राजोपाध्यांनी व त्यांच्या नोकर पुरोहिताने छत्रपती शाहू महाराजांना पंचगंगा नदीवर स्नान करताना शूद्र संबोधून वेदोक्त मंत्र म्हणण्यास नकार दिला. राजघराण्यातील देवदेवतांच्या पूजाविधी वेदोक्त पद्धतीने करण्याचे राजोपाध्यांनी नाकारिले. राजोपाध्ये हे महाराजांचे खाजगी नोकर. त्यांचा उद्धटपणा महाराजांना झोंबला, आणि कोल्हापूर संस्थानात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादास सुरुवात झाली. त्यानंतर १९०२ साली शाहू महाराजांनी संस्थानी नोकऱ्यांत मागासलेल्या संस्थानी लोकांसाठी ५०% जागा राखीव ठेवल्याचे फर्मान इंग्लंडमधूनच काढले. त्यामुळे पुरोहितासह ब्राह्मणमंडळी व ब्राह्मणी वृत्तपत्रे छत्रपती शाहू महाराजांवर कठोर टीका करू लागली. बडोद्यातही यापूर्वी वेदोक्त प्रकरण झाले होते; पण सयाजीराव महाराजांनी त्यास फार महत्त्व दिले नाही. शाहू महाराजांनी राजोपाध्यास स्वत:ची चूक सुधारण्याची संधी देऊनही ते ताठ राहिल्यावर शाहू महाराजांनी राजोपाध्ये या वृत्तीसाठी दिलेल्या जमिनी जप्त केल्या.

११) लोकमान्य टिळकांनी राजोपाध्यांना चूक सुधारण्यास सल्ला

देण्याऐवजी शाहू महाराजांनाच दूषण दिले आणि केसरीत 'मराठे आणि वेदोक्त कर्म' हा लेख लिहून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात तेल ओतले. कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याविषयी महाराष्ट्रातील मराठे आणि बहुजनसमाजात आदर असल्याने महाराष्ट्रातील ब्राह्मण व ब्राह्मणेतर यामध्ये एक प्रकारची तेढ निर्माण झाली.

१२) सन १९०१ पासून पुण्यातील सत्यशोधक समाजाचे अनुयायी व कोल्हापूरस्थित भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, महादेव गणेश डोंगरे, गणपतराव कदव वकील, हरिभाऊ चव्हाण आदींनी मुंबईच्या व कोल्हापूरच्या 'दीनबंधू' पत्रातून कोल्हापूरच्या महाराजांच्या समर्थनार्थ लेख लिहिले. ब्राह्मणांच्या टीकेस तोंड देण्यासाठी या ब्राह्मणेतरांनी वृत्तपत्रे सुरू केली व सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरविले. शाहू महाराजांचे महात्मा फुल्यांच्या विचाराकडे मन वळवून १ जानेवारी १९११ रोजी कोल्हापुरात शाहू सत्यशोधक समाज स्थापण्यात आला. या पुनरुज्जीवित सत्यशोधक समाजाची पहिली परिषद याच साली पुण्यात श्री. रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली. त्याबरोबर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचेही पुनरुज्जीवन झाले. अशा पार्श्वभूमीवर कोल्हापुरात भाऊराव शिक्षण घेत होते, कोल्हापुराशी संबंध ठेवून होते.

१३) महाराष्ट्रातील एक प्रागतिक विचारवंत डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादासंबंधाने गं. बा. सरदार यांनी संपादित केलेल्या 'महाराष्ट्र जीवन' या ग्रंथात, (१९६० पृ. ३१३-१४) अतिशय मार्मिक विवेचन केले आहे ते पाहू या. डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात,

"लोकहितवादी, रानडे व आगरकर यांनी समतेचे जे तत्त्वज्ञान सांगितले व समाजसुधारणेची जी इतर तत्त्वे सांगितली त्या अन्वये ब्राह्मणांची मन:क्रांती झाली असती तर हा अनर्थ (ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद) बव्हंशी टळला असता असे वाटते. पण तसे झाले नाही. ब्राह्मण हा राजकीय क्रान्तीला उन्मुख झाला. त्या क्रांतीसाठी त्याग, तपश्चर्या, देहदंड व आत्मबलिदान हे मोल देण्यास तो सिद्ध झाला. पण वर्णाभिमान, जातीय

श्रेष्ठतेचा अहंकार नष्ट करून बहुजनसमाजाशी एकरूप होण्यास मात्र तो त्यावेळी सिद्ध झाला नाही. खेड्यापाड्यांतील ब्राह्मण हा वरील श्रेष्ठ गुणांनी संपन्नही नव्हता. सावकार, कुलकर्णी व भिक्षूक ही त्रयी खेड्यापाड्यांतील ब्राह्मणेतर समाजापुढे नित्य उभी होती. तिच्या अंगी कसलेही श्रेष्ठ गुण नव्हते. शुचिता, परोपकार, विद्योपासना, भूतदया, त्याग व समाजहितबुद्धी या गुणांचा लवलेशही तिच्या ठायी नव्हता. स्वार्थ, लोभ, पापवासना, असत्य, अमंगळवाणी, कारस्थानीवृत्ती हे सर्व तामसी गुण तिच्या ठायी ओतप्रोत होते आणि असे असूनही 'आम्ही ब्राह्मण सर्व वर्णांचे गुरू आहोत, ब्राह्मणेतरापेक्षा श्रेष्ठ आहोत' असा अहंकाराचा उग्र दर्प अगदी दुर्गंधी येण्याइतपत त्यांच्या ठायी होता. हळूहळू जागृत होणाऱ्या ब्राह्मणेतरांना हा जातीय श्रेष्ठतेचा जुलूम असह्य वाटू लागला. ब्राह्मणांच्या जातीय श्रेष्ठतेच्या भावनेचा त्यांना संताप येऊ लागला. त्यातच वकील, सावकार, कुलकर्णी हा वर्ग इंग्रजी राज्याच्या भक्कम चौकटीच्या आश्रयाने श्रीमंत झाला आणि शेतकरी असह्य कर्जाच्या ओझ्याने दरिद्री होत चालला. त्यांच्या जमिनी हळूहळू वरील तिघांच्या घरात गेल्या. हे सर्व कायद्याच्या आश्रयानेच चालले होते. आणि या कायद्याची अंमलबजावणी करणारे न्यायाधीश, शिरस्तेदार, मामलेदार, फौजदार, बेलीफ हे सर्व बहुधा ब्राह्मणच होते. त्यामुळे आपली सर्व बाजूंनी नागवणूक करून, आपली अन्नान्नदशा करून टाकण्यास हा ब्राह्मण कारणीभूत आहे असा दृढसमज बहुजनसमाजाच्या मनात घर करू लागला व इथे (महाराष्ट्रात) ज्ञातीय कलह निर्माण झाला."

१४) फक्त प्राथमिक शिक्षण क्षेत्राचा विचार केल्यासही असे दिसून येते की, सन १९२० पूर्वीच्या खाजगी किंवा शासकीय शाळात ब्राह्मण शिक्षक व ब्राह्मण विद्यार्थ्यांचाच भरणा असे. अपवादात्मक इतर समाजाची मुले असत. खेड्यांतील प्राथमिक शाळेत सामान्यपणे ब्राह्मण शिक्षकच असत. त्या खेड्याचे बरेवाईटपण या ब्राह्मण शिक्षकांवरच असे. म्हणून महात्मा फुल्यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथाच्या इंग्रजी प्रस्तावनेच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे, "Let there be schools for the

Shudras in every village; but away with all Brahmin school masters." प्राथमिक शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या मराठी सातवीतील ब्राह्मणेतर मुलांचे भवितव्य या ब्राह्मण शिक्षकावर, त्याची शाळा तपासणाऱ्या ब्राह्मण डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर व मराठी ट्रेनिंग कॉलेजच्या ब्राह्मण प्राचार्यावर अवलंबून असे. त्यांच्या एकत्रित शिफारशीवर व निवडीवर तो शिक्षक होऊ शके. या अधिकाऱ्यांच्या ब्राह्मण स्वयंपाक्याची संहजपणे निवड होई, असे डॉ. डी. सी. पावट्यांनी आपल्या 'मेमोआयर्स ऑफ ॲन एज्युकेशनल ॲडमिनिस्ट्रेटर' (१९६४) या आत्मवृत्तात म्हटले आहे. (पृ. १२०-१२२ व १५०-१५३). कोल्हापुरात शाहू महाराजांनी सन १९०२ पासून प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृहे व खेड्यातून प्राथमिक शाळेत ब्राह्मणेतर शिक्षक नेमण्यास सुरवात केली. अस्पृश्यांसाठी अधिकच्या शाळा सुरू केल्या. नंतर त्या बंद करून सवर्णांच्या शाळेतच त्यांना प्रवेश देण्यास शाहू महाराजांनी आदेश दिले. पाणवठे, धर्मशाळा इत्यादी त्यांना खुल्या केल्या. या सर्व बाबी ब्राह्मणांच्या डोळ्यास रांजणवाडीप्रमाणे खुपत होत्या. अशा सामाजिक परिस्थितीचा भाऊरावांवर परिणाम झाल्याखेरीज कसा राहील?

■

## प्रकरण दुसरे

# जन्म, बाळपण, परंपरा व संस्कार

*धन्य ते कूळ। धन्य ती माता।।*
*जिने प्रसविला। ऐसा पुत्रदाता।।*
*– अनंतसुत*

१) स्वातंत्र्यपूर्व कोल्हापूर संस्थानातील हातकणंगले तालुक्यात कुंभोज नावाचे गाव आहे. या गावी हिंदू पंचांगाप्रमाणे आश्विन शुद्ध ललितापंचमी शके १८०९ अथवा इंग्रजी सालगणनेप्रमाणे २२ सप्टेंबर १८८७ या तारखेदिवशी आपले चरित्रनायक कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म झाला. पाळण्यातले नाव भाऊ. मोठेपणी लोक त्यांना आदराने भाऊराव असे म्हणत. श्री. पायगौंडा देवगौंडा पाटील (१८५९-१९४२) व सौ. गंगाबाई या दाम्पत्याच्या पोटी जन्मास आलेल्या व जगलेल्या मुलांपैकी भाऊराव हे ज्येष्ठ पुत्र. भाऊरावांना तात्या, बाळगौंडा ऊर्फ बळवंत व बंडेंद्र ऊर्फ बंडू हे तिघे लहान भाऊ आणि ताराबाई व द्वारकाबाई या दोन लहान बहिणी होत्या.

२) 'भाऊराव म्हणजे भांगेतील तुळस नसून धर्मवीर पूर्वजाचे कर्मवीर वंशज' असे रास्तपणे दुधगावचे भाऊ दादा कुदळे आपल्या लेखात म्हणतात. (कर्मवीर भाऊराव पाटील गौरव विशेषांक : ग्रामोद्धार, सन १९४८, पृष्ठ ३१-३५) भाऊरावांच्या या पाटील घराण्याच्या मूळ पुरुषाचा संबंध कोल्हापूर संस्थानातील नांदणी येथील जैन मठ, ता. शिरोळशी होता. भाऊरावांच्या घराण्यास दिगंबर जैन मुनींची परंपरा लाभलेली आहे. त्यांचे दोन पूर्वज नेमगौंडा व शांतनगौंडा निर्ग्रंथ जैन मुनी होते. नांदणी जैन मठाचे ते पीठाचार्य होते. त्या उभयतांना

जिनसेन भट्टारक पट्टाचार्य ही बिरूदावली होती. नेमगौंडा आचार्य सन १८२० साली भिलवडी, ता. तासगाव, जिल्हा सांगली येथे, तर शांतनगौंडा आचार्य नांदणीसच १८५४ साली समाधिस्त झाले. दरसाल चैन शुद्ध पंचमीस नेमगौंडा आचार्यांच्या स्मृतीदिनी भिलवडीस यात्रा भरते. या पाटील घराण्याकडे महाराष्ट्रीय समाज मोठ्या आदराने आजही पाहतो. त्यास ही मुनी परंपरा व भाऊरावांचे अर्वाचीन काळातील ऋषितुल्य जीवन व अतुलनीय शैक्षणिक व सामाजिक कार्य कारणीभूत आहे.

३) भाऊरावांचे आजोबा देवगौंडा ज्योतीगौंडा पाटील सातारा जिल्ह्यातील ऐतवडे बुद्रुक विड्याच्या पानासाठी व केळ्यासाठी प्रसिद्ध असलेल्या गावी शेती करून राहात होते. त्यांचा या नांदणी मठाशी जवळचा संबंध होता. हे पाटील घराणे शिक्षणाकडे कसे वळले त्यास एक मर्मभेदी घटना कारणीभूत आहे. देवगौंडा पाटील अतिशय व्यवहारचतुर होते. पण ते अक्षरशून्य होते. त्यांच्या मातोश्रीने नांदणीच्या मठासाठी आपल्या नातवास पायगोंडा पाटलास पीठाचार्य पदासाठी देण्यास नकार दर्शवून त्यास बालवयात उसाच्या फडात लपवून ठेवले होते. पायगौंडा पाटलाऐवजी जे पीठाचार्य झाले त्यांनी देवगौंडा पाटलांना कमीत कमी या मठाचे मानसेवी कारभारी होण्यास भाग पाडले. या मठाच्या पंच मंडळींपैकी देवगौंडा प्रमुख होते. सन १८७३ मध्ये एके समयी या मठात पंचांनी केलेल्या न्यायनिवाड्यावर सही करण्याची पाळी या देवगौंडा पाटलावर आली. अक्षरशून्य असल्याने त्यांनी शिष्टाचार सांगितला की, ऐतवड्याची त्यांच्यापेक्षा वडीलधारी मंडळी हजर असताना लहानांनी सही करू नये. लघुशंकेस जाण्याचे निमित्त करून त्यांनी आपणास व आपले अक्षरशत्रुत्वास झाकून ठेवले. ही मानहानी त्यांना खोलवर काट्याप्रमाणे बोचत राहिली. आपल्या वाट्यास आलेली मानहानी आपल्या मुलास येऊ नये म्हणून, दस्तऐवज पुरा होताच ते ऐतवडे बुद्रुकला घोड्यावरून परत आले. शेतात काम करीत असलेल्या आपल्या मुलास- -पायगौंडास तात्काळ बोलावून घेतले. दुसऱ्या दिवशी सव्वालाखी अष्टे या वाळवे तालुक्यातील प्राथमिक शाळेत पायगौंडास वयाच्या चौदाव्या वर्षी

शिकावयास घातले. याच साली महात्मा फुल्यांनी पुण्यात शैक्षणिक व सामाजिक सुधारणेसाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. योगायोग आहे. या पायगौंडाच्या पोटी जन्मास आलेल्या भाऊरावांनी महात्मा फुल्यांच्या सामाजिक व शैक्षणिक सुधारणेचा वारसा अत्यंत प्रभावीपणे पुढे चालविला.

४) पायगौंडा पाटील वयाच्या एकविसाव्या वर्षी मुलकी (सातवी) परीक्षा पास झाले. सुदैवाने तत्कालीन इंग्रजी राज्याच्या महसूल खात्यात कारकून म्हणून कामास लागले. ऐतवडे बुद्रुक गावच्या चतुर्थ जैन शेतकरी समाजातून मुलकी परीक्षा पास होणारे ते पहिले गृहस्थ होते. या नोकरीतून सन १९१४ साली त्यांनी स्वेच्छा निवृत्ती पत्करली. त्यासही कारण घडले ते त्यांच्या निर्लोभी व स्वाभिमानी स्वभावाचे द्योतक आहे. वयोमानाप्रमाणे पायगौंडा पाटलांना किंचित कमी ऐकू येऊ लागले होते. कोरेगावी असताना त्यांचे अधिकारी होते काळे नावाचे मामलेदार. एके दिवशी मामलेदारांनी काही कागद मागितले. पायगौंडा पाटलांना ते नीट ऐकू गेले नाही. तेव्हा मामलेदार चिडून पायगौंडांना म्हणाले, "पायगौंडा पाटील, तुम्हांस कमी ऐकू येते. तुम्ही अनफीट आहात. तात्काळ निवृत्त व्हा!" पायगौंडा पाटील अतिशय कामसू, प्रामाणिक व पक्क्या इराद्याचे गृहस्थ होते. त्यांनी लगेच सेवानिवृत्तीचा अर्ज दिला. काळे मामलेदर चकित झाले. पायगौंडा पाटलांनी अर्ज मागे घ्यावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. पण व्यर्थ! निवृत्तीनंतर काही काळ पायगौंडा पाटील कोरेगावलाच थांबले. नव्हे कोल्हापुरातील डांबर प्रकरणामुळे त्यांना थांबावे लागले.

५) श्रमण परंपरेतील जनसेवेत रत असलेल्या जैन घराण्यात पायगौंडाचा जन्म झालेला. जैन समाजातील मुलकी परीक्षा पास झालेले ते पहिले तरुण, त्यातून सरकारी नोकरीत. कुंभोजच्या जिनगौंडा पाटलास गंगाबाई नावाची एकुलती एक सुंदर, शरीराने दणकट व धाडसी अशी मुलगी होती. तिच्यासाठी वर म्हणून या पायगौंडा पाटलास पसंत करण्यात आले. यथाकाल लग्न झाल्यानंतर सौ. गंगाबाईंच्या पोटी २२ सप्टेंबर १८८७ रोजी भाऊरावांचा जन्म झाला. वयाच्या आठ वर्षापर्यंतचे

भाऊरावांचे बालपण कुंभोजलाच आजोळी गेले. त्यास मुख्य कारण दिसते ते हे की, पिलिवच्या घाटात रोड कारकून म्हणून पायगौंडा पाटलांना काम करीत असताना झोपडीत राहावे लागे. भाऊराव या बालकास झोपडीत सुरक्षितता नसे. रात्रीच्या वेळी लांडगे व कोल्हे या रानटी जनावरांचा झोपडीभोवती उपद्रव होत असे. सौ. गंगाबाई अतिशय धीट व धाडसी असल्याने या रानटी जनावरांना त्या हुसकून लावीत. बाल भाऊरावाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आजोळीच त्यास ठेवणे सौ. गंगाबाईने पसंत केलेले दिसते. या बालवयात भाऊरावावर आजोळी काही अति महत्त्वाचे संस्कार झाले ते असे :

६) भाऊराव आजोळी अति लाडका असल्याने त्याच्या खेळण्याहुंदडण्यास प्रतिबंध नसे. वयाच्या आठव्या वर्षी भाऊरावास दहीवडीच्या मराठी शाळा नं. १ मध्ये बिगरीत दाखल केल्याचे दिसते. कारण ता. १०-२-१८९६ रोजी भाऊराव पहिलीत गेल्याचे या शाळेच्या दप्तरी नोंद आढळते. पुढील शिक्षणासाठी भाऊरावास आपल्या वडिलांच्या बदलीबरोबर विटे, कराड, इस्लामपूर इत्यादी तालुक्यांच्या गावी हिंडावे लागले. लाडावलेला असल्याने त्याच्या अभ्यासावर फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. भाऊरावाचे लक्ष अभ्यासापेक्षा खेळण्यात व हुंदडण्यात अधिक होते. सुट्टीत आजोळी आल्यावर भाऊराव मित्रांना जमवून नदीत पोहण्यास किंवा जवळच्या बाहुबलीच्या डोंगरावर भटकण्यास जात असे. नदीतील सुसरीची किंवा डोंगरावरील जनावरांची त्यास भीती नसे. वयाच्या मानाने भाऊराव अंगापेराने इतर मुलांपेक्षा मोठा व दणकट दिसत असल्याने मुलांचा तो नैसर्गिक म्होरक्या असे. भाऊरावाचे चौघे मामा - अण्णा, अप्पा, बाळगोंडा व पारिसा ऊर्फ पार्श्वगोंडा व आजोबा जिनगौंडा धीट, धाडसी व बंडखोर होते. विशेषत: चौगुल्यांचा मुजोरपणा त्यांना खपत नसे. या मामांच्या शेतावर एक सत्याप्पा भोसले आश्रयास येत असे. त्या सत्याप्पाने या चौगुल्यास कुऱ्हाडीने तोडले व फरारी झाला. कारण घडले की, एका गरोदर महार स्त्रीने चौगुल्याच्या कुंपणाच्या चार काटक्या घेतल्या. या चौगुल्याने या गरोदर स्त्रीस बेदम मार दिला. सत्याप्पास ते सहन झाले

नाही. गोरगरीबांचा कैवारी, अस्पृश्य समाजाचा सहाय्यकर्ता अशी त्याची ख्याती होती. फरारी असताना हा वारणेचा वाघ भाऊरावाच्या मामांच्या आश्रयास रात्री शेतावर येत असे. सत्याप्पा आपल्या पराक्रमाच्या व धाडसाच्या गोष्टी बाळ भाऊरावास सांगत असे. नकळत भाऊरावावर सत्याप्पाच्या धाडसाचे, गोरगरीबांविषयी त्यास असलेल्या सहानुभूतीचे व विशेषत: अस्पृश्य लोकांवरील श्रीमंताच्या अन्यायाची त्यास असलेल्या चिडीचा भाऊरावावर परिणाम होई. मूळात भाऊरावाच्या ठिकाणी असलेल्या निर्भय वृत्तीस व धाडसास खतपाणी मिळत गेले. मामांच्या ठिकाणी असलेली बंडखोर वृत्ती व सत्याप्पा भोसलेची गरीबांविषयीची कणव बालवयातच भाऊरावात झिरपत होती.

७) मोठेपणी भाऊराव स्वत:विषयी म्हणत, "माझ्या मानसिक घडणीस, लौकिकास व यशास माझ्या पूर्वजांकडून मिळालेल्या दोन गुणांचा वारसा कारणीभूत आहे. ते गुण म्हणजे संन्यस्त निरिच्छ वृत्ती व बंडखोरपणा." आपल्या विद्यार्थ्यांना ते म्हणत, "डोळ्यादेखत अन्याय दिसत असताना त्यास अन्याय म्हणत नाही व त्याचा प्रतिकार करीत नाही तो माझा विद्यार्थी नव्हे." हे मात्र खरे, की त्यांचे सारे जीवन या दोन गुणांचा आविष्कार आहे. या गुणांत भर पडली ती त्यांच्या अव्यभिचारी ध्येयनिष्ठेची. त्यासाठी केढाही मोठा त्याग करण्याची त्यांच्या मनाची तयारी होती. भाऊरावांच्या संन्यस्त वृत्तीस झालर आहे ती प्रेमाची, स्वार्थत्यागाची, हिशेबीपणाची, साधेपणाची आणि दीनदलिताविषयी करुणेची.

८) त्यांचा संन्यस्त निरिच्छपणा स्वत:च्या आध्यात्मिक प्रगतीसाठी किंवा स्वत:च्या पारलौकिक सुखासाठी नव्हता. त्यांचा निरिच्छ स्वार्थत्याग समाजाच्या कल्याणासाठी होता. मूळ जैन धर्मांत असलेल्या सत्य आणि अहिंसेची जाण त्यांच्या घराण्यातील आचार्य परंपरेतून त्यांच्या ठिकाणी आली होती. साधेपणाचे, करुणेचा व चतुर्विध दानाचा उगमही तेथेच आहे.

९) जैन समाज अतिशय कर्मठ, अस्पृश्यांच्या संसर्गातून शिवाशिव किंवा विटाळाच्या रूढी पाळणारा. खुद्द मातोश्री सौ. गंगाबाई

सोवळेओवळे पाळीत. बालवयात कुंभोजला शेतीवर काम करणाऱ्या महारांच्या मुलांना खेळण्यास घेण्यास भाऊरावांना संकोच वाटत नसे. कारण अस्पृश्यांना शिवलेल्या सत्याप्पा भोसलेचा मामांना विटाळ वाटत नसे. प्रौढ वयात याची जाण भाऊरावांना असल्याने सन १९०८ साली इस्लामपुरात ध्रुवनाथ घोलप या मराठी शाळेतील महार विद्यार्थ्यास शिक्षकाने वर्गाचे बाहेर बसून अभ्यास करण्यास लावलेले पाहून भाऊरावाने त्या शिक्षकाची हजेरी घेतली. या मुलास कोल्हापूरला मिस क्लार्क या अस्पृश्यासाठी नव्याने सुरू केलेल्या वसतिगृहात नेण्याचे ठरविले. कोल्हापूरला जाण्यापूर्वी या घोलपास भाऊरावांनी आपल्यासोबत स्वयंपाकघरात जेवणास बसविले. जेवणानंतर हा महाराचा मुलगा होता हे गंगाबाईस कळल्यानंतर, त्यांनी भाऊरावास स्वयंपाकघर विटाळल्याबद्दल लोखंडी फुंकणीने मार दिला. भाऊरावांनी आईच्या फुंकणीचा मार खाल्ला; पण आपले अस्पृश्योद्धाराचे व्रत सोडले नाही. उलट आपल्या वर्तनाने यथाकाली मातोश्री गंगाबाई, पत्नी सौ. लक्ष्मीबाई व सारे जवळचे आप्तेष्ट, नातेवाईक व मित्रमंडळी यांना अस्पृश्यांच्या स्पर्शाचा विटाळ मानण्याच्या भावनेपासून व रूढीपासून मुक्त केले. भाऊरावांनी मुलींसाठी स्वतःची वसतिगृहे सुरू केल्यानंतर तर मातोश्री गंगाबाई अस्पृश्य मुलींच्या सान्निध्यात राहण्यास, त्यांच्या हातचे जेवण घेण्यास विटाळ मानीत नसत. त्यास भाऊरावांवरील कोल्हापुरातले व आजोळचे संस्कार कारणीभूत होते.

■

प्रकरण तिसरे

# भाऊरावांचे शिक्षण व जडणघडण

१) भाऊरावांचे वडील विट्यास नोकरीवर असताना त्यांचे शेजारी एक पारशी गृहस्थ, जहांगीर रुस्तुमजी ठाणावाला राहत होते. ते अबकारी अधिकारी होते. त्यांच्या सल्ल्यानुसार भाऊराव व त्यांचे धाकटे बंधू तात्या या दोघांना कोल्हापुरी इंग्रजी शिक्षणास पाठवावे असे ठरले. मराठी शाळेतील हसबनीस या शिक्षकाचे म्हणणे फक्त तात्यास पाठवावे, कारण भाऊरावापेक्षा अभ्यासात तो पुढे असावयाचा. बदल्यामुळे भाऊरावाचे एक वर्ष वाया गेलेले असावे. शेवटी वडिलांनी भाऊराव व तात्या या दोघांना मामासमवेत देऊन कोल्हापुरात इंग्रजी शिकण्यासाठी १९०२ साली पाठविले. राजाराम हायस्कूलची इंग्रजी पहिली ते तिसरी ही मिडल स्कूल शाखा स्वतंत्र असावी असे दिसते. बहुतेक मार्चच्या शेवटच्या किंवा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात इंग्रजी पहिल्या यत्तेत भाऊरावांस दाखल केले असावे. ही तारीख मिळत नाही. मात्र हायस्कूलच्या दाखल पुस्तकांत भाऊरावांची इंग्रजी चौथीत १-३-१९०५ ही दाखल तारीख आढळून येते.

२) हायस्कूलमध्ये दाखल करण्याबरोबरच भाऊरावांस जैन वसतिगृहात दाखल करण्यात आलेले दिसते. सन १९०२ साली मार्च महिन्याच्या २४ तारखेस दिगंबर जैन वसतिगृहाचे रीतसर उद्घाटन गंगावेशीतील पार्श्वनाथ जैन मंदिरात दक्षिण महाराष्ट्र जैन सभेने सुरू

केलेल्या पाठशाळेत झाले होते. या जैन पाठशाळेत संस्कृतचा व प्राकृतचा अभ्यास करणाऱ्या मुलास इंग्रजी शिक्षणास इतर हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्यास परवानगी होती. (विलास संगवेकृत द. भा. जैन सभा इतिहास, पृ. ७१) या सवलतीनुसार भाऊराव व त्यांचे बंधू राजाराम हायस्कूलमध्ये दाखल झाले. यावेळी भाऊरावाचे वय १५ वर्षे होते. अंगावर खेडवळ कपडे होते. खेडवळ कपड्यातील वयस्कर व जाडजूड शरीराच्या भाऊरावांकडे पाहून मुले हसू लागली. भाऊरावांस शाळेत उशिरा घातल्याने व हूडपणामुळे अभ्यासात त्यांची प्रगती यथातथाच होती. पण भाऊराव मंदबुद्धीचे खासच नव्हते. त्यांची धारणशक्ती प्रगल्भ होती, हे त्यांच्या भावी आयुष्यक्रमावरून व विचाराच्या प्रौढपणावरून लक्षात येते.

३) भाऊरावांचा सरळसोट स्वभाव व निर्भयवृत्ती यामुळे थोड्या अवधीतच तो शाळेतील वर्गाचा तसेच वसतिगृहातील सवंगड्यांचा पुढारी झाला. सुरवातीपासूनच दिगंबर जैन वसतिगृहाचे श्री. भारदोरे नावाचे सनातनी व कर्मठ गृहस्थ व्यवस्थापक होते. व्यवस्थापक मंडळातही प्रागतिक विचाराचे सभासद नव्हते. सन १९०७ साली श्री. अण्णासाहेब लठ्ठे राजाराम महाविद्यालयात प्राध्यापक झाले. नंतर या दिगंबर जैन वसतिगृहाचे ते प्रमुख व्यवस्थापक झाले ते शाहू महाराजांच्या सल्ल्यावरून. १८८७ साली ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड डफरीनने एक फतवा काढला. त्यानुसार प्रत्येक शासकीय अथवा खाजगी शाळा-कॉलेजीसना जोडून वसतिगृहे काढण्याचा आदेश देण्यात आला होता. या वसतिगृहावर ज्येष्ठतम शिक्षकास नेमण्यात यावे असेही सुचविण्यात आले होते. कारण त्यांच्या नैतिक आचरणाचा व शिस्तीचा मुलांच्या पुढे आदर्श राहिला म्हणजे देशाशी एकनिष्ठ राहाणाऱ्या तरुणांची पिढी निर्माण होईल, अशी कल्पना होती. (पेपर्स रिलेटिंग टू डिसिप्लीन ॲन्ड मॉरल ट्रेनिंग इन स्कूल ॲन्ड कॉलेजीस : गव्हर्नमेंट ऑफ इंडिया पब्लिकेशन, १८९०.)

छत्रपती शाहू महाराजांनी सन १९०० मधील मुंबई प्रांतातील शिक्षण संचालक श्री. ई. जाईल्स यांच्या सल्ल्यानुसार प्रत्येक जमातीसाठी कोल्हापुरात वसतिगृहे सुरू करण्यासाठी त्यांच्या पुढाऱ्यांना प्रोत्साहन

देण्यास सुरुवात केली. हे दिगंबर जैन वसतिगृह त्यापैकी दुसरे होते. श्री. लठ्ठे त्या वसतिगृहाचे साहजिकच व्यवस्थापक झाले.

४) दिगंबर जैन वसतिगृहावर प्रत्यक्ष देखरेख उपव्यवस्थापक भारदोरे यांचीच होती. या वसतिगृहाचे काही नियम कर्मठ व सदसद्विवेकास न पटणारे होते. उदा. जेवताना सोवळ्यात असावे. त्यासाठी मुलांवर 'मुकटे' वापरण्याचे बंधन होते. परंतु हे मुकटे रात्रीच्या वेळी स्वयंपाकी अंथरूण पांघरूण म्हणून वापरीत. भाऊरावाने हे मुकटे वापरण्याचे नाकारले, त्या मुकट्यापेक्षा रोज धुतलेले सुती धोतर अधिक चांगले म्हणून भाऊरावाने त्यावर बहिष्कार घातला व स्वयंपाक्यास चोप दिला. जेवणापूर्वीच मुलांनी दाढी करावी असा नियम होता. स्वत: लठ्ठे व भारदोरे मात्र केव्हाही दाढी करीत. भाऊरावांस हे खटकले. 'बोले तसा चाले' या उक्तीविरुद्ध श्री. लठ्ठ्यांचे वागणे होते. भाऊरावानेही जेवणानंतर दाढी केली. त्याबद्दल त्याला दंड झाला. तो भरण्याचे भाऊरावाने नाकारले. तिसरी घटना ता. २४-३-१९०८ रोजी घडली. अस्पृश्य मुलांसाठी स्थापन झालेल्या मिस् क्लार्क वसतिगृहाच्या उद्घाटनास भाऊराव हजर होता. या कर्मठ भारदोरेंनी नोटीस लावली की, या वसतिगृहाच्या उद्घाटनास हजर राहिलेल्यांनी अस्पृश्यांचा संसर्ग झाल्याने भोजनगृहात शिरण्यापूर्वी स्नान करावे, अशी भाऊरावावर आंघोळीची सक्ती केली ती भाऊरावाने धुडकावून लावली. त्याचे जेवण बंद करण्यात आले. स्वयंपाकघराची दारे, खिडक्या बंद करण्यात आली. दारास कुलूप लावण्यात आले. भाऊरावास अतिशय भूक लागली होती. 'बुभुक्षितो किम् न करिष्यति' या उक्तीनुसार बलदंड भाऊरावाने एका खिडकीची तावदाने मोडून सळया वाकवून भोजनगृहात शिरून जेवणावर यथेच्छ ताव मारला. वसतिगृहाच्या नियमाच्या दृष्टीने ही भाऊरावाची तिसरी व गंभीर आगळीक होती. भारदोऱ्यांना डोईजड होणाऱ्या भाऊरावास वसतिगृहातून घालवून देण्याची ही नामी संधी आली. भारदोऱ्यांच्या सल्ल्यानुसार परीक्षा जवळ आल्याच्या ऐन मोसमात श्री. लठ्ठ्यांनी भाऊरावास वसतिगृहातून हाकलून लावले. काही घटना अशा असतात की एकाद्या व्यक्तीच्या जीवनास कलाटणी

देणाऱ्या ठरतात. ही भाऊरावाच्या बाबतीत तशीच घटना होती.

५) ट्रंक, वळकटी घेऊन वसतिगृहातून बाहेर पडलेल्या व स्टेशनकडे निघालेल्या भाऊरावास सुदैवाने त्याचा शाळकरी मित्र बाळासाहेब खानविलकर भेटला. वसतिगृहातून बाहेर काढल्याचे ऐकून त्याने भाऊरावास महाराजांच्या वाड्यावरील आपल्या बिऱ्हाडी नेले. बाळासाहेब खानविलकराचे वडील मामासाहेब शाहू महाराजांचे नात्याने मेव्हणे होते. त्यांनी भाऊरावाच्या बंडखोरीची हकीकत महाराजांचे कानी घातली. ती ऐकून महाराज खूष झाले. त्यांनी भाऊरावास राजवाड्यावर राहाणाऱ्या निवडक मुलांच्या समवेत राहाण्यास परवानगी दिली. भाऊराव जैन असल्याने शाकाहारी जेवण ते राजवाड्याबाहेरच घेत असत.

६) अण्णासाहेब लठ्ठेंच्या पुढाकारानेच दिगंबर जैन वसतिगृहाच्या इमारतीत अस्पृश्यांच्यासाठी ता. ९-२-१९०८ रोजी अस्पृश्योद्धारक विद्या प्रसारक मंडळीची स्थापना करण्यात आली होती. त्या सभेस लक्ष्मीसेन जैन स्वामीही हजर होते. स्वतः लठ्ठे अस्पृश्यांसाठी निघालेल्या वसतिगृहाच्या उद्घाटनास हजर होते. मग ते भाऊरावाच्या बाबतीत असे कां वागले? त्याला काही कारणे होती. सनातनी जैन मंडळी 'श्री. लठ्ठे अस्पृश्यांत मिसळतात. त्यांची पानसुपारी घेतात, पण घरी आल्यावर स्नान करीत नाहीत', म्हणून त्यांच्यावर 'जिनविजय' व इतर पत्रांत टीका करू लागले होते. ही टीका भाऊरावाच्या स्नान न करण्याच्या घटनेमुळे प्रखर होऊ नये व त्यांच्या स्वतःवर बहिष्कार टाकला जाऊ नये म्हणून भाऊरावावर ही अन्याय्य व कठोर कारवाई त्यांना करावी लागली.

७) व्हावयाचा तोच परिणाम झाला. भाऊराव इंग्रजी सहावीच्या परीक्षेत गणित विषयात नापास झाला. भाऊरावास कुस्तीचा नाद होता. दिगंबर जैन वसतिगृहात असताना श्री. लठ्ठे मुलांना कुस्ती खेळण्यास लावीत. स्वतः त्यांचेबरोबर कुस्ती खेळत. राजवाड्यावर आल्यावर शाहू महाराजांचे भाऊरावाच्या या कलेकडे लक्ष गेले. त्यांनी भाऊरावास कुस्त्याबरोबर ज्येष्ठ मल्लांना मालीश करण्याचे काम दिले. भाऊराव महाराजांच्या मर्जीतला तरुण झाल्याने, शाहू महाराजामार्फत त्याने

गणिताचे शिक्षक श्री. भार्गवराम यांना गणितात पास करण्याबद्दल सांगून पाहिले. भार्गवराम कुळकर्णी अतिशय तत्त्वनिष्ठ व प्रांजल शिक्षक होते. ते महाराजांना म्हणाले, "महाराज, हा भाऊ ज्या बाकावर बसतो, त्यास पाहिजे तर वरच्या वर्गात घालतो; पण या भाऊस नाही. दोनशेपैकी सात मार्क्स ज्यास मिळतात त्यास अधिकचे मार्कस् देऊन पास करण्यात मुलांचे भले इच्छिणाऱ्या माझ्यासारख्या शिक्षकाचा तो अप्रामाणिकपणा ठरेल. माझ्या सदसद्विवेकबुद्धीस ते पटत नाही. हवे तर आपण मला नोकरीतून कमी करा." शाहू महाराज श्री. भार्गवराम कुळकर्ण्यांच्या या बोलण्याने समाधान पावले. महाराजांनी त्यांना बढतीच्या जागेवर नेमले. भाऊराव मात्र विरमला. पण या कुळकर्णी गुरुजींची त्याने सतत आठवण ठेवली. ही घटना साताराच्या आपल्या वसतिगृहातील मुलांना सांगून भाऊराव त्यांना अभ्यासामध्ये पराकाष्ठा करावयास लावीत. नापास झाल्यानंतर मॅट्रिकच्या वर्गात जाण्यास न मिळाल्याची रुखरूख भाऊरावापेक्षा त्याच्या मातापित्यांना जास्त वाटली. १९०८-९ हे साल राजवाड्यावर राहून कुस्तीत घालविले. शिक्षणात खंड पडल्याने भाऊरावाच्या वडिलांनी त्यास कोरेगावला परत बोलाविले. या शेवटच्या वर्षातील कोल्हापुरातील महाराजांच्या सान्निध्याने भाऊरावास भावी सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी भक्कम प्रेरणा दिली, नव्हे भावी समाजसुधारक घडविला गेला यात शंका नाही. विद्यार्थिदशेत कोल्हापुरातील संस्कारामुळे भाऊराव स्पृश्यास्पृश्य या रूढीचा किती तिरस्कार करीत होते हे खालील घटनांवरून दिसून येते. भाऊरावांचे वडील कऱ्हाडला नोकरीवर असताना ब्राह्मण मंडळी जैनांचा स्पर्शसुद्धा निषिद्ध मानीत. मातोश्री गंगाबाईंना ब्राह्मणांच्या पाणवठ्यावर पाणी भरण्यास अटकाव करीत. सुट्टीत घरी आल्यावर एके दिवशी संतापलेल्या भाऊरावाने आईच्या हातातील घागर घेऊन ब्राह्मणाच्या विरोधास न्न जुमानता, पाण्याने घागर भरून घेतली. विट्यास असताना अस्पृश्यांना पाणी न देणाऱ्या, अस्पृश्यांचा विटाळ मानणाऱ्या विहिरीच्या मालकाचा विहिरीवरील रहाट मोडून फेकून दिला. भाऊरावाच्या मूळच्या धाडसी बंडखोरपणास शाहू महाराजांच्या सान्निध्यात अधिक धार

आली.

८) राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरची राज्यसूत्रे १८९४ साली हाती घेतली. वेदोक्त प्रकरणानंतर राजकीय, सामाजिक व शैक्षणिक सुधारणा संस्थानात करण्याचे त्यांनी ठरविले. त्याची सुरुवात संस्थानच्या शासनात स्थानिक लोकांना शक्यतो प्राधान्य देण्याने केली. त्याबरोबर सत्तेचा समतोल राखण्यासाठी सर्व जाती-जमातीच्या लोकांना संस्थानांतील व त्यांच्या खाजगीकडील नोकऱ्यांत स्थान देण्यास सुरुवात केली. त्यातूनच स्थानिक असलेल्या अण्णासाहेब लठ्ठ्यांना श्री. थोरो या इंग्रजाऐवजी राजाराम महाविद्यालयात प्राध्यापक नेमले. स्थानिक सुशिक्षित तरुण संस्थानात नोकऱ्यासाठी मिळावेत म्हणून जातीनिहाय वसतिगृहे सुरू केली हे यापूर्वी सांगितले आहेच. मागासलेल्या संस्थानी प्रजेसाठी ५०% नोकऱ्या राखीव करण्याबरोबर अस्पृश्य समाजातील सातवी पास झालेल्या तरुणांना मराठीचा उपयोग करून कोर्टात वकिली करण्यासाठी सनदा दिल्या. अभ्यासात कच्चे असलेल्या अस्पृश्यांसाठी मिस क्लार्क वसतिगृहासोबत विशेष अभ्यासवर्ग सुरू करविला. या मुलांना आर्थिक मदतीची सोय केली. अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांना सहभोजनाचा लाभ दिला. राजवाड्यावर दारवान, कुत्तेवान, माहूत व इतर काही मोक्याच्या जागांवर भटक्या, गुन्हेगार जमातीसह अस्पृश्यांना नेमणुका दिल्या. आपल्या राजकन्येच्या विवाहाप्रसंगी त्यांना तरवारी धारण करून विशेष पोषाखात अभ्यागतांच्या स्वागताचे काम दिले. सन १९०२ ते १९०९ पर्यंत भाऊरावांनी शाहू महाराजांच्या या सामाजिक सुधारणांचा प्रयत्न प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला होता. राजवाड्यावर राहिल्यानंतर महाराजांच्या विशाल अंत:करणाचा अनुभवही घेतला होता. म्हणून सातारला छत्रपती शाहू बोर्डिंगच्या नामकरणप्रसंगी ते महात्मा गांधींना म्हणाले, 'महाराजसे मैंने पैसा नहीं लिया, लेकिन उनका बड़ा दिल लिया है।'

९) भाऊरावांनी १९०९ मध्ये कोल्हापूर सोडताना शाहू महाराजांकडून समानतेची शिकवण व मागासलेल्या अस्पृश्य, भटक्या व गुन्हेगार जमातीविषयी अपार करुणेने भरलेले मोठे अंत:करण बरोबर

घेऊन कोरेगावला प्रयाण केले.

१०) भाऊराव या वेळी बावीस वर्षांचे झाले होते. त्यांचेवर शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणांपैकी सगळ्यात मोठा परिणाम झाला तो त्यांच्या बहुजनसमाजाच्या शिक्षणप्रेमाचा. शाहू महाराजांची भावना होती की अज्ञानांधकारात बुडालेल्या अठरापगड जातींच्या मुलांना शिक्षण देऊन शहाणे केल्याशिवाय त्यांच्या संस्थानात काय किंवा हिंदुस्थानात काय, लोकशाहीची मुळे रुजणार नाहीत व लोकशाही स्थिर होणार नाही. लोकांना लोकशाही व स्वातंत्र्य यांचा अन्योन्यसंबंध जाणवणार नाही. महाराजांचे विचार अमेरिकन देशभक्त टिडियस स्टीव्हन्सप्रमाणे होते. पेनसिल्व्हानिया प्रांताच्या विधानसभेपुढे सन १८३४ साली स्टीव्हन्स म्हणतो, "लोकनियुक्त प्रजासत्ताक टिकावयाचे असेल तर प्रत्येक मतदारास स्वतःच्या आर्थिक हिताखेरीज, विधानसभेस, इतर देशांत राज्यप्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांना व देशाच्या कार्यकारिणीस (मंत्रिमंडळास) शहाणपणाने मार्गदर्शन करण्याचे ज्ञान असले पाहिजे. काही प्रमाणात ही जबाबदारी प्रत्येक स्वतंत्र नागरिकाची आहे. आपल्या शासनाचे स्थायी स्वरूप अशा ज्ञानावर जर अवलंबून आहे, तर ज्ञान मिळविण्याची साधने प्रत्येक नागरिकास उपलब्ध करण्याची जबाबदारी शासनाची आहे. जे लोक शिक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य नसून खाजगी बाब मानतात त्यांना हे माझे उत्तर पुरेसे आहे." (शंकरराव मोरेकृत 'प्राथमिक शिक्षण', १९३७, पृष्ठ १७७)

११) कोल्हापुरातील वसतिगृहयुक्त शैक्षणिक चळवळीतून मुलांना नैतिक शिक्षण व शिस्तीचे धडे मिळून ते संस्थानी शासनास मदत करणारे जबाबदार नागरिक व्हावेत हा उद्देश होता. दुसरा उद्देश होता की, शिक्षणाने जातीय दृष्टी व जमातवाद कमी होऊन या वसतिगृहातील तरुणांतून सामाजिक कार्यकर्ते तयार व्हावेत. भाऊराव हे त्याचे दृश्य फळ होते. ऑगस्ट १९२० मध्ये आर्य क्षत्रिय समाजाच्या परिषदेत शाहू महाराज म्हणाले, "जातीभेद हा भारताला लागलेला मोठा व प्रमुख रोग आहे. स्वतःच्या जातीपलीकडे मोठा समाज आहे, हे प्रत्येकाने जाणले पाहिजे.

स्वत:च्या जातीचा अभिमान दुय्यम असला पाहिजे. प्रथम आपण भारतीय आहोत, भारताचे हित ही आपली पहिली जबाबदारी आहे, याचा विसर पडता कामा नये. जातीच्या अभिमानाने राष्ट्रीय हिताकडे डोळेझाक होता कामा नये." (एम. एस. शिंदेकृत 'भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचे आद्यजनक', राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, संपा. पी. बी. साळुंखे.) या प्रकारचे विचार आपल्या बलदंड शरीरावरील मस्तकात घेऊन भाऊराव कोरेगावात वावरत होते. कोल्हापुरात असताना भाऊरावावर आणखी दोन संस्थांचे संस्कार झाले. ते म्हणजे १९०८ साली कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे मिस् क्लार्क वसतिगृहाच्या उद्घाटनास आले असता त्यांच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे विचार भाऊरावांच्या संस्कारक्षम मनावर आदळले. सन १९०२ पासूनच सत्यशोधक समाज व महात्मा फुले यांचे विचार भास्करराव जाधव, गणपतराव कदम वकील यांच्या 'दीनबन्धु' वृत्तपत्रातून भाऊरावांवर परिणाम करीत होते. व भावी कार्याची रूपरेषा भाऊरावांच्या मनात आकार घेत होती.

■

प्रकरण चौथे

## उपजीविकेच्या शोधात

१) कोल्हापुराहून भाऊरावास कोरेगावला परत बोलाविल्यानंतर आईवडिलांना वाटले की, भाऊरावाचे लग्नाचे वय झाले आहे. त्याचे लग्न लावून दिल्यास त्याच्या बंडखोरपणास आळा बसेल. सौ. गंगाबाई मातोश्रीने कुंभोज येथील आपल्या माहेरच्या नातेवाइकांपैकी कु. अदक्का पाटील हिची निवड करून लौकिक अर्थाने भाऊरावाच्या पायात लग्नाची बेडी १९०९ साली अडकवून दिली. भाऊराव मॅट्रिक पास नसल्याने पायगौंडा पाटील कष्टी होते. चांगली नोकरी लावण्यास अडचण येत असे. पायगौंडा पाटलांना आपला एखादा मुलगा तरी पदवीधर व्हावा असे वाटत होते. चारी मुलांपैकी कोणीही त्यांच्या नजरेसमोर पदवीधर झाला नाही. परंतु पायगौंडाच्या मरणोत्तर सतरा वर्षांनी या भाऊरावांस सन १९५९ साली पुणे विद्यापीठाने त्यांच्या असामान्य शैक्षणिक कार्याबद्दल सन्माननीय डी. लिट्. पदवी दिली. भाऊरावांना मिळालेली पदवी पाहण्याचे भाग्य मात्र मातोश्री गंगाबाईंना लाभले. सन १९३८ साली ऑक्टोबर महिन्यात राज्यपाल सर रॉजर लम्ले यांनी रयत शिक्षण संस्थेत भेट दिली. आपल्या मुलाचा - भाऊरावाचा मोठेपणा पायगौंडा पाटलांना राज्यपालाकडून भाऊरावांच्या स्तुतीनंतरच कळून आला. आपला मुलगा आपले आयुष्य फालतू गोष्टीवर खर्च करीत नाही हे त्यांना कळून चुकले.

२) हे जरी खरे असले तरी १९०९ साली भाऊराव हा

निरुद्योगी, भारभूत मुलगा आहे असे पायगौंडा पाटलांना वाटे. कारण कोणत्याही नोकरीत स्थिरावयाचे भाऊरावांच्या स्वभावात नव्हते. कारकून म्हणून आपल्या खात्यात लावून दिले तर ते काम मनाजोगते नाही म्हणून त्या कामावर जाण्याचे भाऊरावाने टाळले. मुलाने पोलीस खात्यात शिरण्यास पायगौंडा पाटलांनाच तिटकारा होता. सैन्यात शिरण्याचा भाऊरावाने प्रयत्न केला, पण तेथे निवड झाली नाही. सारांश, लग्नानंतरचे काही महिने काय करावे याचा फारसा विचार न करता दोन वेळ जेवावे व मनसोक्त हिंडावे हेच काम भाऊराव करीत राहिले. तोच १९१० साल उजाडले व श्रवणबळगोळ येथील गोमटेश्वराचा उत्सव आला. या उत्सवाला जोडून जैन समाजाचे अधिवेशन होते. १९०५ साली कोल्हापूरच्या दिगंबर जैन वसतिगृहाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनापासून मुंबईचे जव्हेरी श्री. माणिकचंद हिराचंद दरसाल या वसतिगृहाच्या आवारात भरणाऱ्या अधिवेशनास किंवा सभेस हजर राहत असत. भाऊरावाकडे स्वयंसेवकाचे काम असे. विशेषत: माणिकचंद शेठजींच्या दिमतीस भाऊरावांना दिलेले असे. सदर शेठजी व त्यांचे कुटुंबीय स्नानादी प्रसंगी व कोल्हापुरात मुक्काम असे तोपर्यंत या भाऊरावाकडे आपले जडजवाहीर निर्धास्तपणे सोपवीत. भाऊराव त्यांचे जिवापाड रक्षण करून मुंबईस परतताना त्यांच्या हवाली करीत. श्रवणबेळगोळच्या अधिवेशनाचे अध्यक्ष माणिकचंद शेठजीच होते. कोल्हापूरच्या वसतिगृहातील बरेच तरुण स्वयंसेवक म्हणून या अधिवेशनास जाणार होते. संयोजकांना भाऊरावाचे चोख काम आठवले. भाऊरावास या अधिवशेनास बोलावून स्वयंसेवक दलाची जबाबदारी त्यांच्यावर व बेळगावचे दामोदार लेंगरे या वयस्कर व बलदंड तरुणावर सोपविण्यात आली. येथेही माणिकचंद व त्यांचे कुटुंबीय यांच्या वसतिस्थानावर देखरेख करण्याची जबाबदारी भाऊरावांवर सोपविण्यात आली होती. कोल्हापुरात असतानाच भाऊरावांची शेठजींशी ओळख झाली होती. मुंबईस परतताना श्री. माणिकचंदजींनी भाऊरावास, 'सध्या काय करतोस?' म्हणून विचारले. भाऊरावांनी बेकार असल्याचे सांगितले. अशा

विश्वासू व प्रामाणिक तरुणाच्या जीवनास वळण देण्याच्या हेतूने माणिकचंद शेठजींनी भाऊरावास मुंबईस नेले. स्वत:च्या वडिलांच्या नावे मुंबईत सुरू केलेल्या हिराचंद गुमानजी वसतिगृहात दाखल केले. दरमहा तीस रुपये विद्यावेतन देऊन दावर्स वाणिज्य विद्यालयात भाऊरावास व्यापारी कला शिकविण्यास दाखल केले. भाऊरावास टंकलेखन आदी विषयांत इंग्रजी भाषेच्या कच्चेपणामुळे गती आली नाही. त्यांनी दावर्स वाणिज्य विद्यालय काही महिन्यांतच सोडले.

४) 'हिराचंद गुमानजी' वसतिगृहात एके दिवशी चोर शिरला असताना भाऊरावाने त्यास पकडण्याचा धाडसी प्रयत्न केला; पण चोर निसटला. ही घटना माणिकचंद शेठजींना कळताच त्यांनी भाऊरावास आपल्या घरीच स्वसंरक्षणासाठी ठेवून घेऊन रत्नपारख्याचा व्यवसाय त्यांस शिकविण्याचे ठरविले. भाऊराव त्या मोहनगरीतील व्यवसायात रमले नाहीत. जसे गेले तसे निष्कांचन, निष्कलंक परतले, आणि मातापित्यांना कोरेगावात पुन्हा भारभूत झाले.

५) कोल्हापुरातील सामाजिक व शैक्षणिक संस्कार अमिट असल्याने श्रवणबेळगोळच्या अधिवेशनात गाठभेट झालेल्या भाऊ दादा कुदळे, दादा जिनप्पा मद्वाण्णा आदी स्नेह्यांना भेटण्यासाठी ते दुधगावला (जि. सांगली) गेले. मराठी शाळेतील मद्वाण्णा गुरुजी आपल्या मुलांचा सातवीच्या परीक्षेत उत्तम निकाल लागावा म्हणून त्यांना सायंकाळी शाळेत बोलावून अधिक अभ्यास घेत. यातूनच भाऊरावांना दुधगावला विद्यार्थी आश्रम नावाची अभ्यासिका सुरू करण्याची कल्पना सुचली. मद्वाण्णाच्या मदतीने या आश्रमाचे वसतिगृहात रूपांतर करण्यात आले. ही सन १९१० सालातली घटना आहे. या वसतिगृहासाठी दरसाल धान्य गोळा करण्यासाठी भाऊराव काही दिवस दुधगावला मुक्काम ठोकत असत.

६) या वसतिगृहात सर्व जातींची मुले राहावयास येऊ लागली. सुरवातीस त्यांच्या जेवणावळी जातीनिहाय, वेगवेगळ्या असत. तीनचार वर्षात हे भेद कमी झाले व सर्व जातींची मुले एकत्र जेवू लागली. पहाटे उठणे, गटागटाने अभ्यास करणे इत्यादी गोष्टी सरावाने एकत्र होऊ

लागल्या. पुढे काले, नेर्ले व सातारा या ठिकाणी जी वसतिगृहे झाली त्यांची हे वसतिगृह प्रयोगशाळा ठरली. या वसतिगृहातून अनेक नामांकित विद्यार्थी बाहेर पडले. उदा. कवी यशवंत, कवी साधुदास, खासदार बी. सी. कांबळे, उपपोलीस महानिरीक्षक मेघाजी कांबळे इत्यादी. भाऊराव श्री. किर्लोस्कर व श्री. ओगले याचे प्रमुख विक्रेते म्हणून काम करीत असताना या वसतिगृहास कंदील व रॉकेलचे डबे, पुस्तके, वह्या इत्यादी वस्तू देणगीदाखल पाठवीत. भाऊरावांना स्वत: या वसतिगृहाकडे लक्ष देण्यास कमी वेळ मिळू लागल्यावर त्यांनी सन १९१२-१३ साली स्थापन झालेल्या दुधगाव शिक्षण प्रसारक संस्थेच्या दुसऱ्या वार्षिक सभेत खालील ठराव मांडून 'विद्यार्थी आश्रम' त्यांना चालविण्यास दिला आहे.

७) "शके १८३५-३६ इ. स. १९१३-१४ दुसरी वार्षिक सभा बैठक
नं. १ दुधगाव ता. २७-२-१९१४ प्रेसिडेंट रा. रा. अप्पा बाबगौंडा पाटील, दुधगाव
रात्रौ ८ वाजता शेठ चतुर पितांबर यांच्या वाड्यात झाली. सहावा ठराव : 'मि. दादा जिनाप्पा मद्वाण्णा वगैरे मंडळीनी येथे काढलेल्या 'विद्यार्थ्याश्रम' या नावाच्या संस्थेची उपयुक्तता जाणून ती संस्था ऊर्जितावस्थेस आणण्याची खटपट सर्वांनी करावी. तसेच सवडीनुसार हा आश्रम या संस्थेस जोडण्यात यावा आणि हा जोडण्याचा अधिकार व आश्रमासंबंधी त्यावेळी जरुरी लागेल त्याप्रमाणे त्या वेळच्या मॅनेजिंग कमिटीस असावा.' याप्रमाणे ठराव रा. भाऊ पायगौंडा पाटील ऐतवडेकर यांनी पुढे मांडीला, त्यास रा. भाऊ दादा कुदळे यांनी अनुमोदन दिल्यावर पास झाला."

(हा ठराव देण्याचे कारण म्हणजे वरील संस्था व विद्यार्थी आश्रम एकाच वेळी स्थापन झाल्याचा गैरसमज आहे.)

८) भाऊराव दुधगावला येऊन जाऊन असत. कोरेगावी पायगौंडा पाटलांना मात्र 'घरचे खाऊन लष्कराच्या भाकरी भाजण्याचा' भाऊरावाचा हा उद्योग आवडत नसे. एके दिवशी १९११ साली काही नातेवाईक मंडळी पायगौंडा पाटलांना भेटण्यास कोरेगावला आली. दुपारी जेवणाच्या पंगतीस

भाऊरावही होते. जेवताना पाहुण्यांपैकी एकाने पायगौंडा पाटलांना विचारले, "मुलगा मोठा आहे. काय उद्योग करतो?" पायगौंडा पाटील नाराजीत म्हणाले, "काय सांगू? खातो आणि मोकाट हिंडतो." सासरी भाऊरावांच्या पत्नीस सौ. लक्ष्मीबाई या नावाने हाक मारीत असत. सौ. लक्ष्मीबाई पंगतीत वाढीत होत्या. परक्या नातेवाईंकांसमोर व पत्नीसमोर वडिलांनी पाणउतारा केला म्हणून भाऊराव ताटावरून तात्काळ उठले. मनाशी निश्चय केला की, यापुढे या घरात कष्टाचीच भाकरी खावयाची. त्याच दिवशी भाऊरावांनी साताऱ्यास प्रयाण केले. भाऊराव मानी स्वभावाचे होते. पण आईवडिलांना त्यांनी कधीही दुरुत्तरे केली नाहीत.

९) साताऱ्यात आल्यानंतर त्यांनी अनेकविध व्यवसाय केले. कोरेगावला असतानाच त्यांनी कृषी सुधारणा सोसायटी स्थापन करून तिचे काम सुरू केले होते. तिचे सभासद करण्याचे काम सोमवार पेठ, सातारा येथील पत्त्यावरून सुरू केले. तशी कार्डे छापून घेतली होती ती अशी :

श्री. रा. रा. भाऊ पायगौंडा पाटील ऐतवडेकर सातारा यासी -

स. न. वि. वि.

आपले कार्ड पावले. मजकूर वाचून आनंद झाला. सदर कृषी सुधारणा सोसायटी ऊर्जितावस्थेस यावी अशी आमची मन:पूर्वक इच्छा आहे. आपले विनंतीप्रमाणे आम्ही कृषी सुधारणा सोसायटीचे मेंबर होण्यास आनंदाने तयार आहोत. आमचे नाव मेंबराचे लिस्टात दाखल करावे.

कळावे. हे विनंती....

सही..................

मु. ता...............

(सदरचे पत्र तसेच दुधगाव शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रोसिडिंग बुक भाऊ दादा कुदळे यांचे सुपुत्र गुणधर यांच्या रेकॉर्डमध्ये उपलब्ध झाले.)

साताऱ्च्या महाराणी जमुनाबाई, मराठा वसतिगृहाचे संस्थापक रुद्राजीराजे महाडिक यांची सदरची कृषी सुधारणा सोसायटी स्थापण्यास मदत होती. पण प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाही. सन १९१२-१३ साली कोरेगावचे स्नेही भाऊसाहेब बर्गे यांची शेती खंडाने घेऊन माजी

सैनिकांसाठी सहकारी शेती संस्था काढण्याचा प्रयोग केला. पण पुढील साली युद्धाच्या सैनिक भरतीत हे माजी सैनिक युद्धावर गेल्याने व कोल्हापूरचे डांबर प्रकरण उपस्थित झाल्याने हा प्रयोगही थांबला. याच सुमारास लाहोरच्या भारत विमा कंपनीचे व सैन्यभरतीचे प्रचारक म्हणून भाऊराव काम करीत होते. वरील विविध व्यवसायातून म्हणावी तशी प्राप्ती होत नसल्याने साताऱ्यात खाजगी शिकवणीचा जोडव्यवसाय भाऊरावांनी सुरू ठेवला होता.

१०) साताऱ्यात येऊन खाजगी शिकवण्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता यथातथा असली तरी व्यावहारिक शहाणपण भाऊरावाजवळ एव्हाना भरपूर जमले होते. त्याशिवाय का ते वरील विविध व्यवसाय करू शकले ? हा व्यवसाय निवडताना अगतिकता होती हे खरे ! परंतु एकादे काम हाती घेतल्यावर त्यांत स्वत:स झोकून देण्याची जिद्द मात्र भाऊरावांच्या ठिकाणी कोल्हापुरात वाढली होती. शिक्षक होणाऱ्या प्रत्येकाचा अनुभव आहे की दुसऱ्यास शिकविताना स्वत: त्या विषयाची चांगली तयारी करावी लागते. भाऊराव यास अपवाद नव्हते. विषयाची तयारी करूनच ते शिकवण्या करीत. आपणास असेही दिसून येते की महाराष्ट्रातील ज्येष्ठ समाजसुधारकांनी आपल्या उपजीविकेची सुरुवात खाजगी शिकवण्या किंवा शिक्षकाच्या पेशातून केली आहे. प्रमुख उदाहरण म. फुले व महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे आहे. या व्यवसायातून त्यांनी पुढे आपले जीवितकार्य किंवा ध्येय निश्चित केल्याचे दिसून येते. भावी काळात भाऊरावांच्या हातून रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून फार मोठे शैक्षणिक व सामाजिक कार्य व्हावयाचे होते म्हणूनच की काय प्रारब्ध त्यांना या व्यवसायाकडे वळवीत होते.

११) भाऊरावांना सुरुवातीस एका अतिशय सामान्य मगदुराच्या मुलाची शिकवणी मिळाली. भाऊराव त्यास 'मठ्ठ' मुलगा म्हणत. इतर काम किंवा शिकवण्या नसल्याने या मुलावर दोन तासांपेक्षा अधिक वेळ ते खर्च करीत. याचा परिणाम असा झाला की, 'पाटील मास्तर' अतिशय चांगले शिकवितात असा आजूबाजूच्या आळीतील घरांत या मुलाच्या

पालकांकडून प्रचार झाला. त्यामुळे अधिक मुले शिकवणीस मिळू लागली. घरी तयारी करण्यामुळे भाऊरावांचे प्राथमिक शाळेतील विषयांचे ज्ञानही सुधारत गेले. यातून सुमारे रु. ३०/- दरमहा मिळू लागले. दुसरी शिकवणी मिळाली ती श्री. पोप नावाच्या इंग्रज उपजिल्हाधिकाऱ्यास मराठी शिकविण्याची. तिसरी शिकवणी मिळाली ती पेठे नावाच्या अधिकाऱ्याच्या मुलास संस्कृत शिकविण्याची. येथे मात्र भाऊरावांची कसोटी होती. भाऊरावांस संस्कृतचा अभ्यास कोल्हापूरच्या जैन पाठशाळेच्या अटीमुळे वसतिगृहात करावा लागत होताच. हायस्कूलमध्ये होताच, पण तो जेमतेम पास होण्यापुरताच. येथेही त्यांचा व्यवहारीपणा उपयोगी आला. सातारला नरसिंहाचार्य गजेंद्रगडकरशास्त्री नावाचे पुरोगामी विचाराचे संस्कृत पंडित होते. त्यांच्याकडे स्वत: संस्कृतचे धडे गिरविण्यास भाऊरावांनी सुरुवात केली. या शिकवणीस फी नसे, मात्र भल्या पहाटे शास्त्रीबुवाकडे अंधारात हातात कंदील घेऊन जावे लागे. पहाटे शिकलेला भागच वरील पेठ्यांच्या मुलास शिकविण्याची पद्धत भाऊरावांनी अवलंबिली. चौथी शिकवणी होती ती सातारच्या महाराजांचे कायदे सल्लागार डोसाभाई माणिकजी यांना मराठी शिकविण्याची. यातून सुमारे ९० रु. दरमहा भाऊरावांना मिळू लागले. मात्र अस्पृश्य मुलांना शिकविण्याची त्यांची कोल्हापुरातील तळमळ इथेही प्रगट झाली. हरिजनवाड्यात जाऊन तेथील हरिजनांची मुले एकत्र करून त्यांना मोफत शिकविण्याची व त्यांच्यात शिक्षणाविषयी आस्था निर्माण करण्याचा ते प्रयत्न करीत होते. त्यात गणपत मांग नावाच्या गृहस्थाचाही मुलगा होता. या गणपतविषयी पुढील प्रकरणात माहिती सांगणार आहोत. सातारला असताना भाऊराव श्रीमती अंबुबाई मुद्रावळे या विधवा स्त्रीच्या घरी भाड्याने राहात असत. या तरुण विधवा स्त्रीनेही भाऊरावांच्या जीवनासच नव्हे, तर रयत शिक्षण संस्थेच्या वाढीसही मोठा हातभार लावला आहे. तोही पुढील प्रकरणात सांगण्यात येईल.

१२) भाऊरावांची उपजीविकेच्या दृष्टीने प्राप्ती बरी होत असल्याने, कोरेगावला येऊन जाऊन ते राहत असत. जून महिन्यात कोरेगावला असताना त्यांना कोल्हापुरहून श्री. कल्लाप्पा निटवे नावाच्या

गृहस्थांची ९-६-१९१४ तारीख असलेली तार आली. तारेत फक्त 'कोल्हापूरला तात्काळ निघून यावे' एवढाच मजकूर होता. भाऊरावांना कोल्हापूरची ओढ होतीच. आपल्यापुढे कोणते संकट वाढून ठेवले आहे, त्याचा विचार न करताच भाऊराव त्याच रात्री कोरेगावहून निघून दुसऱ्या दिवशी कोल्हापुरास श्री. निटव्यांच्या जिनेंद्र प्रेसच्या इमारतीत हजर झाले.

■

[library stamp]

प्रकरण पाचवे

# संस्थानी पोलिसांच्या विळख्यात

१) भाऊरावांना कोल्हापूरच्या दिगंबर जैन वसतिगृहातून श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांनी हाकलले तेव्हा श्री. लठ्ठ्याविषयी कर्मठ सनातनी जैन समाजात असंतोष होता. त्याला विविध कारणे होती; त्यापैकी त्यांना मिळालेला सन्मान व त्यांचे पुरोगामित्व हे प्रमुख होते. अशा वेळी त्यांना पाण्यात पाहणारे प्रमुख होते कल्लप्पा भरमप्पा निटवेशास्त्री. या निटव्यांच्या सनातनी सहकाऱ्यांची एक पार्टी होती. तिला म्हणत पंडित पार्टी. जैनातील सुधारणावादी, नवमतवादी तरुणांची होती बाबू पार्टी. या पार्टीचे प्रमुख होते, आण्णासाहेब लठ्ठे, बळवंतराव धावते, भाऊसाहेब कुदळे इत्यादी. निटवेशास्त्र्यांनी श्री. लठ्ठ्यांना विरोध करण्याचे तात्कालिक कारण म्हणजे द. भा. जैन सभेस शाहू महाराजांनी दिलेला प्रेस पंडित निटव्यांनी हडप केला होता,

तो श्री. लठ्ठ्यांनी महाराजांना सांगून परत मिळविला.

२) याच सुमारास कोल्हापुरातील दरबारी मानकऱ्यांत दोन तट होते. पहिला तट होता सनातनी, सरंजामी, अपरिवर्तनवादी प्रतिष्ठित मराठ्यांचा. या तटाचे प्रमुख होते बाळासाहेब गायकवाड.

दुसरा तट होता परिवर्तनवादी प्रागतिक विचारसरणीच्या सुशिक्षित उच्चपदस्थ संस्थानी सेवकांचा व शाहू महाराजांच्या पुरोगामी विचारसरणीची अंमलबजावणी करणाऱ्या विविध जातीतील तरुणांचा.

सर्वश्री भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, म. ग. डोंगरे, खंडेराव बागल, बाबूराव यादव इ. या दुसऱ्या तटाचे प्रमुख होते. शाहू महाराज या सेवकामार्फत पहिल्या तटाकडील मुजोरी मोडून काढीत. उदा. गायकवाडांनी शेरी जमिनीत विनापरवाना आपली जनावरे चारली म्हणून महाराजांनी भास्करराव जाधवांना महसूल अधिकारी या नात्याने श्री. गायकवाडांकडून दंड स्वरूपात रक्कम वसूल करावयास लावली. श्री. भास्करराव जाधव व श्री. गायकवाड यांत तेढ निर्माण झाली. महाराज वैदिक धर्माचे व आर्य समाजाचे पुरस्कर्ते होते. शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजास व त्यांच्या पुढाऱ्यास मदत केली होती. त्यांची अपेक्षा की, श्री. म. ग. डोंगरे, भास्करराव जाधव आदी सत्य समाजिस्ट महाराजांनी स्थापन केलेल्या वैदिक शाळेची जबाबदारी घेतील. पण ती जबाबदारी घेण्याचे त्यांनी टाळले. सारांश, सत्यशोधक समाजाचे तिन्ही पुढारी भास्करराव जाधव, म. ग. डोंगरे व अण्णासाहेब लठ्ठे शाहू महाराजांच्या नाराजीस कारणीभूत झाले.

३) सन १९१४ साली १४ फेब्रुवारीस शिवाजी क्लबच्या कोणीतरी सभासदाने कोल्हापुरातील टाऊन हॉलमधील ब्रिटिश राजघराण्याच्या एडवर्ड बादशहा व राणी ॲलेक्झांड्रा व इतर राजपुरुषांच्या पुतळ्यास डांबर फासले. ही राजद्रोहाची घटना असल्याने महाराज अस्वस्थ झाले. कारण तिचे पडसाद इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये उठले. गायकवाड पार्टीत कल्लप्पा निटवे, चिप्रीकर पाटील, सोवनी, करमरकर, लाटकर, जांभळीकर, म्हैसकर आदी होते. ही सनातनी पार्टी अण्णासाहेब लठ्ठयांच्या विरोधात असल्याने त्यांनी महाराजांचा गैरसमज करून दिला की हे डांबर फासण्याचे काम सत्यशोधकांचे व विशेषत: अण्णासाहेब लठ्ठयांचे किंवा त्यांच्या हस्तकांचे आहे. महाराज सत्यशोधकावर नाराज होतेच आणि कल्लप्पा निटव्यांना श्री. लठ्ठयावर सूड उगविण्यास आयती संधी चालून आली. त्यांत भाऊराव पाटलांचा उपयोग करावयाची कल्पना दुष्ट निटव्यांच्या डोक्यात आली व त्यांनी भाऊरावास तारेने बोलावून घेतले. लठ्ठयांच्या विरुद्ध कट असा होता की लठ्ठयांच्या घरी त्यांच्या गैरहजेरीत एक

डांबराचा डबा व त्याचे खरेदीचे कागद व डांबर फासण्याची योजना इ. कागद त्यांच्या टेबलाच्या खणात किंवा कपाटात ठेवून धाड घालावयाची. नंतर भाऊरावाने साक्ष द्यावयाची की, तो डांबर फासणारा माणूस त्यांना माहीत आहे. व लठ्ठ्यांना त्यात ओढावयाचे.

४) दुपारचे जेवण झाल्यावर भाऊरावांना ही योजना सांगितली व कल्लाप्पा निटवे म्हणाले, "भाऊ, श्री. लठ्ठ्यांनी तुला वसतिगृहातून हाकलून लावले व तुझ्या आयुष्याचे नुकसान केले. आता त्यांच्यावर सूड उगविण्याची चांगली संधी आहे. विचार कर व उद्या साक्षीस तयार राहा." भाऊरावांनी निटव्यांचा कावा ओळखला. विचार करण्यास अवकाश दिल्याने भाऊरावांनी बाहेरून जाऊन येण्याच्या बहाण्याने प्रेसबाहेर येऊन श्री. भाऊ दादा कुदळे यांना शिसपेन्सिलीने पत्र लिहून श्री. अण्णासाहेबांचे जीवितास धोका असल्याचे कळविले व श्री. लठ्ठ्यांना सावध करण्यास कळविले. जिनेंद्र प्रेसवर परत आल्यावर पुन्हा तोच विषय भाऊरावासमोर निटव्यांनी काढला. रात्री प्रेसच्या माडीवर झोपण्यापूर्वी या साक्षीसाठी महाराज भाऊरावास इनाम देतील, रोख रक्कम देतील, असे प्रलोभन निटव्यांनी दाखविले. दिवसभर शांत असलेला ज्वालामुखी रात्री भडकला. भाऊराव निटव्यांना म्हणाले, "अण्णा, श्री. लठ्ठ्यांनी शिस्तीसाठी मला वसतिगृहातून बाहेर घालविले. तुम्ही तर खोटी साक्ष द्यावयास लावून मला जीवनातून उठविण्याचा प्रयत्न करीत आहात. मला तुमचा कावा कळला. माझा प्राण गेला तरी मी माझ्या गुरुविरुद्ध, श्री. लठ्ठ्याविरुद्ध साक्ष देणार नाही."

५) श्री. निटवेशास्त्री क्षणभर स्तब्ध राहिले. भाऊरावास झोपावयास सांगून खाली प्रेसमध्ये गेले. एव्हाना रात्रीचा बराच उशीर झालेला होता. भाऊराव अद्याप झोपण्याऐवजी विचार करीत आडवे झाले होते, तोच "आग ! आग !" म्हणून निटव्यांनी काही रद्दी जाळली व ते माडीवर आले व म्हणाले, "काय रे भाऊ, तुझी येथवर मजल जाईल असे मला वाटत नव्हते. माझ्या प्रेसला आग लावतोस काय? आणि माझ्या कोटातले हजार रुपये सुद्धा हडप केलेस? मी पोलिसांना खबर दिली

आहे. ते आता येतील व तुला अटक करून नेतील. बऱ्या बोलाने मी सांगितले तशी साक्ष दिलीस तर तुझी सुटका होईल."

भाऊरावांनी पुढे होणाऱ्या परिणामाची तमा न बाळगता सांगितले, "अण्णा, तुमच्या धमकावणीने मी गुरुद्रोह करणार नाही हे पक्के लक्षात ठेवा!" भाऊराव प्रेसमध्ये जवळजवळ कैद होते. दुसऱ्या दिवशी सकाळी कोल्हापूर पोलीसप्रमुख फर्नांडिस आपल्या यमदूतासह हजर होऊन भाऊरावास कावळ्याचे नाक्यावरील आपल्या कार्यालयात घेऊन गेले. भाऊरावाकडून कबुलीजबाब मिळविण्यासाठी त्यांचे अनन्वित हाल केले. हरभऱ्यावर लाटले, लोंबकळत ठेवून कातडी जाड हंटरने पाठ फोडली. या दोन उदाहरणांवरून काय त्रास दिला असेल याची वाचकांनीच कल्पना करावी.

६) मे १९१४ मध्ये कोल्हापूर दरबारने डांबर फासणाऱ्यास पकडून देणाऱ्यास रु. ५०००/- चे इनाम जाहीर केले होते. मुंबई सरकारचा सत्यशोधकावर संशय असल्याने कोल्हापुरातील भास्करराव जाधव, म. ग. डोंगरे व लठ्ठे आदींनी सत्यशोधक समाजाशी संबंध तोडल्याचे जाहीर केले. परंतु मुंबई शासनाचा संशय लठ्ठ्यावर असल्याचे जाहीर झाल्याने जून महिन्यात त्यांचेवर पकड वॉरंट जाहीर केले. सदर बाब लठ्ठ्यांचे स्नेही रा. ब. दिवाण सबनीस यांना कळल्याने त्यांनी श्री. लठ्ठ्यांना तात्काळ निरोप पाठविला व कोल्हापूर सोडण्यास सांगून कटाची कल्पना दिली. सदर बाब ब्रिटिशांचे कोल्हापुरातील प्रतिनिधीचे कानावर घालणे श्री. लठ्ठ्यांना उचित वाटले. श्री. लठ्ठ्यांनी घरी जाऊन टेबलाच्या खणातील डांबराचा डबा, त्याची पावती व कोणत्या पुतळ्यास डांबर कसे फासावयाचे याची योजना असलेले कागद घेतले व रेसिडेंटच्या बंगल्यावर जाऊन हे साहित्य त्यांचे ताब्यात दिले व कटाचा इतिहास सांगितला. रेसिडेंटला त्याची खात्री झाल्याने त्यांनीही तात्काळ कोल्हापूर सोडण्यास श्री. लठ्ठ्यांना सांगितले. त्याच रात्री श्री. लठ्ठे मालगाडीने ड्रायव्हरच्या कृपेने सांगलीस आले. कोल्हापूरचे पोलीस सांगलीतही त्याचे मागावर होते. श्री. बळवंतराव धावत्यांच्या सावधगिरीमुळे श्री. लठ्ठे मिरज स्टेशनवर आले. रेल्वे हद्द

ब्रिटिशांची असल्याने कोल्हापूरचे पोलीस त्यांना पकडू शकले नाहीत. ते बेळगावास गेले. तेथे त्यांच्यावरील खटला चालला. त्यात लठ्ठे निर्दोष ठरले.

७) इकडे कोल्हापुरात भाऊरावांनी यमयातनातून सुटका होण्यासाठी कावळा नाक्याजवळीस विहिरीत, बहिर्दिशेस जाण्याचे निमित्त करून उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. विहीर गाळाने भरलेली असल्याने ते वाचले. शिपायांनी त्यांना बाहेर काढून दवाखान्यात नेले. रात्रीच्या वेळी भाऊरावांनी आत्महत्येचा दुसरा प्रयत्न केला. दवाखान्याच्या खिडकीची काच फोडून त्याचे लहान तुकडे खाऊन त्यावर कंदिलातील रॉकेल पिऊन टाकले. त्यातूनही भाऊराव वाचले. शौचावाटे हे तुकडे निघून गेले. भाऊरावांकडून पाहिजे ते जबाब मिळत नसल्याने, कंटाळून कोल्हापूरच्या पोलिसांनी दुसरा कट रचला. सातारला भाऊराव ज्या अंबुबाई मुद्रावळ्यांच्या घरात राहात होते तेथे डांबर प्रकरणाचे काही बनावट कागद टाकून ते भाऊरावांचे आहेत हे कोर्टापुढे आणण्यासाठी अंबूबाईंना लाच देण्याचा प्रयत्न केला. पण एकनिष्ठ अंबूबाईने भाऊरावांवरील प्रेमाने या कटात सामील होण्याचे साफ नाकारले. एवढेच नव्हे तर त्यांनी सातारच्या देशमुख फौजदारांना सांगून कोल्हापूर पोलीस त्यांना त्रास देत असल्याचे सांगून त्यांच्यावरच डाव उलटविला. श्री. देशमुखांनी कोल्हापूरच्या पोलिसांना ब्रिटिश नागरिक असलेल्या अंबुबाई मुद्रावळ्यांना त्रास दिल्याच्या सबबीवर अटक करण्याची धमकी देताच, ते हात हालवीत कोल्हापुरास परतले. त्यांनी सदरची बाब मुंबई प्रांताच्या पोलिसाकडे सोपविली. श्री. रा. ह. पागे नावाच्या ब्रिटिश हद्दीतील सी. आय. डी. पोलीस अधिकाऱ्याकडे भाऊरावाविरुद्ध साक्ष मिळविण्याचे काम सोपविण्यात आले. पागेनी सातारच्या गणपत मांग या खबऱ्यास भाऊरावाविरुद्ध साक्ष देण्यासाठी कोल्हापुरास आणले. कोर्टात भाऊरावास पहाताच गणपत मांग उत्तरला, "कोण! भाऊ पाटील मास्तर! नाहीबा! असल्या देवमाणसांविरुद्ध मी साक्ष देणार नाही." गणपत मांगाच्या पोरास भाऊरावांनी मांगवाड्यात जाऊन शिकविलेले होते. उलट त्याने भाऊरावांचे पाय धरले. कोर्टात हे दृश्य अनोखे होते. श्री. पाग्यांचे प्रयत्न

निष्फळ ठरले. शेवटी भाऊरावाविरुद्ध डांबर फासण्याचे कटात काहीच हाती लागत नाही असे दिसल्यावर त्यांच्यावर चोरीचा व आत्महत्येचे आरोप ठेवण्यात आले. चौकशीच्या काळात त्यांना तुरुंगात ठेवण्यात आले होते. कोर्टात पहिला आरोप सिद्ध होऊ शकला नाही. त्यांना दुसऱ्या आत्महत्येच्या आरोपाखाली शिक्षा झाली.

८) भाऊरावांना अटक केल्यानंतर मातोश्री गंगाबाई कोल्हापुरात भाड्याचे घर घेऊन राहिल्या. त्यांनी कोल्हापूरच्या पोलीसप्रमुखास भेटून भाऊरावास सोडण्यास विनविले. फर्नांडिस म्हणाला, "बाई, ही सारी तुमच्या माणसांचीच करणी आहे. महाराजांचा त्यात काही संबंध नाही." तेव्हा गंगाबाईंनी शाहू महाराजांना सोनतळी कॅम्पच्या वाटेवर आडवे जाऊन भाऊरावास सोडण्याची विनंती केली, "महाराज, मी तुमची धर्माची बहीण आहे." म्हटल्यावर महाराजांनी मातोश्री गंगाबाईच्या डोक्यावर आशीर्वादाचा हात ठेवला; व श्री. घाटगे नावाच्या वकिलामार्फत अर्ज करावयास सांगितले. दरम्यान महाराजांनी आपल्या कोठीवाल्यास गंगाबाईंना लागेल तो कोरडा शिधा द्यावयास सांगितले. इकडे साताऱ्यात भाऊरावांचे वडील पायगौंडा पाटलांनी सातारचे वकील डोसाभाईमार्फत साताऱ्च्या कलेक्टरना अर्ज करून ब्रिटिश सरकारच्या सेवेत असलेल्या नागरिकाच्या मुलास कोल्हापूरचे पोलीस त्रास देत असल्याने कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटना कळवून त्यांची सुटका करण्याविषयी लिहिले. शेवटी २५ जानेवारी १९१५ च्या सुमारास भाऊरावांची कोल्हापूरच्या तुरुंगातून सुटका झाली.

९) भाऊरावांना सोडण्यापूर्वी श्री. निटवे आदींनी सौ. गंगाबाईंना गाठून भाऊरावास पोलीस सांगतात तसा जबाब देण्यास मन वळविण्यास सांगितले. त्या धीट आणि धाडसी मातेने या नतदृष्टांना पुढीलप्रमाणे उत्तर दिले व त्यांचे तोंड व कारवाया बंद केल्या. त्या म्हणाल्या, "माझा भाऊ आपल्या गुरुविरुद्ध खोटी साक्ष देणार नाही. तुम्ही मला कितीही प्रलोभने दाखविली तरी मी त्यास बळी पडणार नाही. खोटे बोलण्यापेक्षा माझा मुलगा मेला तरी मी दुःख मानणार नाही. मला तीनच मुलगे होते असे यापुढे

मानीन. निघा इथून." अशा या धीट व धाडसी मातेच्या मुलाकडून भविष्यात अलौकिक काम होणार होते, म्हणून ते या कोल्हापुरी अजगरी विळख्यातून सहीसलामत वाचले.

१०) भाऊरावांना कोल्हापुरातील तुरुंगातून घरी नेण्यासाठी सकाळी १० च्या सुमारास त्यांचे आईवडील जेलवर गेले. जेलमधून बाहेर पडताना भाऊरावास पुन्हा अटक होण्याची शक्यता पायगौंडा पाटलांना कोणीतरी दिली होती. पोलिसांनी भाऊराव बाहेर पडताच प्रथम त्याने कोल्हापूर पोलीसप्रमुखांना भेटले पाहिजे असे सांगितले. पायगौंडा पाटलांनी "आम्ही तिकडेच निघालो आहोत," असे सांगून पोलिसांना चकविले. ज्या टांग्यात ते बसले होते त्या टांगेवाल्यास स्टेशनवर लवकर चलण्यास सांगितले. भाऊरावास स्टेशनच्या आवारात सोडून, पायगौंडा पाटील रेसिडेंटच्या बंगल्यावर जाऊन पोलीस पुन्हा भाऊरावास पकडण्याच्या तयारीत असल्याचे निवेदन दिले. भाऊराव दुसऱ्या दिवशीच्या पहाटेस स्टेशनवरील कोल्हापूर पोलिसांचा डोळा चुकवून रेल्वेरूळाच्या बाजूने काही अंतर पळत जाऊन शेतामधून चालत, लपत छपत ता. २६-१-१९१५ रोजी दुधगावला येऊन पोहोचले. तेथे काही दिवस श्री. कुदळ्यांच्याकडे थांबले. या जीवघेण्या अटकेच्या काळात श्री. भाऊदादा कुदळे भाऊरावांचे १०-६-१९१४ चे पत्र घेऊन साताऱ्चे कलेक्टर, कोल्हापूरचे पोलिटिकल एजंटना भेटून भाऊरावांना सोडविण्याची खटपट करीत होते. भाऊरावांच्या सुटकेचा आनंद त्यांच्या मातापित्याएवढाच त्यांची पत्नी सौ. लक्ष्मीबाई व भाऊरावांचा जीव वाचवणाऱ्या अंबुबाई मुद्रावळेना झाला. या दोघा स्त्रियांचा कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्यात अत्यंत त्यागमय असा मोलाचा वाटा आहे.

११) सुटकेनंतर काही काळ भाऊराव उद्विग्न होते. एके दिवशी त्यांची व कोल्हापुरातील विद्यार्थिदशेतील मित्र आत्मारामपंत ओगले यांची कुंडल (आताचे किर्लोस्करवाडी) स्टेशनवर अचानकपणे गाठ पडली. श्री. ओगले व किर्लोस्कर स्वदेशीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी या किर्लोस्करवाडीस स्वत:चे कारखाने सुरू केले होते. भाऊरावांचे

कोल्हापुरातील जीवघेणे प्रकरण ऐकून श्री. आत्मारामपंतांनी त्यांना आपल्या काच कारखान्याचे प्रमुख विक्रीप्रचारक नेमले व त्यांना मदत करण्याचे ठरविले. पुढे किर्लोस्करांनीही भाऊरावांना आपल्या कारखान्याच्या कामात विक्रीप्रचारक म्हणून नेमले.

१२) पुढे सन १९२० साली शाहू महाराजांनी हुबळीस सामाजिक परिषदेचे अध्यक्ष असताना तेथेच २७ जुलैस पत्र लिहून श्री. लठ्ठयांची डांबर प्रकरणाबद्दल क्षमा मागितली आहे. (श्री. लठ्ठयांचे मद्वाण्णाकृत चरित्र (१९७९) पृ. ६३ सोबत झेरॉक्स पत्र) या शिवाय ता. १६-१२-१९१८ रोजी श्री. लठ्ठेंची श्री. निटव्यांनी माफी मागितली होती. (लठ्ठे चरित्र, पृ. ६४)

■

प्रकरण सहावे

## स्वदेशी उद्योजकांच्या सहवासात

१) साडेसात महिन्यानंतर कोल्हापुरी पोलिसांच्या साडेसाती विळख्यातून बाहेर पडल्यावर, पुन्हा सातार्‍यात येऊन शिकवण्याचा व्यवसाय करण्याच्या बाबतीत भाऊरावांचे मन शंकाकुल झाले होते. अशा वेळी योगायोगाने सहाध्यायी आत्मारामपंत ओगले यांची भेट झाल्याचे मागील प्रकरणात सांगितले आहेच. किर्लोस्कर आयर्न वर्क्सच्या आवारातच ओगलेंनी आपला ओगले ग्लास वर्क्स १९१३ साली सुरू केला होता. त्यांना स्वदेशी कंदील व काच सामानाची विक्री करणारा मातब्बर प्रतिनिधी हवा होताच. भाऊरावांनी भारत विमा कंपनीचा प्रतिनिधी, कृषी सुधारणा सोसायटीचा संघटक म्हणून केलेले काम गाठीशी असल्याने ओगल्यांनी भाऊरावांस आपला फिरता विक्रेता नेमले. भाऊरावांनी दोन वर्षांत ओगल्यांचे भरीव काम केले. ओगल्यांच्या कंदील व काच सामानाचा मोठा उठाव केला. किर्लोस्करांच्या कारखान्याचे आवारातील जागा ओगल्यांना कमी पडू लागली. त्यांनी दोन वर्षातच १९१५ साली आपला कारखाना कराडच्या पूर्वेस औंध संस्थानच्या हद्दीतच हलविला.

२) भाऊरावांचे विक्रीतील कौशल्य श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या नजरेत भरल्याने त्यांनी भाऊरावांस आपल्या कारखान्याचे फिरते एजंट नेमले. ओगल्यांच्या नवीन कारखान्यास सुरू होण्यास

अवकाश होता. त्यामुळे भाऊरावांनी हे किर्लोस्करांचे काम स्वीकारले. भाऊरावांनी महाराष्ट्रभर हिंडून किर्लोस्करांच्या लोखंडी नांगराचा व चरकाचा उठाव केला. भाऊरावांचे वडील निवृत्त झाल्याने घर चालवण्याचा भारही भाऊरावांवर आला होता. किर्लोस्करांनी भाऊरावांना आपले सर्व कुटुंबच किर्लोस्करवाडीस आणण्यास लावले. भाऊराव किर्लोस्करवाडीच्या छोट्या वसाहतीतील सामाजिक कार्यकर्तेच होते. त्यांचेकडे नाटक, क्रिकेट, करमणुकीचे कार्यक्रम यांचे संयोजन असल्याचे शंकरराव किर्लोस्करांनी आपल्या 'शंवाकि' या आत्मचरित्रात म्हटले आहे. एवढेच नव्हे, तर ते कामगारांचे प्रतिनिधी होते. त्यांची गाऱ्हाणी श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करापर्यंत ते पोहोचवीत.

३) ज्या सत्यशोधक समाजाच्या नावाखाली भाऊरावांना कोल्हापुरात यमयातना भोगाव्या लागल्या होत्या त्या समाजाचे पुण्यातील व नगर जिल्ह्यातील कार्यकर्ते कोल्हापुरास येत. सातारा वाटेवरच असल्याने ओतूरचे डुंबरे पाटील, महामुनी यांचे जलसे साताऱ्यात होत असत. सन १९११ साली साताऱ्याला आल्यानंतर भाऊराव या जलशाकडे आकर्षित झाले होते. कोल्हापूरला शाहू महाराजांनी हे पुण्याकडील जलसे पाहिल्यानंतर त्यांना दिसून आले की खेड्यातील निरक्षर ग्रामीण जनतेस सत्यशोधक समाजाचे कार्य पटविण्यास वृत्तपत्रांपेक्षा जलसे अतिशय उपयुक्त आहेत. त्यांनी या जलशांना मदत देण्यास सुरवात केल्याने सातारा जिल्ह्यात सन १९१२ नंतर भाऊराव पाटोळे (भिलवडी), तातोबा यादव (कासेगाव), साबळे (शिवथर), रामचंद्र घाटगे (काले) या लोकांनी सातारा जिल्ह्यात सत्यशोधक जलसे, इस्लामपूर सत्यशोधक समाजाच्या विद्यमाने सुरू केले होते. भाऊराव पायगौंडा पाटील ऐतवडेकर या समाजाचे सभासद होते. (सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ, १९३४, पृ. ८-१०) भाऊराव या जलसेवाल्याबरोबर जिल्ह्यात हिंडत असत. ढोलकी वाजवण्याचे काम करीत, भाषणे देत, समाजाचा हेतू सांगत.

४) किर्लोस्करांच्याकडे काम स्वीकारल्यानंतरही लक्ष्मणरावांनी भाऊरावांना सत्यशोधक समाजाचे काम करण्यास मोकळीक ठेवली होती.

कारण या जलशातून भाऊराव आधुनिक पद्धतीचे स्वदेशी नांगर लाकडी नांगरापेक्षा उपयुक्त असल्याचे पटवून देत व लोखंडी नांगरासंबंधीचा गैरसमज काढून टाकीत. सन १९१६ ते १९२० या पाच सालातच सातारा, सोलापूर, पुणे या जिल्ह्यांत समाजाचा प्रचार मोठ्या प्रमाणावर झाला. सातारा जिल्ह्यात भाऊराव व केशवराव विचारे प्रमुख प्रचारक होते.

५) हे जरी खरे असले तरी या प्रचारातून अस्पृश्यतेचे व जातीनिर्मूलनतेचे आणि शिक्षणप्रसाराचे काम होत नाही हे भाऊरावांच्या व्यवहारी दृष्टीस आढळून आले. सन १९१५ फेब्रुवारी ते १९२१ च्या नोव्हेंबरपर्यंत भाऊराव किर्लोस्करवाडीस असताना ते महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात विदर्भापासून ते कारवारपर्यंत, तसेच शहरी विभागातून उभेआडवे हिंडून सत्यशोधक समाजाचा तसेच किर्लोस्करांच्या अवजारांचा प्रचार करताना त्यांना दिसून आले की सारा समाज जातीपातीने विभागला आहे. अज्ञानाने राजकीय दृष्ट्या इंग्रजांच्या गुलामगिरीत, धार्मिक, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या पुढारलेल्या, मग ते कोणी ब्राह्मण असोत, पुरोहित असोत की जमीनदार असोत, त्यांच्या गुलामगिरीत तो अडकलेला आहे. यांवर त्यांना उपाय दिसला तो विद्येचाच. महात्मा फुल्यांनी म्हटल्याप्रमाणे 'पट्टीपुरती' तरी अडाणी जनतेस विद्या मिळालीच पाहिजे असे त्यांना वाटे. सन १९१७ साली व्हाईसरॉयने जाहीर केले होते की, पहिल्या युद्धाच्या शेवटी भारतीय जनतेस ब्रिटिशांकडून राजकीय सवलतीचा एक हप्ता दिला जाईल.

६) सत्यशोधक समाजातील श्रीमंत व उच्चवर्णीय मंडळी ब्राह्मणेतर पक्ष स्थापून राजकारणात शिरण्याच्या व सत्तेत भागीदारी मिळविण्याच्या तयारीत होती. सन १९२० साली पुण्यास जेधे मॅन्शनमध्ये १२-१२-१९२० रोजी श्री. जगदेवराव ऊर्फ भाऊसाहेब महाराज पवार यांच्या अध्यक्षतेखाली ब्राह्मणेतर पक्ष स्थापण्यात आला. भाऊरावांच्या लक्षात आले की राजकारणाच्या पाठीमागे लागल्यास सत्यशोधक समाजाचे सामाजिक व शैक्षणिक सुधारणेचे काम होणार नाही. अशा वेळी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सत्यशोधक समाजाची परिषद ता. २५ सप्टेंबर १९१९

रोजी काले, ता. कराड या गावी भरली होती. कृ. भा. बाबरासारखे सत्यसमाजिस्ट लेख लिहून सांगत होते की, भारत सेवक समाजासारखी संस्था स्थापून आजन्म सत्यसमाजाचे काम करणारे कार्यकर्ते पाहिजेत. (हीरक महोत्सव ग्रंथ, १९३४, पृ. २६) भाऊरावांच्या दृष्टीपुढे खेड्यातील सामान्य शेतकरी 'रयत' असल्याने त्यांनी या सभेत 'रयत शिक्षण संस्था' स्थापण्याचा ठराव मांडला व तिच्याद्वारा सत्यशोधक समाजाचे 'सत्य आणि नित्य' असलेले शैक्षणिक कार्य करण्याचे ठरविले. ठराव एकमताने पास झाला. मात्र तिच्यामार्फत शाळा वगैरे तात्काळ सुरू न करता दुधगावच्या धर्तीवर विद्यार्थी वसतिगृह सुरू करण्याचा पूरक ठराव मांडला तोही पास झाला. काल्याच्या सत्यसमाजिस्टांनी विशेषत: दाजी पाटील, नारूकाका खोत, भाऊराव चौगुले व बंडोबा शेटे यांनी वसतिगृहाची जबाबदारी स्वीकारण्याचे कबूल केले. ४-१०-१९१९ रोजी दसऱ्याच्या दिवशी हे वसतिगृह सुरू झाले व रयत शिक्षण संस्थाही स्थापन झाली. या वसतिगृहाच्या व्यवस्थापक समितीच्या अध्यक्षपदी सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष धनजीशा कूपर या पार्शी गृहस्थास निवडण्यात आले. सन १९२२ सालच्या र. शि. संस्थेच्या अहवालानुसार काल्याच्या वसतिगृहात २० मुले होती. त्यांची वर्गवारी अशी :- मराठे ९, जैन ३, मुसलमान ३, कोष्टी १, परीट १, लिंगायत १, न्हावी १, कुंभार १. सन १९२४ साली साताऱ्यात वसतिगृह सुरू झाल्याने हे वसतिगृह बंद झाले.

७) भाऊरावांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य असे की, नवीन कार्याची आव्हाने स्वत:च उभी करावयाची व ती स्वत:च यशस्वी करून दाखवावयाची. पहिल्या आव्हानाचे यश दुसऱ्या आव्हानाचे बीज ठरे. सन् १९१९ पासूनच भाऊरावांच्या विचारात व कृतीत कमालीची एकवाक्यता दिसून येते. श्री. एच. जी. स्टेड नावाचे शिक्षणतज्ज्ञ म्हणतात, "शिक्षणशास्त्र्यापुढे दोन प्रकारची आव्हाने असतात. पहिले आव्हान असते ते समाजासंबंधीचे. तात्कालीन समाजाची चिकित्सा करून, जरूर तर तिच्यावर गुणदोषात्मक टीका करावी लागते. त्याच वेळी दुसरे आव्हान

असे असते की, समाजाच्या उगवत्या पिढीच्या सुयोग्य वाढीस जराही धक्का न लावता, योग्य वेळी योग्य त्या रचनात्मक शैक्षणिक सोयीसवलती त्यांच्यासाठी निर्माण कराव्या लागतात." (समाजाचे शिक्षण : आजचे व उद्याचे, लंडन विद्यापीठ प्रेस, १९४४, पृष्ठ ६) भाऊरावांच्या कार्याचे स्वरूप याच प्रकारचे होते. सत्यशोधक चळवळीद्वारे समाजाची गुणदोषात्मक चिकित्सा त्यांनी केली व रयतशिक्षण संस्थेच्या माध्यमातून उगवत्या ग्रामीण तरुण पिढीसाठी रचनात्मक शैक्षणिक सोयीसवलती उपलब्ध केल्या.

८) भारतीय नेत्यांपुढे व सामाजिक कार्यकर्त्यांपुढे सगळ्यांत मोठे आव्हान पूर्वी होते व आजही आहे ते राष्ट्रीय व सामाजिक एकात्मता साधण्याचे. इंग्रजांच्या 'फोडा व झोडा' या नीतीमुळे हे एकात्मतेचे काम अतिशय कठीण झाले होते व आजही आहे. भाऊरावांना हे दुर्घट काम जात, पंथ, गोत व धर्मविरहित वसतिगृह युक्त शिक्षणाच्या माध्यमातून साध्य करता येईल अशी खात्री होती. नियोजित वसतिगृहातून तयार होणाऱ्या नवीन पिढीचे मानसिक उन्नयन व उदात्तीकरण झाल्यास अस्पृश्यतेच्या भावनेस आळा बसेल. समतेची भावना रुजेल याची त्यांना जाण होती. हा त्यांचा द्रष्टेपणा अपूर्व होता. कारण भाऊरावांच्या पहिल्या वसतिगृहानंतर बेचाळीस वर्षांनी सन १९६१ साली भावनगरला भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस समितीने राष्ट्रीय व भावनिक एकात्मतेसाठी एक शपथ तयार केली. जातीजमातीतील भांडणे व वाद मिटविण्यासाठी लोकांनी शांततामय मार्गाचाच अवलंब करावा अशी ती शपथ होती. भारत सरकारनेही भावनिक एकात्मतेसाठी उपाय सुचविण्यासाठी एक समिती याच साली नेमली. दीर्घ विचाराअंती या समितीने विविधांगी शिक्षण हाच भावनिक एकात्मतेस उपाय आहे असे सुचविले; आणि शाळा व महाविद्यालये यांत भावनिक एकात्मता समित्या स्थापण्यास सांगितले.

९) सन १९०२ पासूनच कोल्हापुरात भाऊरावांवर प्रागतिक विचारांच्या लाटा आदळून त्यांची मानसिक घडण आमूलाग्र बदलून टाकीत होत्या. पहिली लाट आली शाहू महाराजांच्या विचारांची,

मागासलेल्या समाजाच्या प्रगतीसंबधीची. कोल्हापुरातच भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे आदींच्या सान्निध्यात महात्मा फुल्यांच्या विचारांची दुसरी लाट आली. तिसरी लाट आली ती महर्षी विठ्ठल रामजी शिंद्यांच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कार्याची आणि शेवटी १९२१ साली लाट आली ती महात्मा गांधींच्या व १९३९ साली संत गाडगेबाबांच्या विचारांची.

१०) किर्लोस्करांकडे विक्रेता प्रतिनिधी म्हणून काम करताना भाऊराव सूटबूट आदी पाश्चात्य पद्धतीचा पेहराव करीत असत. कापडही पाश्चात्त्य होते. १७ नोव्हेंबर १९२१ रोजी ब्रिटिश राजपुत्रास मुंबईकर राजनिष्ठातर्फे मानपान व सत्कार आयोजित केलेला होता. महात्मा गांधींनी या समारंभावर बहिष्काराचे हत्यार उपसले होते. राजपुत्राच्या निषेधार्थ परदेशी कपड्यांची होळी करण्याचे ठरविले होते. याप्रसंगी चौपाटीवरील म. गांधींचे रचनात्मक कार्यक्रमावरील भाषण व त्यातील स्वदेशीच्या पुरस्कारार्थ परदेशी कपड्यांची केलेली होळी पाहून भाऊरावांनी आपल्या अंगावरील परदेशी कपड्यांची त्या अग्नीत आहुती दिली, व त्या दिवसापासून आजन्म खादी वापरण्याचे व्रत घेतले व पाळले. या सर्व महामानवांना भाऊरावांनी आपले वैचारिक गुरू मानले. रंजले गांजलेल्यांचे श्रेष्ठ सेवक गाडगे महाराजांना त्यांत वरचे स्थान होते. 'ज्यांचा मी घेतला गुण, तो तो गुरू मी केला जाण' या उक्तीप्रमाणे हे गुरू असले तरी भाऊरावांचे व्यक्तिमत्त्व स्वयंभू होते. कोणाच्या खांद्यावर उभे राहून ते मोठे झाले नव्हते. त्यांना मिळालेले मोठेपण व लौकिक स्वकष्टाने, स्वार्थत्यागाने व जनसेवेने मिळालेले होते. अनुभव हाच त्यांचा मोठ्यातला मोठा गुरू होता.

११) काले येथील वसतिगृह चालविताना येणाऱ्या आर्थिक अडचणींचा विचार करून भाऊरावांनी लक्ष्मणराव किर्लोस्करापुढे पुढील प्रस्ताव मांडले. (१) कारखान्याचे परिसरात शाळा व वसतिगृह सुरू करावे व कारखान्याच्या नफ्यापैकी १०% रक्कम कामगाराच्या मुलांच्या शिक्षणावर व कामगारांच्या कल्याणकार्यावर खर्च करावी. २) शक्यतो

कामगारांच्या मुलांना कारखान्यात अंशकालिक काम देऊन त्यांच्या शिक्षण व भोजनाचा खर्च परस्पर भागवावा. किर्लोस्करांना या प्रस्तावापैकी एकही अट मान्य नव्हती. भाऊरावांनी काल्याच्या परिषदेत रयत शिक्षण संस्थेची घोषणा केल्यानंतर तिचा पाठपुरावा करणे आवश्यक होते. शेवटी दोन वर्षांनी किर्लोस्करांकडील आपली नोकरी सोडण्याचे भाऊरावांनी ठरविले व राजीनामा दिला. लक्ष्मणराव किर्लोस्करांनी ता. २९-१०-१९२१ च्या पत्राने भाऊरावांचा राजीनामा मंजूर करताना म्हटलें, (इंग्रजीत) "त्यांनी (भाऊरावांनी) जाणीवपूर्वक अतिशय परिश्रम (कारखान्यासाठी) केले आहेत. सत्यशोधक समाजाकडे त्यांच्या मनाची ओढ असल्याने मी त्यांना सदर मार्गाने जाण्यास पूर्ण मोकळीक दिली होती. त्यांच्या कामाचा कारखान्याच्या हितास बाध येत नव्हता." भाऊरावांच्या बाबतीत लक्ष्मणरावांचा उदार दृष्टिकोन असण्याचे मुख्य कारण म्हणजे किर्लोस्करवाडीत अस्पृश्यता किंवा जातीभेदास प्रतिबंध होता. कारण कारखान्याचे रखवालदार अस्पृश्य समाजातले होते. कारखाना लहान असल्याने मालक व कामगारांत एककुटुंब भावना होती. याच पत्रात लक्ष्मणराव म्हणतात, "भाऊरावांच्या शुद्ध आणि देशभक्तीपर सेवेची नोंद कारखान्याच्या दप्तरी ठेवून अतिखेदाने त्यांचा राजीनामा एक नोव्हेंबर १९२१ पासून मंजूर करीत आहे. कारण मातृभूमीची अधिक चांगल्या तऱ्हेने सेवा करण्यासाठी ते आम्हास सोडून जात आहेत."

१२) यानंतर भाऊरावांनी नेर्ले, ता. वाळवा, जि. सांगली येथे प्राथमिक शाळेतील मुलांसाठी दुसरे वसतिगृह ता. ८ डिसेंबर १९२१ रोजी सुरू केले. याप्रसंगी सातारा जिल्हाधिकारी एन. एल. मॉयसी यांनी (इंग्रजीत) भाऊरावांस 'सत्यसमाजिस्ट शिरोमणी' असे उल्लेखून गौरव केला. "ते सत्यसमाजाचे सच्चे सत्यशोधक असून शिक्षणाच्या माध्यमातून ते सत्य इतरांपर्यंत पोचविण्याचा त्यांचा हेतू आहे," असे म्हटले आहे. या भाषणातूनच या प्रकारची अनेक वसतिगृहे सुरू करण्याचा भाऊरावांचा हेतू स्पष्ट केला आहे.

१३) सन १९२२ साली काल्याच्या वसतिगृहाचे अध्यक्ष

असलेले श्री. धनजी शाह कपूर यांना किर्लोस्करांप्रमाणे नांगरांचा कारखाना काढावयाचा होता. या बाबतीत भाऊरावांचे सहकार्य त्यांनी मागितले. भाऊरावांनी किर्लोस्करांना ज्या अटी घातल्या होत्या त्या व कामगारांना भागधारक करणे ही अट मान्य असल्याचे तोंडी कबूल करून कूपरनी भाऊरावांस सातारा रोड येथे 'दि सातारा इंडस्ट्रिअल वर्क्स' या नावाने कारखाना सुरू करण्यास नेले. श्री. के. सी. ठाकरे यांनाही आपल्या प्रबोधनपत्रिकेसह भाऊरावांनी सातारा रोड येथे कूपरच्या मदतीसाठी आणले. दोन वर्षांत सातारा रोडला हा कारखाना नांगर तयार करू लागला. नफा होऊ लागला. धनजी शाह कूपरनी दिलेली आश्वासने मोडली. भाऊराव चिडले. त्यांनी आपल्या जवळ असलेल्या बंदुकीने कूपरला खलास करण्याचे ठरविले. सौ. लक्ष्मीबाई यावेळी सातारा रोडलाच असल्याने पळत जाऊन श्री. ठाकऱ्यांना प्रेसमध्ये अनर्थाची कल्पना दिली. हातातले काम टाकून श्री. ठाकरे भाऊरावांच्या पाठीमागे पळाले व त्यांनी भाऊरावांच्या हातातली बंदूक हिसकावून घेतली. त्यातल्या गोळ्या काढून ती रिकामी केली. भाऊराव श्री. ठाकऱ्यांना 'दादा' म्हणत. या प्रसंगाचा उल्लेख भाऊरावांनी १९४५ साली श्री. केशवराव ठाकऱ्यांच्या एकषष्ठीप्रसंगी केला. श्री. केशवराव दादांनी आपल्या 'रानवट' धाकट्या बंधूच्या संतापी स्वभावाचे व या प्रसंगाचे वर्णन आपल्या आत्मचरित्रात 'माझी जीवनगाथा' मध्ये केले आहे. (पृ. २९५-३०७)

१४) पुढे सप्टेंबर १९२४ मध्ये दोघांनी या कारखान्याशी व कूपरशी कायमचा संबंध तोडून टाकला व भाऊराव सातारला आले. त्या वेळी कूपरने आपल्या नेहमीच्या 'मधु तिष्टति जिव्हाग्रे' या पद्धतीने भाऊरावास उपदेश केला, "गावावर उपकार म्हणजे मढ्यावर शृंगार असे तुमचे काम आहे. पुन्हा विचार करा." पण कर्मवीरांचा - भाऊरावांचा निर्णय वज्रलेप होता. आता त्यात बदल होणे शक्य नव्हते. पुन्हा माघार नव्हती. लोण्याहून मृदू, वज्राहून कठीण अशा अंत:करणाचा तो नि:श्वास होता.

१५) भाऊराव व कूपर यातील हा लढा म्हणजे दोन प्रवृत्तींचा लढा

होता. भांडवलदार विरुद्ध कामगार, सरंजामदार विरुद्ध समाजसेवक, असत्य विरुद्ध सत्य. सत्याने असत्यापुढे, न्यायाने अन्यायापुढे क्षणभर माघार घेतली होती एवढेच! स्वत:च्या जीवनात भाऊरावांनी 'अपरिग्रहाचे' व्रत स्वीकारलेले असले तरी औद्योगिक संस्थाच्या बाबतीत 'परिग्रह प्रमाण' हे तत्त्व अंमलात आणण्याचा हा त्यांचा प्रयत्न होता. खाजगी व राखीव हितसंबंध असणाऱ्या भांडवलदारी उद्योगधंद्यात हे तत्त्व राबवणे किती कठीण आहे हे त्यांना वरील दोन कारखान्यांत दिसून आले. या प्रयोगांतही भाऊरावांचा द्रष्टेपणा दिसून येतो. बरोबर ४२ वर्षांनी कोठारी शिक्षण आयोगाच्या अहवालात भाऊरावांच्या विचाराशी समान विचार व्यक्त केले आहेत. "देशातील कारखान्यांनी औद्योगिक शिक्षणसंस्था कारखान्यास जोडून चालवाव्यात. तांत्रिक शिक्षणाचा आकृतिबंध औद्योगिक कारखाने व शिक्षणसंस्था यांच्या सहकार्यातूनच तयार होऊ शकतो. तांत्रिक शिक्षणाच्या संस्थातील शिक्षण कारखान्यात तयार होणाऱ्या मालाशी निगडित असले पाहिजे. इंग्लंडमध्ये सेवकांना देण्यात येणाऱ्या एकूण मजुरीच्या अडीच टक्के रक्कम तांत्रिक शिक्षणावर खर्च करण्याची कायद्याने तरतूद आहे." (कोठारी अहवाल, १९६४-६५, पृ. ३७१-३८३)

■

प्रकरण सातवे

# अक्रोडाची फळे

१) भाऊरावांनी आपल्या वसतिगृहातून शिकवून तयार केलेल्या विद्यार्थ्यांनी रयत शिक्षणसंस्थेत आजीव सेवक होण्याच्या शपथा साताऱ्यात २४-१०-१९३७ रोजी घेतल्या. त्या वेळी अध्यक्ष महर्षी वि. रा. तथा अण्णासाहेब शिंदे म्हणाले, "भाऊराव, तुम्ही भाग्यवान आहात, समाजसेवा ही अक्रोडाच्या झाडासारखी असते. या अक्रोडाच्या झाडास शंभर वर्षांनी फळे येतात. आजोबाने झाड लावल्यास त्याच्या खापरपणतूस फळे खावयास मिळण्याची शक्यता असते. बारा वर्षांच्या अवधीत तुम्हास एवढ्या मोठ्या संख्येने समाजसेवक 'परिव्राजक' मिळतात यापरते भाग्य ते कोणते ?" भाऊरावांचा हा गौरव करताना अण्णासाहेबांच्या मनात खंतही होती. कारण डिप्रेस्ड क्लासेस मिशनबद्दलचा त्यांचा कटू अनुभव होता. त्यांना असे आजीव सेवक मिळाले नाहीत.

२) भाऊरावांनी हे 'परिव्राजक' कसे तयार केले ते पाहू या. मागील प्रकरणात सांगितले आहेच की, सत्यशोधक समाजातील श्रीमंत व सरंजामदार मंडळी ब्राह्मणेतर पक्ष स्थापून सत्तेसाठी राजकारणात शिरण्याच्या तयारीत होती. अशा बेगडी सत्यशोधकांच्या सत्यशोधक समाजाबद्दलच्या निष्ठा संशयातीत नव्हत्या, हे भाऊरावांना कळून चुकले होते. स्वत: त्यांनी मात्र राजकारणापासून अलिप्त राहून सत्यशोधक समाजाचे प्रमुख कार्य असलेल्या शिक्षणावर लक्ष केंद्रित केले. कालेगावी र.

शि. संस्था स्थापून तिचे पहिले वसतिगृह तेथेच सुरू केले. भाऊराव म्हणजे सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेला, आर्थिक पाठबळ नसलेला, एक ध्येयवेडा माणूस. शाहू महाराजांप्रमाणे सत्ता आणि संपत्तीचे पाठबळ नसलेला खरा सत्यशोधक शेतकरी. शाहू महाराजांप्रमाणे अनेक वसतिगृहे सुरू करावयाची म्हणजे आर्थिक पाठबळ तर पाहिजे; पण त्यापेक्षा ती चालविणारी स्वत:ची निष्ठावंत माणसे पाहिजेत, ही भाऊरावांची भूमिका होती. स्वदेशी उद्योगपती लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या कारखान्यातून आर्थिक पाठबळ मिळविण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला. ज्या सामान्य जनतेसाठी, 'रयते'साठी संस्था स्थापन केली, तीच रयत आपल्यास आर्थिक पाठबळ देईल असे भाऊरावांना वाटत होते. ते खरे होते. म्हणून त्यांनी किर्लोस्करांची नोकरी सोडली.

३) दुसरे आपमतलबी उद्योगपती व धूर्त राजकारणी खानबहादूर धनजी शाह कूपर, स्वत:ला सत्यशोधक म्हणवीत होते. त्यांनी स्वत:चा सातारा इंडस्ट्रिअल वर्क्स उभा करण्यासाठी सरळ स्वभावाच्या भाऊरावांची मदत मागितली. भाऊरावांस वसतिगृह सुरू करण्यास मदत करण्याचे आमिष दाखविले व भाऊराव त्यास बळी पडले. श्री. कूपर म्हणजे गोडबोल्या, ढोंगी सत्यशोधकांचा प्रातिनिधिक नमुना होता. सन १९२२ साली शाहू महाराजांच्या मृत्युनंतर सत्यशोधक समाज चेतनाहीन होत चालला होता. भाऊरावांना सन १९१७ ते १९२१ या सालात सत्यशोधक समाज पुढाऱ्यांचा व त्यांच्या तत्त्वहीन अनुयायांचा आलेला अनुभव त्यांनी ता. १-११-१९२३ रोजी श्री. के. सी. ठाकरे यांच्या मदतीने सुरू करावयाच्या आपल्या 'कुऱ्हाड' साप्ताहिकाच्या 'प्रबोधन'मधील टीकात्मक जाहिरातीत प्रगट केला आहे तो असा :-

"जो उठला तो भोळ्या अज्ञानी जनतेला फसवून स्वत:ची तुंबडी भरतो. ब्राह्मणेतर म्हणवितो आणि जातिभेदाचा धिंगाणा घालतो. सत्यशोधक म्हणवितो आणि नवीन भिक्षुकशाहीचे थेर माजवितो; पण 'रयतेचा' खरा वाली कोण? ..... पुंडागुंडांनी आपल्या झोळ्या भरल्या. उनाड टोळभैरव, स्वयंसेवक बनले. ऐदी श्रीमंत जनतेचे अहंमन्य पुढारी

बनले. स्वार्थापुढे कोणाला काही दिसत नाही. आता नांगऱ्या पाटलाची 'कुऱ्हाड' (साप्ताहिक) लवकरच या सर्वांचा समाचार घेण्यासाठी सगळ्या महाराष्ट्रात आपल्या स्पष्ट बोलाचा धुमाकूळ घालणार आणि रयतेच्या वतीने तिच्या हक्कांसाठी बिनमुर्वतपणे झगडणार ! कुऱ्हाडीचा परमेश्वर - महाराष्ट्र, कुऱ्हाडीचे दैवत - महाराष्ट्र जनता; कुऱ्हाडीचा धर्म - महाराष्ट्र धर्म; कुऱ्हाडीचे साहित्य - सत्य.

"बस्स ! यापुढे कुऱ्हाडीला ब्राह्मण मान्य नाही; ब्राह्मणेतर मान्य नाही, सत्यशोधक मान्य नाही, कोणी नाही. जातिभेद व पक्षभेद रसातळाला नेऊन रयतेच्या लोकशाहीला खडबडून जागृत करीन, नाहीतर बोथट होऊन सांदीला पडेन हीच कुऱ्हाडीची प्रतिज्ञा." (बा. म. ठोकेकृत क. भा. पाटील, १९९३, पृ. ४२-४३)

४) या प्रास्ताविक जाहिरातीतून वाचकांच्या नजरेस येईल की, भाऊरावांना ब्राह्मणब्राह्मणेतर वाद किंवा जातीयवाद मान्य नव्हता. सन १९५८ च्या २३ जुलैस सातारा जिल्हा लोकल बोर्डाने भाऊरावांना मानपत्र दिले. त्यास उत्तर देताना ते म्हणाले, "आता ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद मोडून टाकण्याची वेळ आली आहे. त्या काळात ज्या घटना घडल्या त्या त्या काळास अनुरूप होत्या. त्या आता उगाळून उपयोग नाही." (उक्त ठोकेकृत ग्रंथ, पृ. २७३) या उत्तरातील विचारांचे मूळ 'कुऱ्हाड' साप्ताहिकाच्या या प्रास्ताविक जाहिरातीत आढळते. (सदर 'कुऱ्हाड' पत्र श्री. कूपरशी मतभेदामुळे निघाले नाही.)

५) साताऱ्याच्या परंपरावादी सनातनी ब्राह्मणांच्या मनात भाऊरावांविषयी एकदा ब्राह्मणद्वेष्टे म्हणून झालेला ग्रह लवकर निघाला नाही. ते भाऊरावांच्या वसतिगृहातून चाललेल्या या राष्ट्रीय व भावनिक एकात्मतेच्या व अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास 'सब गोलंकारी' म्हणून हिणवत व नाके मुरडतच राहिले. मात्र पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी व सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे श्री. रा. रा. काळे, डॉ. धनंजयराव गाडगीळ, डॉ. र. पु. परांजपे, डॉ. डी. जी. कर्वे, डॉ. जी. एस. महाजनी, प्रा. वा. गो. काळे, प्रा. डी. डी. वाडेकर, प्रा. व्ही. के. जोग, प्रा.

कृ. ग. लिमये आदी प्रज्ञावंत प्रागतिक विचाराची मंडळी भाऊरावांच्या कामाचे कौतुक करीत. सातारचे रा. ब. आर. आर. काळे व त्यांचे जामात डॉ. धनंजयराव गाडगीळ तर भाऊरावांच्या संस्थेच्या कार्याशी एकरूप होते.

६) सन १९२१ च्या मुंबईतील महात्मा गांधींच्या असहकाराच्या चळीवळीपासून भाऊराव त्यांच्या स्वदेशीच्या व रचनात्मक कार्यक्रमाच्या प्रभावाखाली येत होते. सुरवातीस महाराष्टातील प्रागतिक पक्षाचे व सत्यसमाजाचे लोक महात्मा गांधींच्या या असहकाराच्या चळवळीबद्दल नाराज व विरोधी होते. महात्माजींनीही असहकाराची ही चळवळ एकांगी आहे हे समजून चुकल्यावर महात्माजींनीही ती मागे घेतली. मात्र सत्यशोधक समाजावर ते टीका करीत. म. गांधींना कालांतराने कळून आले की, सत्यशोधकांची चळवळ सनातनी पुरोहितांच्या व जुलमी स्वकीयांच्यापासून सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आहे. तेव्हा त्यांचे मत बदलले. बेळगावला डिसेंबर १९२४ मध्ये काँग्रेसच्या अधिवेशनास समांतर ब्राह्मणेतर काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्यावेळी सरोजिनी नायडू या ब्राह्मणेतर अधिवेशनात हजर होत्या. त्यांच्याच सांगण्यावरून म. गांधींनी या ब्राह्मणेतर अधिवेशनास संबोधून आपल्या रचनात्मक कार्याची कल्पना दिली. यावेळी म. गांधींना कळून आले की सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्ष प्रांतिक स्वरूपाचा असला तरी त्यांची पाळेमुळे सामान्य शेतकरी रयतेत खोलवर रुजलेली आहेत. सत्यशोधक समाज वर्णभेद, जातीभेद मानीत नाही. अस्पृश्यतानिवारण व साक्षरताप्रसार, हिंदु-मुस्लिम एकता, ग्रामोद्धार, स्वदेशी यावर भर देतो, हे कळून आल्यावर त्यांना हा प्रांतिक समाज एकमुखी काँग्रेसमध्ये आला पाहिजे असे वाटले. केंजळचे मानसिंगराव जगताप, भाऊराव पाटील यांचेकडून सत्यशोधक समाजाचे काम, महात्मा फुले व शाहू महाराज यांचे अस्पृश्यतानिवारणाचे काम ऐकल्यावर त्यांनी सत्यशोधकांच्या अधिवेशनास आपले शुभसंदेश दरवर्षी पाठविण्यास सुरुवात केली. सन १९३० साली म. गांधींच्या अपेक्षेनुसार सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्ष काँग्रेसमध्ये विलीन झाला.

७) भाऊरावांच्या सातारच्या वसतिगृहास छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस
हे नाव देण्यास सन १९२७ साली महात्मा गांधी सातारला आले. त्यावेळी वरील परिस्थिती होती व भाऊराव खरे सत्यशोधक आहेत हे जाणूनच सातारकर सनातन्यांच्या विरोधास न जुमानता वसतिगृहाचे उद्‌घाटनास व नामकरणास
म. गांधी कबूल झाले.

८) सन १९२४ साली सप्टेंबरमध्ये दिल्लीत हिंदू-मुस्लिम दंगे झाले. त्यांच्या निषेधार्थ म. गांधींनी २१ दिवसांचे उपोषण केले. त्या सप्टेंबर महिन्यात भाऊरावांनी खानबहादूर कूपरशी संबंध तोडले आणि घोर प्रतिज्ञा केली की, "माझे वसतिगृह छ. शाहू महाजारांचे नावे काढीन आणि त्या वसतिगृहात माझ्या दाढीतील केसाइतकी मुले होईपर्यंत दाढी काढणार नाही व पायात वहाणाही घालणार नाही." कूपरला व तेथे हजर असणाऱ्यांना भाऊरावांची ही प्रतिज्ञा वेड्याचे स्वप्नरंजन वाटले असेल. 'सत्य संकल्पाचा दाता' परमेश्वर असतो ! पण हेही खरे की, भाऊरावांची ही प्रतिज्ञा म्हणजे त्यांच्या स्वत:च्या कर्तृत्वशक्तीस आव्हान व रयतेच्या दातृत्वशक्तीवर असलेल्या विश्वासाचे प्रतीक होते. त्यांच्या वाचेमागून कार्याचा अर्थ धावत होता. जणू भाऊरावांना नियती सांगत होती, "अरे वेड्या, तुझा संकल्प खरा आहे, स्तुत्य आहे, तेव्हा वाढव ना तुझे कार्यकर्ते तूच !"

९) मागील प्रकरणात शिक्षणशास्त्र्यापुढील द्विविध आव्हानांचे स्वरूप मी सांगितले आहेच. त्यातल्या दुसऱ्या आव्हानास सामोरे जाण्यास सन १९२४ साली दसऱ्याच्या मुहूर्तावर भाऊरावांनी सुरुवात केली. भाऊरावांनी आपल्या र. शि. संस्थेच्या स्थापनेस हाच मुहूर्त निवडला होता. साताऱ्यास आल्यावर आपल्या घरातच चार मुलांना घेऊन हे वसतिगृह सुरू केले. दोघे मानेबंधू-नाना व तुकाराम मराठा होते. शंकर संभाजी कांबळे - महार; तर स्वत:चा भाऊ बंडेंद्र जैन होता. या चार मुलांसह हे सातारचे वसतिगृह सुरू झाले. या चौघांना आपल्या घरीच भाऊराव जेवू घालीत

असत. त्यांची नावे साताऱ्याच्या शासकीय माध्यमिक शाळेत घातली. जून १९२५ साली काल्याचे वसतिगृह अडचणीमुळे बंद करून तेथील मुलांना साताऱ्यास येण्यास सांगितले. एकूण १३ मुले जून १९२५ मध्ये आली. त्यात नेर्ले व दुधगावचीही मुले आली. या सर्वांची निवासव्यवस्था भाड्याच्या इमारतीत व जेवणाची व्यवस्था खानावळीत करण्यात आली.

१०) जून १९२६ साली या वसतिगृहात मुले झाली चौतीस. भाड्याच्या इमारतीपैकी एक होती अंबुबाई मुद्रावळ्यांची. पुढे शाहू बोर्डिंग हाऊससाठी ती विकत घेण्यात आली व त्या इमारतीपुढील बखळीत बांधकाम करून सुमारे १५ ते २० मुले राहण्याची सोय करण्यात आली. सुरुवातीस खानावळवाले पंगतीप्रपंच करीत. अस्पृश्यांना खानावळीच्या बाहेर मोकळ्या जागेत जेवावयास वाढीत. भाऊरावांना ते पसंत नसल्याने त्यांनी प्रेस नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत जून १९२७ पासूनच दोन स्वयंपाकी बाया नेमून सर्व मुलांची एकत्र जेवण्याची सोय केली. तेथेच वसतिगृहाचे कार्यालयही थाटले. स्पृश्यास्पृश्यतेच्या चक्रातून जेथे विद्याविभूषित ब्राह्मण बाहेर पडू शकत नव्हते, तेथे या अडाणी खानावळवाल्यांना दोष देण्यापेक्षा व्यवहारी भाऊरावांनी वरीलप्रमाणे व्यवस्था केली. मुलेच पाळीपाळीने सर्व मुलांच्या पंगतीस जेवण वाढीत. काही मुलांना स्वयंपाक करण्यातही तरबेज करण्यात आले. त्यातूनच पुढे वसतिगृहाची 'क्लब' पद्धती सुरू झाली. त्याची माहिती पुढे येईलच.

११) सन १९२७ साली म. गांधींचा महाराष्ट्रात रचनात्मक कार्यक्रमाच्या प्रचारार्थ दौरा होता. ते साताऱ्यास येतील तेव्हा त्यांच्या हस्ते सदर वसतिगृहाचे नामकरण व्हावे म्हणून भाऊराव पाटलांनी म. गांधींचे खाजगी सचिव महादेवभाई देसाई यांच्याशी पत्रव्यवहार करून २५ फेब्रुवारी १९२७ ही तारीख ठरवून घेतली. परंतु साताऱ्याच्या भाऊरावद्वेष्ट्या सनातनी लोकांनी महादेवभाई देसाईंना वेडीवाकडी पत्रे लिहून सदर वसतिगृहाची भेट रद्द करविली. भाऊराव कच्च्या दिलाचे थोडेच होते? त्यांनी व्यवहारी मार्ग काढला. कऱ्हाड-सातारा जुन्या रस्त्यावर आपली वसतिगृहाची मुले म. गांधींजींच्या मोटारीस आडवी उभी केली.

म. गांधींची मोटार अडविल्यानंतर भाऊरावांनी सरळ प्रश्न केला, "बापूजी, माझ्या वसतिगृहाची भेट रद्द कां केली? काही नाराजीचे कारण?" या प्रश्नास उत्तर नव्हते. म. गांधी महादेवभाई देसाईंच्या तोंडाकडे पाहत राहिले. देसाई म. गांधीजींच्याकडे पाहत राहिले. शेवटी म. गांधींनी नामकरण समारंभास पूर्वी ठरल्याप्रमाणे येण्याचे कबूल केले. मुलांच्या व भाऊरावांच्या आनंदास पारावार राहिला नाही. सोमवार पेठेतील वसतिगृहाच्या इमारतीपुढे छोटा मंडप घातला होता. लोक दाटीवाटीने रस्त्यावरच उभे होते. त्यात काही सनातनी विरोधकही नाईलाजाने आले.

१२) इस्लामपूरहून कोल्हापूरच्या मिस् क्लार्क वसतिगृहात भाऊरावाने नेलेल्या ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप या हरिजन विद्यार्थ्यानेच हिंदीमध्ये म. गांधींचे स्वागत केले. घोलप यावेळी मुंबई कायदे मंडळाचे सभासद होते. त्यांनी स्वागतपर भाषणात सांगितले की, ब्राह्मणेतर बहुजनसमाजास व हरिजनास धर्माच्या नावाखाली शिक्षणापासून व सुधारणेपासून वंचित ठेवण्यास शिक्षित पुढारलेला वर्गच कारणीभूत आहे. ते पुढे म्हणाले, "आपल्यासारखा समाजाच्या रोगाचे निदान करून उपचार करणारा वैद्य निर्माण झाल्याने लोकांत स्वाभिमान, देशभक्ती व नवचैतन्य निर्माण झाले आहे." यानंतर वसतिगृहाचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल माहिती सांगून घोलप म्हणाले, "गेली अनेक वर्षे भाऊराव अस्पृश्य, मराठे व तत्सम मागासलेल्या समाजासाठी शिक्षण देण्याचे - स्वतःच्या पैशातून - काम करीत आहेत." यानंतर वसतिगृहातील मुलांची जातवार संख्या सांगितली ती खालीलप्रमाणे होती:

मराठा - १२, महार - ११, मांग - २, मुसलमान - २, धोबी - १, न्हावी - १, वडार - १, जैन - १, ब्राह्मण - १, लिंगायत - १, रामोशी - १.

भाऊरावांनी या वसतिगृहासाठी स्वतःच्या प्राप्तीतून रु. ६,०००/- खर्च केले व आतापर्यंत फक्त रु. १६३/- देणगी मिळाल्याचे सांगितले. संस्थेस 'रयत शिक्षण संस्था' म्हणण्याचे कारण सांगून या वसतिगृहास म. गांधींनी छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस हे नाव देण्यास विनंती

केली. या वसतिगृहातून जनतेचे नेते तयार व्हावेत म्हणून गरीब व हुशार विद्यार्थ्यांस जिल्ह्यातून हुडकून आणून येथे त्यांच्यावर संस्कार करण्याचा भाऊरावांचा हेतू असल्याचे सांगितले.

१३) म. गांधींना या वसतिगृहाचा इतिहास ऐकून आनंद झाला. यातील भिंगारदेवे व शेख या मांग व मुसलमान मुलांनी इंग्रजी चौथ्या यत्तेत संस्कृतमध्ये पहिला व दुसरा नंबर मिळविल्याबद्दल म. गांधींनी आपल्या गळ्यातला हार या मुलांच्या गळ्यात घालून त्यांचे कौतुक केले व म्हणाले, "साबरमती आश्रमात स्पृश्य-अस्पृश्य यांना एकत्र ठेवण्याचा माझा प्रयत्न यशस्वी झाला नाही. ते भाऊरावांनी करून दाखविले आहे. मी त्यांचे कौतुक करतो." यानंतर वसतिगृहाच्या नामफलकावरील पडदा बाजूस करून 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' असे नामकरण केल्याचे जाहीर केले. जाता जाता मिस्किलपणे ते भाऊरावांस म्हणाले, "महाराज से कितना पैसा लिया है।" भाऊराव म्हणाले, "मैने उनसे कुछ भी पैसा नही लाया। उनसे सिर्फ बडा दिल लिया है।" यावर म. गांधी हसले. यापुढे त्यांनी भाऊरावांच्या कार्यावर सतत लक्ष ठेवले. सन १९३३ साली जूनमध्ये पुण्यास म. गांधींचा मुक्काम असताना भाऊराव श्री. ठाकरे यांच्यासह त्यांना भेटून हरिजन फंडातून वसतिगृहास मदत मिळविण्यासाठी त्यांची शिफारस मिळविली. रु. ५००/- प्रमाणे पुढील चार वर्षे ही मदत हरिजन फंडातून मिळत राहिली.

१४) या नामकरणप्रसंगी अहवालात सांगितल्याप्रमाणे भाऊराव जिल्हाभर हिंडून प्राथमिक शाळेतील शिक्षकांना भेटून, हुशार मुलांच्या पालकांना भेटून त्यांच्या मुलांना वसतिगृहात सातारला पाठविण्यास सुचवीत. देऊ केलेल्या सवलती पालकांना सांगून त्यांची मने वळवीत. सन १९३४ पर्यंत सातारचे वसतिगृह चालविणे भाऊरावांची वैयक्तिक जबाबदारी होती.

१५) म. गांधींनी भाऊरावांच्या या राष्ट्रीय एकात्मता कार्याचे महत्त्व जाणून कौतुक केल्यानंतरही सातारच्या सनातनी समाजाने भाऊरावांच्या राष्ट्रीय कार्यास नाके मुरडण्याचे सोडले नाही. आणि भाऊरावही त्यांना फारशी किंमत देत नसत. कारण त्यांच्या वसतिगृहास

ग्रामीण जनताच मदत करीत होती. याला अपवाद मात्र रावबहादूर रा. रा. काळ्यांचा होता. सन १९२६ सालीच भाऊरावांच्या कार्यावर व चरित्रावर श्री. केशवराव ठाकरे यांनी 'प्रबोधना'त अग्रलेख लिहून या वसतिगृहास प्रथम प्रसिद्धी दिली. त्याच्या प्रती राज्यपाल, मंत्री व जिल्हाधिकारी यांना पाठविल्या. चुनिलाल मेहता हे महसूलमंत्री सातारा जिल्ह्यातील कोरेगावी आले असता भाऊरावांची व त्यांच्या कार्याची त्यांनी आठवण काढली. काही नतद्रष्टांनी एकांड्या भाऊरावांचे कार्य काही महत्त्वाचे नाही म्हटल्यावर श्री. रावबहादूर काळे ताडकन उठले व म्हणाले, "अहो, भाऊरावांचे कार्य लहान झरा आहे. जनतेच्या व प्रांतीय शासनाच्या मदतीने त्याचे नदीत रूपांतर झाल्यावर त्याचे राष्ट्रीय महत्त्व कळेल." मंत्र्यासमोर मुखभंग झाल्याने हे नतद्रष्ट गप्प बसले. भाऊराव हजर नव्हते म्हणून बरे; नाहीतर त्यांनी आपली सांदीत पडलेली 'कुऱ्हाड' त्यांना दाखविली असती. केशवराव ठाकरे यांच्या लेखामुळे व म. गांधींच्या भेटीनंतर नाही म्हटले तरी साताऱ्यातील भाऊरावांचे काम सातारा जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर लोकांना कळू लागले होते. विद्यार्थ्यांची संख्या वाढत होती. भाऊरावांना चार ठिकाणी असलेल्या मुलांची देखभाल करण्याचा त्रास होत होता. अशावेळी एक चांगली गोष्ट घडून आली.

१६) सातारच्या शाहू महाराजांची 'धनिनीची बाग' या नावाने प्रसिद्ध असलेली बाग बरीच वर्षे ओस पडून होती. योगायोगाने सातारच्या महाराजांचे कारभारी श्री. दत्तात्रय गोविंद कारखानीस यांनाही या समारंभानंतर भाऊरावांच्या कार्याचे महत्त्व जाणवले. भाऊरावांनी विनंती करताच सदरची बाग रु. ५७५/- खंडाने या वसतिगृहासाठी दिली. ही बाग ताब्यात मिळताच भाऊरावांतील शेतकरी जागा झाला. मुलांच्या वाढत्या संख्येमुळे या बागेत कडेने मुलांच्यासाठी झोपड्या बांधण्यात आल्या. मुलांना या बागेत राहण्यासाठी आणण्यात आले. बागेत दोन विहिरी असल्याने त्यातील पाण्याच्या आधारे भाजीपाला पिकविण्याची सोय झाली. शेतकऱ्यांचीच मुले असल्याने त्यांना बागेत काम करण्यास आवडत असे. 'स्वावलंबी शिक्षण', 'कमवा व शिका' या योजनांचे मूळ या सातारच्या

धनिनीच्या बागेत आहे. या बागेत मुले एकत्र राहू लागल्याने भाऊरावांना परगावी जाऊन मदत मिळविणे सोपे झाले. तसेच मराठी सातवीच्या परीक्षेचे केंद्र सातारा असल्याने या वसतिगृहात परगावच्या मुलांची व त्यांच्या शिक्षकांची सातवीच्या परीक्षेच्या काळात जेवणाची व राहण्याची मोफत सोय करण्याची प्रथा सुरू करण्यात आली. एवढेच नव्हे तर वसतिगृहप्रवेशाचे काटेकोर नियमही यानंतरच करण्यात आले. मुलांची संख्या भराभर वाढू लागली.

१७) आता वसतिगृहातील दिनचर्या सांगितली म्हणजे या वसतिगृहात मुले ठेवण्यास पालकांना का आवडत असे हे कळेल. या वसतिगृहासाठी पुढीलप्रमाणे ध्येय ठेवण्यात आले होते : "(१) वसतिगृहात दाखल झालेल्या मुलांना अतिशय कमी खर्चात प्रगतिकारक उदारमतवादी व परिणामकारक शिक्षण देणे, (२) खेड्यातील चुणचुणीत व हुशार मुलांना अभ्यासक्रम पुरा करण्यासाठी सोयी उपलब्ध करणे, (३) वसतिगृहात दाखल झालेल्या मुलांना एकत्र भोजन व निवास यातून जात, पंथ इ. भेद कृत्रिम व विनाशकारी आहेत हे पटवून ते नष्ट करण्यास मदत करणे, (४) वसतिगृहाचे विशेष व महत्त्वाचे अंग म्हणजे स्वावलंबन व श्रमाची प्रतिष्ठा मुलांत रुजवणे. त्यांना स्वत:ची निवासस्थाने व भांडीकुंडी स्वत:च स्वच्छ करावयास लावणे. स्वय़ंपाक, बाजारहाट स्वत:च करणे आणि बागेत भाजीपाला पिकवून त्याची विक्री स्वत:च करणे, (५) आणि रयतेच्या शिक्षणासाठी त्यागाने काम करणारे नेते व कार्यकर्ते तयार करणे."

१९२७ मध्ये धनिनीच्या बागेत वसतिगृह आणल्यानंतर एकत्रित राहू लागलेल्या मुलांना पहाटे पाच वाजता घंटेच्या नादाबरोबर उठावे लागे. पश्चिमेच्या बाजूस असलेल्या पत्र्याच्या पडवीत एकत्र जमून प्रार्थना झाल्यानंतर अभ्यासास बसावे लागे. या मुलांतून १० ते १२ मुलांचे गट केलेले असत. त्यापैकी एका गटाकडे एक दिवसाचा स्वयंपाक करण्याचे काम असे; या गटास 'क्लब' म्हणत. उरलेल्या अभ्यास करणाऱ्या मुलांवर भाऊरावांची देखरेख असे. मुलांमधून वयस्कर मुलास सेक्रेटरी व भोजन सेक्रेटरी निवडण्यात येई. भाऊरावांच्या गैरहजेरीत पहिला मुलगा मुलांच्या

अभ्यासावर लक्ष ठेवी. भोजन सेक्रेटरी वसतिगृहासाठी लागणाऱ्या बाजारहाटीवर लक्ष ठेवी.

१८) सकाळी साडेआठच्या दरम्यान नेमलेल्या गटास बागेत एक तासभर काम करावे लागे. रविवारी सर्व मुले जादा काम करीत. जेवणात ज्वारीची भाकरी, भाजी, आमटी व भात यांचा समावेश असे. पंधरवड्यातून एकदा गव्हाची खीर किंवा जमल्यास लाडू, भजी, भात व आमटी असे. प्रत्येकास स्वत:चे ताट, वाटी व तांब्या असे. ती भांडी त्यांना स्वत:च स्वच्छ करावी लागत. याशिवाय मुलांना धान्य, भाजी निवडावी लागे. भोजनासाठी पाळीप्रमाणे चटणी कुटावी लागे. मुले विहिरीच्या पाण्याने आंघोळी करीत व कपडे धूत. विहिरीवर इंजिन व पंप होता. कोणीही नोकर लावलेला नसे. भाऊराव परगावी देणग्या मिळविण्यासाठी व धान्यवसुलीस गेल्यावर सौ. लक्ष्मीबाई पाटील लहान मुलांच्यावर देखरेख ठेवीत. आजारीपणात मोठ्या मुलांच्या मदतीने औषधोपचार करीत. ही बाग सुमारे अकरा एकर अडतीस गुंठ्यांच्या दरम्यान होती. बागेत आंबा, नारळ, फणस यांची झाडे होती. बागेतील नारळ, आमटीसाठी व चटणीत वापरीत. कोथिंबीरही तयार केली जात असे. आंब्याच्या दिवसांत मुले झाडावर चढून आंबे काढीत या बागेत मध्यभागी मोकळी जागा होती. मुले त्याचा खेळण्यासाठी उपयोग करीत परीक्षेच्या दिवसांत मुले आंब्याच्या व फणसाच्या सावलीत अभ्यास करीत धनिनीच्या बागेतील हे वसतिगृह एक मुक्त विहाराचे रमणीय ठिकाण होते. म्हणून पुढे या वसतिगृहास मान्यताप्राप्त सुधारगृह म्हणून तत्कालीन शासनाने मान्यता दिली व बालगुन्हेगारांना शिक्षणासाठी येथे पाठविले जात असे. या वसतिगृहात आलेली ही मुले येथील रम्य वातावरणात तात्काळ रमून जात व पळून जाण्याचे नाव घेत नसत.

१९) सामान्यपणे सातवी पास झालेली मुले या वसतिगृहात दाखल केली जात. यात चार प्रकारची मुले असत. शिष्यवृत्ती मिळवणारी मुले आपला भोजनखर्च या शिष्यवृत्तीतून भागवीत. घरची आर्थिक परिस्थिती उत्तम असणारी मुले पूर्ण भोजनखर्च देत. त्यापेक्षा आर्थिक

परिस्थितीने दीन असणारी मुले निम्मा भोजनखर्च देत. मातृपितृविहीन मुले पूर्णपणे मोफत दाखल केली जात. त्यांचा खर्च भाऊराव धान्य व पैसेरूपाने मिळालेल्या देणगीतून व स्वत:च्या प्राप्तीतून भागवीत. सुधार गृहयोजनेखालील मुलांचा खर्च शासनाकडून मिळे. भाऊरावांच्या वसतिगृहाचा हा ढाचा एकदाचा ठरून गेल्यानंतर महाराष्ट्रात, त्यांनी सुरू केलेल्या माध्यमिक शाळांस जोडून असलेल्या वसतिगृहातही अवलंब केल्याचे दिसून येते.

तक्ता नं. १ (संबंधित वर्षाच्या अहवालावरून)
छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसमधील मुलांची जातवार संख्या

| जात | १९४१-४२ | १९४२-४३ | १९४३-४४ | १९४४-४५ |
|---|---|---|---|---|
| मराठा | १५१ | १६२ | १३४ | १६० |
| रजपूत | १ | १ | १ | २ |
| धनगर | ८ | १० | ६ | ५ |
| कोष्ठी | १६ | १० | १२ | ११ |
| शिंपी | ४ | १ | ४ | ५ |
| न्हावी | २ | ३ | २ | ३ |
| माळी | १ | १ | ५ | ३ |
| लिंगायत | २ | १ | ४ | ९ |
| गुरव | ५ | ४ | ३ | २ |
| गोसावी | १ | १ | २ | २ |
| परीट | १ | २ | २ | २ |
| मद्रासी | २ | २ | २ | २ |
| सुतार | ४ | ४ | ३ | १ |
| ब्राह्मण | ६ | ४ | ४ | १३ |
| तेली | - | १ | १ | - |
| मुसलमान | १७ | २४ | २४ | २२ |
| सोनार | - | - | - | २ |
| ख्रिस्ती | ५ | - | - | - |
| जैन | २० | १४ | १५ | १४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| साळी | ३ | ६ | ६ | ६ |
| भोई | १ | १ | १ | - |
| कुंभार | ६ | ६ | ३ | १ |
| डवरी | ३ | १ | १ | - |
| लोहार | १ | - | - | -१ |
| कोळी | १ | - | - | - |
| महार | ७६ | ८१ | ७२ | ९० |
| मांग | २९ | २८ | २९ | ३४ |
| चांभार | २२ | २३ | २३ | २८ |
| रामोशी | १२ | ९ | ८ | १० |
| कैकाडी | ५ | २ | १ | १ |
| ढोर | ३ | २ | २ | ३ |
| व्हल्हार | - | - | १ | १ |
| बुरूड | १ | १ | १ | १ |
| वडार | १ | - | २ | ३ |
| वाणी | १ | २ | २ | - |
| मारवाडी / गुजर | १ | १ | - | १ |
| | ४१२ | ४०८ | ३७६ | ४३८ |

या मुलांमध्ये सुधारगृहांसाठी आलेली मुले आहेत. या मुलांपैकी माध्यमिक शाळेत जाणारी, प्राथमिक शाळेत जाणारी, ट्रेनिंग कॉलेजमध्ये जाणारी व औद्योगिक शाळेत जाणारी मुले होती.

२०) सन १९२८ साली या वसतिगृहातून फक्त २ मुले मॅट्रिक परीक्षेत बसून पास झाली. तेव्हापासून या वसतिगृहातून मॅट्रिक पास झालेल्या मुलांची उच्च शिक्षणाची सोय पुणे, मुंबई, कोल्हापूर, सांगली, बडोदा व बेळगाव येथे परिस्थितीनुसार व सवलती मिळण्यानुसार करण्यात येत असे. सन १९३७ साली या सातारच्या वसतिगृहातून महाविद्यालयात शिकणारी सुमारे ४५ मुले होती. त्यापैकी वीस पदवीधर झाली होती. या

वसतिगृहातून समाज कार्यकर्ते, नेते तयार व्हावेत, हे ध्येय असल्याने, आपण केलेले संस्कार या पदवीधर मुलांत किती रुजले आहेत हे पाहण्यासाठी, व हे पदवीधर आपले अनुयायी म्हणून किती तयार होतात, हे पहाण्यासाठी द्वादश वार्षिक समारंभ धनिनीच्या बागेत महर्षी अण्णासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेतला होता. ही भाऊरावांची तसेच मुलांची सत्त्वपरीक्षा होती. भाऊरावांची अपेक्षा किमान १२ अनुयायांची होती. या समारंभासाठी या मुलांना चर्चा करून बोलावून घेण्यात आले होते. अठरा मुले हजर होती. भाऊरावांना कार्यकर्त्यांची आवश्यकता प्रकर्षाने जाणवत होती. कारण दोन वर्षांपूर्वीच सातारला प्राथमिक शिक्षकासाठी ट्रेनिंग कॉलेज सुरू केले होते. अठरापैकी पुढील दहाजण संस्थेचे आजीव सभासद राहिले. (१) नानासाहेब रामचंद्र माने (२) अब्दूलगनी दादामिया अत्तार (३) बाबुराव महादेव ठोके (४) शंकर ज्ञानदेव महादार (५) शांताराम भाऊराव काकडे (६) शंकर कृष्णाजी उनउने (७) रामकृष्ण वेताळ खैरमोडे (८) दिनकर रामचंद्र माने (९) आय. एम. एस. मुल्ला (वकील) साताऱ्यात राहून वकिली करत विनावेतन मानसेवी सचिव म्हणून काम करीत राहिले. (१०) रामचंद्र मनोहर नलावडे (वकील) भाऊरावांच्या सम्मतीनेच राजकारणात पडले व नंतर राजकारण सोडून संस्थेचेच काम करीत राहिले. इतर आठ मुले भाऊरावांच्या संमतीनेच शासकीय सेवेत, राजकारणात व इतरत्र नोकरीस गेली. या आठ व इतरही मुलांना संस्थेबाहेर सेवेस जाऊ देण्यात भाऊरावांचा हेतू हा की, ते संस्थेबाहेर गेले तरी संस्थेच्या संस्कारांचे व ध्येयधोरणाचे पुरस्कर्ते, हितचिंतक खासच राहतील व तसे ते राहिले.

२१) भाऊरावांनी पुढील दोन सालानंतर या तरुण पदवीधर शिष्यांवर वसतिगृहाचा व इतर शाखांचा कारभार सोपवून संस्थेचा व्याप वाढविण्यास ते मुक्त झाले.

२२) अनंत अडचणीतून या पदवीधर मुलांना स्वतःच्या मुलाप्रमाणे भाऊरावांनी वाढविले होते. त्यांच्या जेवणाखाणापासून ते फी भरण्यापर्यंतचा भार भाऊरावांनी वाहिला होता. भाऊरावांच्या जीवनातला

हा मोठा आनंदाचा क्षण होता. कारण हे आजीव सभासद स्वाभिमानाने थोड्या वेतनावर काम करून संस्थेची शान वाढवीत तर होतेच, पण लाचारीही कधी दाखवीत नसत. म्हणूनच महर्षी अण्णासाहेब शिंदे म्हणाले की, कर्मवीर भाऊरावांना बारा वर्षांच्या अविरत समाजसेवारूपी अक्रोडाच्या झाडाची कमीत कमी १२ फळे चाखावयास, खावयास १२ आजीव सेवकांच्या रूपाने मिळाली.

या स्तुतीने हुरळून न जाता भाऊरावांनी आपल्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे स्वत:पुढे दुसरे आव्हान उभे केले, ते पाहू या.

प्रकरण आठवे

# रयत शिक्षण संस्थेची घटना व प्राथमिक कार्य

१) सहाव्या प्रकरणात रयत शिक्षण संस्था काले गावी स्थापन केली असल्याचे सांगितले आहेच. परंतु रयत शिक्षण संस्थेची घटना व तिची सन १८६० च्या संस्थानोंदणी कायद्याखाली नोंद असल्याशिवाय तिला शासनमान्य शैक्षणिक संस्था सुरू करता येत नसे. संस्थेच्या इतिहासात १९३५ हे साल अतिशय महत्त्वाचे आहे. कारण याच साली १) संस्थेची घटना तयार होऊन संस्था रजिस्टर झाली. २) भाऊरावांचे प्राथमिक शिक्षकासाठी काढावयाच्या ट्रेनिंग कॉलेजचे स्वप्न साकारले व जनसामान्यात शिक्षण प्रसाराच्या चळवळीचा पाया घातला गेला. भारताच्या दृष्टीने १९३५ चा कायदा लागू करण्यात आला. ब्रिटिश साम्राज्याच्या दृष्टीने पंचम जॉर्ज बादशहाच्या राज्यारोहणाची रजत जयंती साजरी होत होती.

२) यावेळी सातारा जिल्हाधिकारी होते श्री. हमीद ए. अली, न्यायमूर्ती अब्बास तय्यबजीचे जावई. सातारा जिल्हा ग्रामीण विकास समितीचे ते अध्यक्ष होते. भाऊराव सभासद होते. भाऊरावांना हे जिल्हाधिकारी ग्रामीण विकास प्रचारसभांना स्वत:बरोबर नेत. भाऊरावांच्या एका व्याख्यानाने जिल्हाधिकाऱ्याचे निम्मे काम होऊन जात असे. हमीद ए. अली भाऊरावाप्रमाणेच म. गांधींचे चाहते होते. त्या दोघांत गाढ मैत्री निर्माण झाली. प्राथमिक शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेज स्थापन करावयाच्या भाऊरावांच्या प्रयत्नास बादशहाच्या राज्यारोहणाच्या रजत जयंतीची वेळ

योग्य असल्याचे श्री. हमीद अलींना वाटले. त्यांनी तसे भाऊरावांना सुचविले. तात्काळ भाऊरावांनी आपले स्नेही व आश्रयदाते श्री. रावबहादूर काळ्यांना हा विचार सांगितला. श्री. काळेंनी वेळ न गमावता संस्थेची पहिली घटना तयार करून मुंबईस संस्थानोंदणी कार्यालयाकडे पाठविली. क्रमांक ७६३/१९३५ ने ता. २५-४-१९३५ ला रयत शिक्षण संस्था कंपनी निबंधकाने नोंदविली. पुढील संस्थापक सदस्य होते. रा. ब. रावजी रामचंद्र काळे १६-६-१९३५ अखेरपावेतो पहिले अध्यक्ष होते. कारण या दिवशी नवीन घटनेप्रमाणे अठरा सदस्यांचे कार्यकारी मंडळ प्रथम अस्तित्वात आले, ते असे :

(३) संस्थापक सदस्य -

१) श्री. रा. ब. रावजी रामचंद्र काळे, बी. ए. एलएल. बी. ॲडव्होकेट
२) श्री. भाऊराव पायगौंडा पाटील, व्यवस्थापक श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस, सातारा
३) श्री. के. एस. दीक्षित, बी. ए. (निवृत्त) उपशिक्षणाधिकारी,
४) श्री. ए. पी. मोहिते, बी. ए. एलएल. बी.
५) श्री. आर. बी. शिंदे, बी. ए. एलएल. बी., एम. एल. सी.
६) श्री. बी. एन. नलावडे, बी. ए. एलएल. बी.
७) श्री. बी. एस. बारटक्के, बी. ए. एलएल. बी. (निवृत्त) पोलीस व महसूल अधिकारी, बडोदा व कोल्हापूर
८) रावसाहेब मो. बा. मुथा, ऑन. मॅजिस्ट्रेट, सातारा
९) श्री. आर. पी. पाटील, बी. ए., बी. एस्सी, एलएल. बी.
१०) श्री. सरदार आर. आर. पंडितराव, डी. एल. बी. सभासद, सातारा
११) श्री. सरदार वाय. एस. राजे भोसले, तालुका लोकल बोर्ड सभासद, सातारा
१२) श्री. बाजीराव जे. देशमुख, डी. एल. बी. सभासद, सातारा
१३) श्री. भाऊसाहेब दादा कुदळे, डी. एल. बी. सभासद, सातारा
१४) श्री. सी. के. माने अध्यक्ष, रहिमतपूर, नगरपालिका, जि. सातारा
१५) श्री. ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप, माजी एम. एल. सी.

१६) श्री. इस्माईल मोहोंमदसाहेब मुल्ला, बी. ए.
१७) श्री. एन. आर. माने, बी. ए.
१८) श्री. एल. बी. भिंगारदेवे, बी. ए.

शेवटचे तिघे श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसचे माजी विद्यार्थी होते.

४) ६ मे १९३५ या तारखेस सातान्यात धनिनीच्या बागेत राज्यारोहणाची रजत जयंती साजरी करण्याचे ठरले. तत्पूर्वी भाऊराव श्री. हमीद ए. अलींना विनोदाने म्हणाले, "रौप्यमहोत्सव साजरा करू; पण या महोत्सवानिमित्त काही रौप्य मिळणार आहे काय?" हमीद अलींनी, "होय. रौप्य देऊ की!" म्हटले. या दिवशी सकाळी साडेसात वाजता सारे सरकारी अधिकारी व रावसाहेब, रावबहादूर आदी राजनिष्ठ लोक धनिनीच्या बागेत हजर राहिले. बादशहा पंजम जॉर्ज यांना दीर्घायू व आरोग्य लाभण्यासाठी प्रार्थना केली. या प्रार्थनेनंतर सभा झाली आणि रयत शिक्षण संस्थेच्या घटनेस सरकारी मान्यता मिळाल्याचे व या संस्थेमार्फत सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग (कॉलेज) स्कूल या वर्षी सुरू करण्याचे याप्रसंगी जाहीर करण्यात आले. एवढेच नव्हे तर रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्षपदही स्वीकारण्याचे हमीद अलींनी भाऊरावांना आश्वासन दिले. पण शासकीय नियमामुळे फार दिवस या पदावरून ते राहू शकले नाहीत. परत श्री. काळेच अध्यक्ष झाले.

५) भाऊरावांना हे आश्वासन देण्याचे कारण सातारला जिल्हाधिकारी असलेल्या एकूण तीन वर्षांच्या मुदतीत श्री. हमीद अलींनी त्यांच्या पत्नी सौ. शरीफा अली यांच्यासह श्री छत्रपती बोर्डिंग हाऊसला अनेक वेळा भेटी दिल्या होत्या. एके प्रसंगी भाऊराव हजर नसताना त्यांनी वसतिगृहात भेट दिली. विद्यार्थी नेमून दिलेले काम शिस्तबद्ध पद्धतीने करीत होते. सर्वत्र त्यांना स्वच्छता व नीटनेटकेपणा आढळला. कोणी सिगारेट ओढतो का हे पाहण्यासाठी काही वयस्कर मुलाच्या बॅगाही उघडून पाहिल्या. त्यांना काहीही आढळले नाही. मुलांना त्यांच्या जाती विचारताच हरिजन, ख्रिश्चन, मुसलमान, जैन व ब्राह्मण मुले असल्याचे त्यांना आढळून आले. भाऊरावांचे हे राष्ट्रीय व भावनिक एकात्मतेचे व समानतेचे काम पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. सातारा सोडल्यानंतर

व निवृत्तीनंतरही त्यांनी भाऊरावांवर व रयत शिक्षण संस्थेवर लोभ ठेवला.

६) या रौप्यमहोत्सवी समारंभात जाहीर केल्याप्रमाणे ता. १६-६-१९३५ रोजी पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये कार्यकारी मंडळाची निवड झाली.

१) श्री. हमीद ए. अली - अध्यक्ष

२) रा. ब. रा. रा. काळे - उपाध्यक्ष
रा. ब. मो. बा. मुथा - उपाध्यक्ष

३) श्री. ए. पी. मोहिते - सचिव

४) रा. ब. मो. बा. मुथा - खजिनदार

५) i) रा. ब. रा. रा. काळे ii) रा. ब. मो. बा. मुथा iii) श्री. भाऊराव पाटील व iv) सरदार आर. आर. पंडितराव - विश्वस्त

७) पहिल्या घटनेचे स्वरूप खालीलप्रमाणे होते:

सर्वसाधारण सभेत १) आजीव सभासद २) साधे सभासद ३) विशेष सभासद (फेलो) ४) पुरस्कर्ते (पेट्रन) ५) साहाय्यकर्ते (बेनिगफॅक्टर्स) यांचा समावेश होता. संस्थापक सभासद पहिल्या सर्वसाधारण सभेत होते. याशिवाय १) सेनेट २) मॅनेजिंग कौन्सिल ३) बोर्ड ऑफ लाईफ मेंबर्स ४) ट्रस्टी ही अधिकार मंडळे होती. सेनेट सहा सभासदांचे, मॅनेजिंग कौन्सिल बारा सभासदांचे, बोर्ड ऑफ लाईफ मेंबर्स शिक्षकांचे. बोर्ड ऑफ लाईफ मेंबर्स तयार होईपर्यंत सर्व शिक्षकांचे बोर्ड ऑफ लाईफ वर्कर्स राहाणार होते. ट्रस्टी मंडळ दोन किंवा चार सभासदांचे असे.

८) संस्थेचे ध्येय व उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

(i) संस्था भारताच्या, विशेषत: सातारा जिल्ह्यातील भावी तरुण पिढ्यास प्रागतिक परंतु गुणवत्ता वाढविणारे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण देईल. त्यात भाषिक, शेतकी, शास्त्रीय, तांत्रिक, व्यापारी व औद्योगिक आणि शारीरिक शिक्षणाचा समावेश असेल.

(ii) या शिक्षणातून नि:स्वार्थीपणा व श्रममाहात्म्य याचे आदर्श मुलांपुढे ठेवून, 'कमवा व शिका' यांस प्रोत्साहन दिले जाईल. धर्म,

जात, पंथ व वर्गभेदरहित संस्था चालविली जाईल.

(iii) संस्था, राजकारणविन्मुख राहील. व्यवस्थापक मंडळ, सभासद, शाळेतील किंवा शाखेतील शिक्षक व सेवक संस्थेच्या किंवा शाखांच्या आवारात कोणत्याही राजकीय चळवळी करणार नाहीत. शाळेतील किंवा शाखांतील विद्यार्थी राजकारणात सक्रिय भाग न घेता स्वत:च्या अभ्यासात प्रगती करण्याकडे आपले संपूर्ण लक्ष देतील.

९) आजीव सभासद शक्यतो माजी विद्यार्थ्यामधून विहित पदव्या धारण करीत असल्यास निवडण्यात येत, अर्थात अपवादही चांगल्या शिक्षकाच्या बाबतीत करण्यात येई. उदा. जी. टी. जोशी, एस. एस. बेडकीहाळ, एल. एम. सुभेदार, एन. एन. दोशी ही संस्थेच्या कार्याशी एकरूप झालेली शिक्षक मंडळी आजीव सभासद होती.

१०) रयत शिक्षण संस्था रजिस्टर्ड झाल्यावर भाऊरावांनी सन १९२१-२२ साली सातारा तालुक्यातील अंगापूर गावी मागासवर्गीय शिक्षकांच्या अधिवेशनात प्राथमिक शिक्षकासाठी अध्यापक विद्यालय सुरू करण्याचे जाहीर केले होते. परंतु आपल्या वसतिगृहातून हे ट्रेनिंग कॉलेज चालविणारे पदवीधर अनुयायी तयार करणे महत्त्वाचे होते. या चरित्रातून आपणास दिसून येईल की एका विशिष्ट क्रमाने स्वत:स जाणवलेला ग्रामीण शिक्षणाचा आकृतिबंध भाऊराव तयार करीत होते. आधुनिक शब्दप्रयोगात म्हणावयाचे तर भाऊरावांचा हा शैक्षणिक प्रकल्प (प्लँट) उभा करण्यास लागणारे व त्याची जबाबदारी अंगावर घेणारे शैक्षणिक तज्ज्ञ मिळविणे किंवा शिकवून तयार करणे महत्त्वाचे होते. या शैक्षणिक तज्ज्ञाद्वारे खेड्याचा नेता म्हणजे प्राथमिक शिक्षक आपल्या तत्त्वाप्रमाणे तयार करण्याची आवश्यकता होती. म्हणून संस्था रजिस्टर होताच भाऊराव ट्रेनिंग कॉलेज काढण्यास तयार झाले.

११) सन १९२१-२२ पर्यंत प्राथमिक शिक्षकांना विनीत करण्यास फार वाव नव्हता. कारण खाजगी शिक्षणसंस्थांची फक्त दोनच ट्रेनिंग कॉलेजीस होती. ती सुद्धा मिशनऱ्यामार्फत चालवलेली. एक अहमदनगर येथे व दुसरे अहमदाबाद येथे. दूरच्या प्राथमिक शिक्षकांना ती

खर्चाच्या दृष्टीने परवडण्यासारखी नव्हती. या दोन संस्था मिशनच्या असल्याने प्रवेशावरही बंधने पडत. याखेरीज इतर कारणे होती ती अशी: (१) महात्मा फुले, आर्थर मेह्यू (शिक्षण संचालक) चंदावरकर समिती (१९२२) ॲबट आणि वूड समिती (१९३७) व अनेक शिक्षणतज्ज्ञाप्रमाणे भाऊरावही मानीत की खेड्यात काम करणारा प्राथमिक शिक्षक स्थानिक स्तरामधला असला पाहिजे. (२) सन १९२१ नंतरच सन १९१९ च्या कायद्याने पुढारलेले, मध्यमवर्गीय व मागासलेले यांच्यासाठी शिक्षकांत आरक्षणाचे तत्त्व मान्य झाले. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांत मध्यम व मागासवर्गीयांची संख्या वाढू लागली. पण मुंबई प्रांताच्या चार विभागासाठी फक्त चारच शासकीय प्राथमिक शिक्षक ट्रेनिंग कॉलेजीस होती. तेथे फक्त ७.२% शिक्षकांचीच सोय होत होती. (३) त्यातूनही १९२३ मध्ये जिल्हा स्कूल बोर्ड स्थापन झाल्यावर शासकीय शिक्षणखाते व लोकनियुक्त स्कूल बोर्ड यात बेबनाव सुरू झाला. काही भ्रष्टाचारी प्रथाही बोर्डात वाढल्या, म्हणून भाऊरावांनी ग्रामीण प्राथमिक शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेज काढण्याचे ठरविले. भाऊरावांच्या या ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यासक्रम ग्रामीण वातावरणास सुसंगत राहावा म्हणून पुण्याजवळील लोणी येथील ग्रामीण ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यासक्रम स्वीकारला. कॉलेजच्या नावात मुद्दाम 'रूरल' (ग्रामीण) हा शब्द वापरून १६ जुलै १९३५ रोजी सिल्व्हर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज साताऱ्यात सुरू केले.

१२) सन १९३५ मध्ये श्री. वि. द. घाटे यांचा एकशिक्षकी ग्रामीण शाळांचा अहवाल प्रसिद्ध झाला होता. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यावेळच्या मुंबई प्रांतातील मराठी बोलणाऱ्या १० जिल्ह्यांत प्रत्येकी ३०० एकशिक्षकी शाळा होत्या. दरसाल त्यात भर पडत असल्याने कमीत कमी ३००० शिक्षकांना विनीत करण्याचा प्रश्न होता. म्हणून भाऊराव आपल्या कल्पनेप्रमाणे प्राथमिक शिक्षकांना शक्यतो मोफत विनीत करण्यास तयार झाले, आणि रा. ब. काळ्यांनी ६ मे १९३५ रोजी या कॉलेजसाठी सनातन्यांच्या विरोधास न जुमानता रु. १,०००/- ची देणगी जाहीर

केली आणि रयत शिक्षण संस्थेसाठी रु. १० हजारांचा ट्रस्ट आपल्या इच्छापत्राद्वारे केला. सुरुवातीस तीन वर्षे या ट्रेनिंग कॉलेजमध्ये दाखल होणाऱ्यांना फी नव्हती.

१३) या कॉलेजमध्ये प्रवेशासाठी शिक्षकांच्या अक्षरशः उड्या पडावयाच्या. कारण मिशनऱ्यांच्या दोन ट्रेनिंग कॉलेजेसनंतर खाजगी संस्थेतर्फे निघालेले मुंबई प्रांतातले हे पहिले कॉलेज होते व अतिशय माफक खर्चात शिक्षण पुरे होत असे. वसतिगृहात शिक्षकांना इतर मुलाप्रमाणेच तीन-साडेतीन रुपयांच्या आत जेवण मिळत असे. दक्षिण महाराष्ट्रीय संस्थाने - औंध, फलटण, सावंतवाडी, कुरुंदवाड, मिरज, इचलकरंजी, गगनबावडा, सांगली येथून तसेच सातारा, सोलापूर येथील जिल्हा स्कूल बोर्डस् व म्युनिसिपल स्कूल बोर्डस् यांच्याकडून शिक्षक पाठविले जात. सन १९४१-४२ मध्ये २४० शिक्षकांपैकी ५३ स्वखर्चाने आलेले उमेदवार होते, व ५२ संस्थेच्या व्हालंटरी शाळेतील शिक्षक होते. स्वखर्चाने आलेले शिक्षक, सातारा, नाशिक, खानदेश, पुणे, सोलापूर, मुंबई, बेळगाव, रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यांतील होते. या कॉलेजमध्ये शासकीय नियमाप्रमाणे ट्रेन्ड पदवीधर, पदवीधर शिक्षक नेमण्यात आले होते. या ट्रेनिंग कॉलेजची सगळ्यात उल्लेखनीय बाब म्हणजे भाऊरावांना सत्यशोधक ब्राह्मणेतर म्हणून विरोध करणारे श्री. कृष्णाजी शंकर दीक्षित - उपशिक्षणाधिकारी या कॉलेजचे पहिले प्राचार्य झाले. एवढेच नव्हे, तर त्यांनी निवृत्तीनंतर पाच वर्षे विनावेतन काम केले. भाऊरावांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कामाचे महत्त्व पटल्याचे त्यांनी विनावेतन काम तर केलेच, पण आर्थिक अडचणीच्या वेळी संस्थेस उसनवार पैसेही दिले. विरुध्द असलेले अनेक लोक पुढे भाऊरावांचे कार्य पाहून त्यांचे मित्र झाले. आपल्या देशास १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग कॉलेजचे नाव महात्मा फुले अध्यापक विद्यालय असे ठेवण्यात आले.

१४) ग्रामीण प्राथमिक शिक्षकांचा ट्रेनिंगचा प्रश्न सोडविल्यानंतर भाऊरावांचे लक्ष स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजकडे वेधण्याचे काम सौ. हमीद

अली यांचेकडे जाते. सन १९४१ साली रयत शिक्षण संस्थेचे काम व तिच्या शाखा पाहण्यासाठी त्या मसुरीवरून मुद्दाम आल्या. शाखा पाहून झाल्यावर त्या भाऊरावांना म्हणाल्या, "तुम्ही पुरुष फार स्वार्थी आहात. स्त्रियांच्या शिक्षणासाठी काहीतरी केले काय? बन्धो! स्त्रियांसाठी काही करण्याच्या मार्गाला लागा. काही केल्याशिवाय मी तुमचे तोंड पाहणार नाही."

भाऊरावांना दिलेल्या ह्या प्रेमाच्या धमकीस उत्तर म्हणून १५ जून, १९४२ रोजी साताऱ्यात जिजामाता अध्यापिका विद्यालय सुरू करून तसे सौ. हमीद ए. अलींना भाऊरावांनी कळविले. सौ. हमीद अलींनी तात्काळ रु. ५००/- ची देणगी पाठविली. या अध्यापिका विद्यालयाची मुख्य अडचण म्हणजे ट्रेंड पदवीधर प्राध्यापिका मिळविण्याची. पहिल्या वर्षी २० विद्यार्थिनी ट्रेनिंगसाठी दाखल झाल्या. श्री. एन. एन. दोशी, बी. ए. बी. टी. पहिले प्राचार्य झाले. डॉ. वेणूताई लेले यांनी (१९४३-४४) एक वर्ष स्त्री प्राध्यापिका म्हणून विनावेतन काम केले. तसेच जिल्हा लोकल बोर्डाने श्री. कृष्णाबाई एकमकर यांना लेन्ड सर्व्हिसवर पाठविले. इतर शिक्षक महात्मा फुले अध्यापक विद्यालयांकडून येऊन शिकवत असत. सन १९४२ मध्येच ट्रेनिंगसाठी येणाऱ्या स्त्रियांसाठी सौ. लक्ष्मीबाई पाटील वसतिगृह सुरू करण्यात आले. या वसतिगृहाची व्यवस्थाही शाहू बोर्डिंग हाऊसप्रमाणेच व दिनचर्याही त्याचप्रमाणे होती. मुलींचे सहा गट होते. पुढे या वसतिगृहात हायस्कूलमध्ये जाणाऱ्या मुली तसेच बालगुन्हेगार कोर्टाकडील मुलीही सुधारगृह म्हणून मान्यता मिळाल्याने या वसतिगृहात दाखल होत. प्राचार्यच एकदोन सेविकांच्या मदतीने या वसतिगृहाची देखरेख करीत.

१५) याच पद्धतीने पुरुषांसाठी सन १९५० साली आष्टे, ता. वाळवे, जि. सांगली येथे लठ्ठे अध्यापक विद्यालय, जून १९५२ मध्ये रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे छत्रपती शाहू अध्यापक विद्यालय, जून १९५४ मध्ये पांडुरंग देसाई अध्यापक विद्यालय, कुसूर, ता. कराड, जि. सातारा येथे, तर जून १९५५ मध्ये महाराजा माधवराव शिंदे अध्यापक विद्यालय, जामगाव, जि. अहमदनगर येथे विद्यालये सुरू

करण्यात आली. याखेरीज १९६२ साली माहुली, जि. सांगली येथे विठ्ठलराव देशमुख अध्यापक विद्यालय सुरू करण्यात आले. ही सर्व अध्यापक विद्यालये ग्रामीण भागात आहेत. त्यामुळे येथील शिक्षण शहरी विभागापेक्षा खर्चाच्या दृष्टीने ग्रामीण शिक्षकांना परवडण्यासारखे आहे. प्रामुख्याने ग्रामीण शिक्षकांसाठीच
ही विद्यालये होती.

१६) प्राथमिक शिक्षकांसाठी काढलेली ही अध्यापक विद्यालये प्राथमिक शिक्षणाच्या नाण्याची एक बाजू झाली. या नाण्याची दुसरी बाजू आहे ती व्हालंटरी म्हणजे स्वयंसेवी ग्रामीण प्राथमिक शाळांची. इंग्लंडमध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचे १८७० मध्ये ठरले. त्याचे पडसाद आपल्या देशात १८८२ सालच्या हंटर आयोगाच्या वेळी उठले. परंतु मेकॉलेच्या 'झिरपण तत्त्वा'नुसार सामान्य जनतेत म्हणजे 'रयतेत' प्राथमिक शिक्षण उच्चवर्णीयांच्या चाळणीतून झिरपलेच नाही. त्यास अडथळे होते ते जातीभेदाचे आणि अस्पृश्यांच्या संसर्गाने विटाळण्याचे. खुद्द इंग्रज अधिकाऱ्यांना वाटे की, हिंदुस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करता येईल ही अशक्य गोष्ट आहे. कारण स्पृश्य आणि अस्पृश्य यांना एकत्र शिकविणे म्हणजे संघर्षास आमंत्रण आहे. त्यात भर पडली ती ब्राह्मणेतरांच्या ठिकाणी असलेल्या शिक्षणविषयी अनास्थेची. "ब्राह्मणाघरी लिहिणं, शेतकऱ्याघरी दाणं आणि महाराघरी गाणं' असा दृढसमज होता. यातूनही सन १९११ साली नामदार गोखले व विठ्ठलभाई पटेल यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचे ठराव मांडले ते यशस्वी झाले नाहीत. सक्तीसाठीं शहरे प्रथम कां खेडी प्रथम घ्यावीत. यावरच वाद होऊन प्रयत्न तेथेच थांबले. १९१९ च्या कायद्याने मुंबई प्रांतात 'शिक्षण' हे लोकनियुक्त मंत्र्याकडे देण्यात आले. फर्ग्यूसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. र. पु. परांजपे पहिले शिक्षणमंत्री झाले. त्यांनी श्री. विठ्ठलराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी अहवाल मागितला. अहवालासाठी दिलेल्या संदर्भात एक संदर्भ होता तो हा की, हे शिक्षण ग्रामीण भागांत कसे

सुरू करता येईल याबद्दल उपाय सुचविणे. समितीने ग्रामीण भागांत मोठा प्रचार करून सक्तीस रयतेची अनुकूलता मिळविण्यास सुचविणे.

१७) हे भाऊरावांच्या आवडीचे काम निघाले. सत्यशोधक म्हणून, सातारा जिल्ह्यातील प्रमुख पुढारी म्हणून त्यांना मान्यता होतीच. रा. ब. रावजी रामचंद्र काळे आणि श्री. घोलप व भास्करराव जाधव भाऊरावांच्या मदतीनेच प्रांतिक कायदे मंडळात निवडून गेले होते. या तिघांच्या मदतीने भाऊरावांनी सोलापूर, सातारा जिल्हा व आसपासच्या भागात तीनशे प्रचार सभा घेतल्या. सत्यशोधक समाजाचेच प्राथमिक शिक्षण प्रसाराचे काम सन १९२२-२३ च्या कौन्सिलमधील बिलाने होणार आहे, हे रयतेस पटवून देऊन तीनशे सभांतील तीनशे ठराव या बिलाच्या बाजूने गोळा केले. या ठरावांचा गठ्ठा डॉ. र. पु. परांजपेंच्या हाती रा. ब. काळेंनी दिला व ग्रामीण रयत सक्तीस अनुकूल असल्याचे कौन्सिलमध्ये सांगितले. बिलाचे कायद्यात रूपांतर झाले. डॉ. परांजपेंनी भाऊराव ही व्यक्ती कोण आहे, अशी विचारणा करून त्यांची भेट घडविण्यास श्री. काळेंना सांगितले. तेव्हापासून डॉ. परांजपे भाऊरावांचे चाहते झाले आणि सन १९५९ साली भाऊरावांना पुणे विद्यापीठातर्फे डी. लिट. पदवी देण्याचे त्यांनी मान्य करवून घेतले. भाऊरावांच्या मृत्युपूर्वी काही आठवडे असताना आपल्या हस्ते डॉ. परांजपेंनी पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये कर्मवीरांना ही पदवी प्रदान केली. भाऊराव काही दिवसांचे सोबती आहेत हे जाणून डॉ. परांजपे व त्यांच्यासोबत हॉस्पिटलमध्ये आलेले पुणे विद्यापीठाचे सीनेटर्स खिन्न होते, पण आपण एक अवश्यमेव कृत्य केल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर होते. योगायोग किती दैवी असतो पाहा! सन १९२२-२३ साली भाऊरावांच्या कार्याचा आरंभ पाहिलेल्या, भारतीय शिक्षणमंत्री असलेल्या व सन १९५९ साली पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असलेल्या डॉ. र. पु. परांजपे यांच्या हस्तेच भाऊरावांना डी. लीट. पदवी प्रदान करण्यात आली. प्राथमिक शिक्षणासंबंधीच्या कर्मवीरांच्या तळमळीचे मर्म डॉ. परांजपे यांनी ३६ वर्षांपूर्वीच जाणले होते. सन १९५९ साली भाऊरावांच्या कार्याचा कळसही पाहण्यास डॉ. परांजपे हयात होते.

त्यांच्या हस्तेच भाऊरावांचा गौरव होणे योग्य व नियतीस मंजूर होते आणि तसेच घडले.

१८) सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याच्या अम्मलबजावणीत ब्रिटिश नोकरशाहीकडून अडथळे येऊ लागले. ते पैशाची अडचण दाखवीत. भाऊरावांच्या प्रचाराचा शासनाने तसेच सातारा जिल्हा बोर्डाने उपयोग केला नाही. तेव्हा भाऊरावांना वाटू लागले की आपण स्वत:च स्वावलंबनाच्या तत्त्वावर स्वयंसेवी शाळा सुरू कराव्यात. परंतु त्यासाठी त्यांना सन १९३७ पर्यंत वाट पाहावी लागली. त्या साली लोकनियुक्त मंत्रिमंडळे प्रांतांत स्थापन झाली; आणि भाऊरावांच्या स्वयंसेवी शाळांचा प्रस्तावही शासनाच्या आर्थिक अडचणीच्यावेळी कमी खर्चाचा म्हणून मुंबईच्या काँग्रेस मंत्रिमंडळाने स्वीकारला.

१९) १७ सप्टेंबर १९३७ रोजी श्री. बाळासाहेब खेर यांनी 'शक्य तितक्या लवकर व कमी खर्चात रयतेचे जास्तीत जास्त प्रमाणात शिक्षण' करण्याचे मुंबई कायदे मंडळात अभिवचन दिले. भाऊरावांनी शासनाच्या मदतीची वाट न पाहता सातारा व नाशिक जिल्ह्यात अनुक्रमे डबेवाडी व आंबोली या खेड्यांत व्हॉलंटरी शिक्षकामार्फत ता. २७-११-१९३६ पासून व्हॉलंटरी शाळा सुरू करण्याचा ठराव करून संस्थेमार्फत तेथे पहिल्या दोन शाळा सुरू केल्या. मुंबई प्रांतात व्हॉलंटरी शाळांची योजना सुरू करण्याचे श्रेय व दूरदृष्टीपणा भाऊरावांकडे जातो. याबाबत रावबहादूर काळ्यांचे चरित्रकार श्री. चंडिराम हरी पळणीटकर म्हणतात, "बहुजनसमाजात साक्षरतेचा प्रसार करून थोड्या खर्चात बहुजनांना भरीव प्राथमिक व दुय्यम शिक्षण आणि धंदेशिक्षण देण्यासाठी ट्रेंड व स्वार्थत्यागी शिक्षक तयार करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. जनतेच्या शिक्षणाचा - राष्ट्रोद्धाराचा - मूलभूत प्रश्न ज्या अनेक रीतीने सोडविण्याची रावबहादुरांची इच्छा होती तिची पूर्ती करणारे हे उद्दिष्ट असल्यानेच त्यांचे मन तिकडे (संस्थेकडे) आकृष्ट झाले....... श्री. पाटलांना हा उपक्रम का करावा लागला? याचे थोडक्यात पण बरेचसे उत्तर स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या अगर स्थानिक स्वराज्यसंस्थांतर्गत शिक्षणसंस्थांच्या

कर्तव्यभ्रष्टतेत आढळून येईल. बहुजनसमाजाच्या शिक्षणाचे ध्येय या संस्थांना धडपणी गाठता येत नसल्यानेच जेथे जेथे याबाबत हयगय होत असेल तेथे तेथे या योजनेतील ज्ञानी शिक्षक अल्पवेतन घेऊन अशा शाळा काढणार आहेत. त्यामुळे सदर स्थानिकस्वराज्यसंस्थांचे अगर स्थानिक स्वराज्यसंस्थांतर्गत शिक्षणसंस्थांचे डोळे उघडले, डोके ताळ्यावर आले, तरी पुष्कळच कार्यभाग झाला असे होईल. इतकचे नव्हे, तर शिक्षणकार्यातील व खात्यातील 'अव्यापारेषु व्यापारा' ला थोडातरी पायबंद बसेल.'' (चं. ह. पळणीटकर, पुरुषोत्तम : १९३७; पृष्ठे ११३-११४)

२०) नामदार खेरांनी असेंब्लीत धोरण जाहीर केल्यानंतर भाऊरावांनी आपली व्हॉलंटरी (स्वयंसेवी) शाळांची योजना श्री. वि. द. घाटे, शासनाच्या (मास लिटरसी ड्राइव्ह) साक्षरताप्रसार मोहिमेचे मुख्य यांचे कानी घालून चर्चा केली. त्यानंतर त्यावेळचे अर्थमंत्री नामदार अण्णासाहेब लठ्ठे (भाऊरावांचे गुरू) यांच्याशी आपल्या योजनेवर चर्चा केली. श्री. लठ्ठयांना ती योजना पसंत पडल्याने त्यांनी श्री. खेर यांना ती सांगितली. त्यानंतर भाऊरावांनी सन १९३८ च्या पुण्यातील असेंब्लीच्या पावसाळी अधिवेशनात एके दिवशी काँग्रेसच्या सर्व मंत्र्यांना महर्षी अण्णासाहेब शिंदे यांच्या घरी चहापानास बोलाविले. त्यांना आपली व्हालंटरी शाळांची योजना समजावून सांगितली. व अशा शाळा सुरू करण्याचा मनोदयही प्रगट केला. मंत्र्यांना ही योजना पसंत पडल्याने श्री. लठ्ठयांनी श्री. घाटे यांच्याकडे असलेल्या साक्षरताप्रसार मोहिमेद्वारा अशा व्हालंटरी शाळांना मदत करण्यासाठी त्या साली अंदाजपत्रकात दुप्पट रकमेची तरतूद केली.

२१) काँग्रेस मंत्रिमंडळाने व्हालंटरी शाळांची योजना शासन निर्णय - शिक्षण विभाग क्रमांक ६५१३ ने ता. २५-८-१९३९ ला जाहीर केली. सारांश, रयत शिक्षण संस्था ही व्हालंटरी शाळा सुरू करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शन करणारी पहिली पायाभूत संस्था होती. शासनाच्या वरील ठरावापूर्वी ता. १८-९-१९३८ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर आपल्या

योजनेप्रमाणे शाळा सुरू करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या पुढील सदस्यांची प्राथमिक शाळा समिती स्थापण्यात आली : १) भाऊराव पी. पाटील - अध्यक्ष २) प्राचार्य के. एस. दीक्षित - सभासद ३) श्री. एन. एन. दोशी - सभासद ४) श्री बी. एस. बारटक्के - सभासद ५) श्री. आय. एम. एस. मुल्ला - सभासद - सचिव व श्री. एस. डी. महादार - आजीव सभासद १-१०-१९३९ पासून प्रशासन अधिकारी म्हणून काम करू लागले. कारण एका वर्षात १-९-१९३८ ते १-१०-१९३९ अखेर ६० व्हालंटरी शाळा सातारा जिल्ह्याच्या डोंगरी व दुर्गम भागात व पूर्वेकडील दुष्काळी भागात सुरू करण्यात आल्या होत्या. भाऊराव स्वत: पायी किंवा घोड्यावरून या भागात जाऊन ग्रामस्थांच्या सभा घेऊन शाळा सुरू करीत व तेथे स्वयंसेवी शिक्षक पाठवीत किंवा सोबत नेत.

२२) व्हालंटरी शाळांची ही योजना पुढीलप्रमाणे होती : १) रयतेच्या मुलांना व पाल्यांना मोफत प्राथमिक शिक्षण देणे. २) रयत शिक्षण संस्था संमती देणाऱ्या खेड्यात शाळेसाठी शिक्षक पाठवील. ३) गावकऱ्यांनी चावडी, मंदिर किंवा एकाद्याच्या वाड्यातील एकदोन खोल्या शाळेसाठी द्याव्यात. ४) गावकऱ्यांनी शिक्षकास राहण्यास जागा देऊन त्याच्या मोफत जेवणाची सोय, वार लावून किंवा धान्य देऊन करावी. ५) र. शि. संस्था रु. ८०/- किंमतीचे शाळासाहित्य, पाट्या, पुस्तके इ. मोफत देईल. ६) शासनाकडून मिळणारा पगार किंवा अनुदानभत्त्यासह शिक्षकास मिळेल. ७) अशा शाळावर दोन वर्षे काम करणाऱ्या सातवी पास शिक्षकास संस्थेच्या ट्रेनिंग कॉलेजामध्ये मोफत प्रवेश मिळेल. व या ट्रेनिंगच्या मुदतीत छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसमध्ये अल्पदरात जेवण मिळेल. त्यासाठी त्यांनी कॉलेजकडे थोडी थोडी रक्कम ठेव म्हणून ठेवावी. ८) ट्रेंड झाल्यावर ३०-१-५० या पगारश्रेणीत पगार व भत्ता शासनाकडून मिळवून दिला जाईल. या योजनेप्रमाणे १९३८ साली विजयादशमीस येवतेश्वर डोंगरावरील अनावळे गावी पहिली शाळा सुरू झाली.

२३) सन १९४८-४९ व १९४९-५० साली र. शि. संस्थेमार्फत ५७८ व्हालंटरी शाळेत ८२३ शिक्षक, २५,१७९ विद्यार्थी, अकरा तालुक्यातून विखुरले होते. बहुसंख्य एकशिक्षकी शाळा इ. ४ थीपर्यंतच्या होत्या.

सातवीच्या फक्त ११ शाळा होत्या. शिक्षकांत ८९ ब्राह्मण, ६४६ मराठा व तत्सम, ७२ हरिजन, १६ मुसलमान होते. (डॉ. रा. अ. कडियाळकृत कर्मवीर भाऊराव पाटील, इंग्रजी ग्रंथ, पृ. १०२-१०६) भाऊरावांच्या या शाळांचे प्राचीन पाठशाळा किंवा १८३८ मधील पुरंदर शाळांशी बरेच साम्य दिसते. बावीस वर्षात र. शि. संस्थेने १३७५ व्हालंटरी शिक्षक ट्रेंड केले. सन १९५४ नंतर नवीन धोरणानुसार शासनाने व्हालंटरी शाळा बंद करून तेथे स्कूल बोर्डाच्या शाळा सुरू करण्याचे धोरण ठेवल्याने संस्थेने शाळा बोर्डाकडे देण्यास सुरवात केली.

२४) या व्हालंटरी शाळांच्यामुळे शासनास किती फायदा झाला हे पाहू या. या ५७८ शाळांसाठी शासनास १९३८-१९४८ या दहा वर्षांत शाळेच्या एका खोलीस रु. ४,३२० प्रमाणे ६०५ खोल्या बांधाव्या लागल्या असत्या. ती रक्कम होते २६,१३,६००/- या शाळातील शिक्षकांना शासकीय वेतनश्रेणीप्रमाणे एकूण रु. ६४,९६,९६०/- पगारापोटी द्यावे लागले असते. त्याऐवजी शासनाने व्हालंटरी शिक्षकांना र. शि. संस्थेमार्फत रु. ३३,६१,०२१.६५ पैसे दिले; म्हणजे रु. ३१,३५,९३८.३५ वाचवले. त्याचे प्रमाण ४८.२% पडते. याशिवाय रयतेने आपण होऊन मदत केलेली रक्कमही शासनास खर्च करावी लागली असती. म्हणजे ती रु. ३,९७२१५.०३ आहे. एकूण रु. ६१,४६,७८३.३८ शासनाचे वाचले व २५,१७९ मुले साक्षर झाली. शासनाचा हा व्हालंटरी शाळा बंद करण्याचा निर्णय म्हणजे आखुड शिंगी बहुदुधी गाय मारण्याचा प्रकार होता. यामुळे जनतेतील दातृत्वास ओहोटी तर लागलीच, पण स्वावलंबनाच्या तत्त्वासही हरताळ फासला गेला. डॉ. धनंजयराव गाडगील श्री. वि. द. घाटे यांच्या नेतृत्वाखाली सन १९५२ व १९५३ साली या शाळा बंद न करण्याबद्दल शिक्षणमंत्र्यांना विनंती केली. पण १९४८ पासून शासनाची र. शि. संस्थेवर वक्रदृष्टी असल्याने या शिष्टाईचा काही उपयोग झाला नाही. (पाहा : रा. अ. कडियाळकृत कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र, पृ. ११५-११७)

■

## प्रकरण नववे

# शिक्षणातील प्रयोग

१) रयत शिक्षण संस्थेचे सगळ्यात मोठे काम माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात झाले आहे. त्याला कांही महत्त्वाची कारणेही होती. पहिले होते (१) प्राथमिक स्वयंसेवी शाळांच्या द्वारा सातारा जिल्ह्यातील 'रयते'चा फार मोठा पाठिंबा भाऊरावांच्या शैक्षणिक कामास मिळू लागला. विशेषत: १९३८-१९४० सालात संस्थेने १९९ व्हालंटरी शाळा चालविल्या होत्या. या शाळेतील शिक्षक म्हणजे ग्रामीण भागातल्या नाड्या होत्या. लोकांना काय हवंय ते या शिक्षकांकडून कळे. भाऊराव नेहमी म्हणत, "प्राथमिक शिक्षकांचे माझ्यावर मोठे ऋण आहे." या प्राथमिक शाळांपैकी काही सातवीच्या होत्या. तेथील मुलांना जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी राहून शिक्षण घेणे अशक्य होते. (२) स्वयंसेवी शाळांच्या माध्यमातून संस्थेने प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात ध्येयधोरणाप्रमाणे बरीच मजल मारली होती. त्याच्या पुढची पायरी होती माध्यमिक शिक्षणाची. (३) सन १९३९-४० मध्ये सातारा जिल्ह्यात पाचगणीच्या सात पब्लिक स्कूल्स व २ मुलींच्या माध्यमिक शाळा वगळता सातारा जिल्ह्याच्या ११,७९,७१२ लोकसंख्येस फक्त ११ शाळा सात शहरांतच उपलब्ध होत्या. म्हणजे माध्यमिक शिक्षण गरीब रयतेच्या मुलांच्या आटोक्यात नव्हते. अकरा तालुक्यांपैकी पाटण, माण, खटाव, खानापूर, जावली व पेटा खंडाळा व मेढा येथे माध्यमिक शाळाच नव्हत्या आणि हे तालुके डोंगराळ, मागासलेले व अतिदरिद्री होते. भाऊरावांनी

ठरविले की, छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसमध्ये येणाऱ्या गरीबातल्या गरीब मुलास माध्यमिक शिक्षण मोफत मिळाले पाहिजे. त्यासाठी ध्येयधोरणात समाविष्ट केलेल्या 'स्वावलंबन व आत्मनिर्भरता', 'कमवा व शिका' या तत्त्वांचा अवलंबच नव्हे, तर अम्मलबजावणी करण्यास माध्यमिक शाळा क्षेत्र योग्य आहे.

२० जून १९४० रोजी रयत शिक्षण संस्थेचे पहिले माध्यमिक विद्यालय साताऱ्यात सुरू करण्यात आले.

२) या माध्यमिक शाळेस 'महाराजा सयाजीराव फ्री ॲन्ड रेसिडेन्शिअल हायस्कूल' असे नाव देण्यात आले. मराठीत 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' व इंग्रजीत 'सेल्फ हेल्प इज अवर मोटो' हे शाळेचे ध्येयवाक्य ठरविण्यात आले. या माध्यमिक शाळेस बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज यांचे नाव देण्यामागेही त्यांच्या सामाजिक कार्याचा मोठा गौरव करण्याचा हेतू होता. महाराष्ट्राच्या मुख्य भूमीपासून बडोदा संस्थान दूर होते. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांइतकेच अस्पृश्यता निवारणाचे व सामाजिक एकतेचे मोठे काम सयाजीराव महाराजांनी केले होते. पण त्याची महाराष्ट्रातील रयतेस फारच कमी माहिती होती. मुंबईत ३०-१२-१९०४ रोजी सामाजिक परिषदेपुढे आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "जातीचे सर्वात मोठे भयंकर परिणाम घडतात ते राष्ट्रीय वृत्तीवर व राष्ट्रीय एकीवर. जात स्थानिक द्वेष वाढविते. जातीजातीच्या हितात विरोध माजविते. जे एकराष्ट्रीय वृत्तीरूप व समानहितरूप असे एक उदात्त कल्पनाचित्र सर्व जातींच्या लोकांच्या डोळ्यापुढे स्पष्ट रेखाटलेले असावे, ते जात अस्पष्ट करते. देशात दुही माजवून राष्ट्राची व्यंगे ती दुरुस्त करू देत नाही व पाश्चात्त्य सुधारणेच्या सहवासाची फळेही लाभू देत नाही." (श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, प्रथम खंड, पृ. ७०, प्रका. दामोदर सावळाराम आणि मंडळी - १९३६) सयाजीराव महाराजांनी बडोदे संस्थानात अस्पृश्यांसाठी २५१ प्राथमिक शाळा व दोन वसतिगृहे सुरू केली होती. तेथे त्यांना उच्चवर्णीय शिक्षक न मिळाल्याने त्यांनी मुसलमान व ख्रिश्चन शिक्षक नेमले.

३) ता. ४ एप्रिल १९३३ रोजी सयाजीराव महाजारांनी छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसला भेट दिली. जातीभेद मोडून एकसंध समाजनिर्मितीचे स्वप्न पाहणाऱ्या या महाराजांनी भाऊरावांचे जातीनिर्मूलनाचे काम पाहून अत्यंत समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, "या शाहू बोर्डिंग (हाऊस) चे काम पाहून मला विशेष आनंद होत आहे. हिंदुस्थानच्या प्रगतीस लागलेल्या अत्यंत जालीम जाती विशिष्टरूपी किडीच्या मूळावरच रा. भाऊराव यांनी कुऱ्हाडीचा घाव घातल्यामुळे ती ह्या बोर्डिंगच्या व्यवस्थेमुळे मूळातूनच नष्ट होणार आहे. असे बोर्डिंग व याची तत्त्वे अंमलात आणण्याची रीत हिंदुस्थानात कुठेच दिसून येत नाही. इतक्या थोड्या खर्चात नीटनेटकेपणा, टापटीप, मुलांची शिस्त, उत्साह त्यांचा उत्कृष्ट अभ्यास, ऐक्य, परस्परांवरील अकृत्रिम प्रेम पाहून वाटेल तितका खर्च करून एकाद्या राजा-महाराजांकडूनही असली संस्था इतक्या सुंदर व उपयुक्तपणे चालविणे कठीण आहे. याबद्दल रा. भाऊराव पाटलांना जितके धन्यवाद द्यावेत तितके थोडे. ही व अशा संस्था समाजाच्या जागृतीची चिन्हे असल्यामुळे त्यांचे मला कौतुक करावेसे वाटते. या संस्था कार्यकर्त्यांची बुद्धी, विचार, कला व आकांक्षा दर्शवितात व त्या वाढल्या म्हणजे देशाचे पाऊल पुढे पडण्यास मदत होते. त्यांना उत्तेजन देऊन त्यांना समाजाची सेवा करण्यास संधी देणे हे विचारी, विद्वान, धनिक व दूरदर्शी लोकांचे पवित्र कर्तव्य आहे असे मी समजतो. त्यांचा उत्साह अभंग ठेवण्याची सर्व पुढाऱ्यांवर जबाबदारी आहे."

यानंतर महाराजांनी साताऱ्च्या जुन्या इतिहासाचा आढावा घेऊन 'अज्ञान, ऐक्याचा अभाव व खऱ्या धर्माचा विसर यामुळे मराठी राज्य अल्पजीवी' झाल्याचे सांगून आपली भरभराट होण्यासाठी ज्ञानाचा प्रसार करून परस्परांतील भेदभाव आत्मनिरीक्षणाने कमी करण्यास सुचविले; तसेच आपल्या भावी पिढ्यांची शिक्षणाची जबाबदारी स्त्रीवर्गावर असल्याने स्त्रीवर्गास जरूर ते शिक्षण देण्यास सुचविले व म्हटले, "आज जनता जागी झाली असून जागृतीची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत, हा मोठा आशेचा किरण असून साताऱ्यासारख्या लहान शहरात तुम्ही इतके कार्य करू शकता

यावरून आपल्या देशाचा भाग्योदय लवकर होईल, असा मला विश्वास वाटू लागतो. भाग्याचे हे दिवस आता लवकरच येतील याची तुम्हांस मी पूर्ण खात्री देतो. शेवटी आपण केलेल्या सत्काराबद्दल आपले आभार मानून मी आपले भाषण पुरे करतो." (र. शि. संस्थेचा अहवाल : १९३५-१९३८, पृ. ३६-४०)

४) सयाजीराव महाराजांनी या भाषणानंतर वसतिगृहाच्या मुलांनी तयार केलेल्या ज्वारीच्या भाकरीचा व खमंग तिखट पिठल्याचा आस्वाद घेतला. सातारी मिरची त्यांच्या गुर्जरदेशीय मृदू जिभेस झणझणली. लगेच आतार नावाच्या मुलाने बागेतील शहाळ्याचे मधुर पाणी देऊन, शाहू बोर्डिंगच्या सहवासाचा तिखटपणा व माधुर्य एकाच वेळी महाराजांच्या अनुभवास आणून दिला. तसेच भाऊरावांच्या कष्टप्रद ध्येयाची प्रचीतीही.

५) भाऊरावांच्या या राष्ट्रीय व भावनिक एकात्मतेच्या प्रयोगाचे महाराजांना सतत स्मरण होत राहिले. सन १९३५-३६ साली (ता. ३ जाने. ते ११ जाने. १९३६) बडोद्यात सयाजीराव महाराजांच्या राज्यारोहणाचा हीरक महोत्सव होता. रयत शिक्षण संस्थेस निमंत्रण होते. या समारंभात भाऊरावांसाठी दरबारी रीतीरिवाज बाजूस ठेवले. डोक्यावर पगडी व पायांत वहाणा न घालता भाऊरावांना समारंभाच्या सभामंडपात येण्यास महाराजांनी परवानगी दिल्याने महाराजांना हार अर्पण करण्यास भाऊराव सिंहासनाजवळ गेले व हारासह मानपत्र महाराजांना अर्पण केले.

६) अशा या राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व जाणणाऱ्या महाराजांचे संस्थेत स्मारक करण्याची कल्पना भाऊरावांच्या मनात घोळत होती. सन १९३७ साली सयाजीराव महाराज युरोपच्या दौऱ्यावरून परतत असताना इजिप्तमधील जिबुटी बंदरातून २६-११-१९३७ रोजी तार करून भाऊरावास मुंबईस भेटण्यास बोलाविले. भाऊराव महाराजांना मुंबईत ठरलेल्या दिवशी भेटले. गुर्जर प्रांतनिवासी हमीद ए. अलीनीही सन १९३५ मध्ये माध्यमिक शाळेची कल्पना भाऊरावांना सुचविली होती. पण भाऊरावांचा १९२२ सालचा ट्रेनिंग कॉलेजचा 'पण' आडवा येत होता. तो आता सुटलेला होता. भाऊरावांनी ओळखले होते की महाराज आपल्या

संस्थेस मदत करू इच्छितात. भाऊरावांनी सरळ आपली माध्यमिक शाळेची कल्पना महाराजांना सांगितली ती अशी : "सातारा जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी आहे. बहुसंख्य मध्यम आणि मागासवर्गीय मराठा समाज १३०० खेड्यांतून या जिल्ह्यात पसरलेला आहे. त्यास गरीबीमुळे शिक्षण घेता येत नाही. त्यांस स्वावलंबन, आत्मनिर्भरता व आत्मसन्मान या तत्त्वावर माध्यमिक शिक्षण घेण्यास मिळेल तर खेड्यातील मातीत दडलेली अनेक नररत्ने प्रकाशात येतील. नव्हे, त्यांच्या नशिबी शिपाई, चपराशीसारखे नोकर होण्याचे टळेल. दोन तास दररोज शारीरिक श्रम करणाऱ्या मुलास या शाळेत माध्यमिक शिक्षण मोफत मिळेल. त्याने स्वतःच्या गरीबीचे गाऱ्हाणे गाण्याची आवश्यकता राहाणार नाही." (रा. अ. कडियाळकृत 'कर्मवीर भाऊराव पाटील' (इंग्रजी), पृ. २१३-१९)

७) महाराजांना ही योजना पसंत पडली व त्यांनी या शाळेत महाराणी जमुनाबाई शिष्यवृत्तीसाठी तात्काळ रु. ४,०००/- देऊ केले. भाऊरावांनी एवढी लहान देणगी एवढ्या मोठ्या प्रयोगासाठी स्वीकारण्याची नाराजी दर्शविली. सयाजीराव महाराजांनी देणगीचा हा पहिला हप्ता आहे असे सांगून भाऊरावांचे समाधान केले. भाऊरावांनी रक्कम स्वीकारली. ता. ६-२-१९३९ रोजी सयाजीराव महाराज निधन पावले. त्यामुळे महाराजांचे आश्वासन पुरे होऊ शकले नाही. मात्र महाराजांचे स्मारक भाऊरावांनी या हायस्कूलच्या रूपाने पुरे केले. एवढेच नव्हे तर माध्यमिक शिक्षणातही स्वावलंबनाचा एक नवा पायंडा पाडला व एका अभिनव प्रयोगास सुरुवात झाली. रयत शिक्षण संस्थाप्रणीत माध्यमिक शिक्षणाची चळवळ सुरू झाली. भाऊरावांच्या ग्रामीण शैक्षणिक प्रकल्पाचा दुसरा भाग सुरू झाला.

८) जिल्हाधिकारी हमीद ए. अली यांनी संस्थेस शासनामार्फत बक्षीस देवविलेल्या 'चार भिंती' नावाच्या टेकडीच्या पायथ्याशी सयाजीराव महाराजांच्या मृत्यूनंतर बरोबर दहा महिन्यांनी या हायस्कूलच्या व ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतींचा पायाभरणी समारंभ ता. ३-१२-१९३९ रोजी पार पाडण्यात आला. पायाचा दगड महाराजांचे नातू व उत्तराधिकारी प्रतापसिंह

महाराज यांच्या हस्ते बसविण्यात आला. या समारंभाचे पौरोहित्य कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. व सायंकाळी गाडगे महाराजांनी कीर्तन केले. अनेक संस्थानिक, त्यांचे सरदार या समारंभास हजर होते.

९) ही माध्यमिक शाळा भाऊराव पाटील सुरू करीत असल्याचे वरील समारंभाने जाहीर झाले असले तरी ५ जून १९४० ला जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना छापील पत्रकाने ७ वी पास झालेल्या हुशार मुलांना या शाळेत पाठविण्यास सुचविले होते. वार्षिक जेवणखर्च रु. ३५ व शिक्षण फी माफ असे या शाळेचे स्वरूप होते. मात्र प्रत्येक विद्यार्थ्यास दररोज २ तास शारीरिक श्रम करावे लागणार होते. ही शाळा कोठे भरवावयाची? इमारतीचा प्रश्न तातडीचा होता. महाराष्ट्रातील आणखी एक दानशूर संस्थानिक, फलटण संस्थानचे राजे श्रीमंत मालोजीराव नाईक निंबाळकर महाराज भाऊरावांच्या मदतीस धावून आले. भाऊरावांना ते आपल्या वडीलबंधूंच्या ठिकाणी मानत होते. साखरवाडीचा फलटण साखर कारखाना निघाला. त्या कारखान्याच्या अडचणीच्या वेळी मजुरांचे प्रश्न सोडविण्यास भाऊरावांनी मदत केली होती. भाऊरावांनी शब्द टाकताच फलटणच्या महाराजांनी सातारा कँपमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासाच्या पिछाडीस असलेला आपला 'फलटण लॉज' बंगला भाऊरावांच्या हवाली केला. शिवाय दुरुस्तीसाठी रु. ५,०००/- रोख दिले. पाचएक वर्षात हे हायस्कूल सुस्थिर झाल्यावर सदर बंगला रयत शिक्षण संस्थेस सभोवतालच्या सुमारे १० ते ११ एकर मोकळ्या जागेसह बक्षीस दिला आणि या शाळेच्या इमारत फंडासाठी रु. ५,०००/- वेगळे दिले. जाता जाता उल्लेख केला पाहिजे तो हा की, बरोबर १०० वर्षांपूर्वी मुंबईची शिक्षण संस्था (बॉम्बे एज्यु. सोसायटी) १८४० सालापर्यंत माध्यमिक शिक्षण मोफत देत होती. सन १८४१ नंतर बोर्ड ऑफ एज्युकेशनने माध्यमिक शिक्षणास फी बसविली. असा प्रसंग पुढे या संस्थेच्या इतिहासातही आला आहे.

१०) इंग्रजी स्पेशल क्लास व इयत्ता चौथी या वर्गात सुमारे ६० विद्यार्थी पहिल्या वर्षी दाखल झाले. पैकी पाच विद्यार्थी स्कॉलरशिप

मिळाल्याने शासकीय माध्यमिक शाळेत दाखल झाले. या शाळेचे ध्येय स्वावलंबन व श्रममाहात्म्य असल्याने ता. १८ जून १९४० रोजी धनिनीच्या बागेतील वसतिगृहात व सोमवार पेठेतील वसतिगृहात राहिलेले सर्व विद्यार्थी फलटण लॉजवर आपल्या वळकट्या व ट्रंका घेऊन हजर झाले. श्री. शांताराम भाऊराव काकडे ऊर्फ होळकर हे बी. ए. झालेले संस्थेचे माजी विद्यार्थी या मुलांसमवेत मुख्याध्यापक म्हणून या इमारतीत दाखल झाले. पहिले श्रमदानाचे काम म्हणजे ही फलटण लॉजची जुनी इमारत स्वच्छ करणे. इमारत बरेच दिवस रिकामी असल्याने ती आतून बाहेरून जळमटे व केरकचरा काढून स्वच्छ करण्यात आली. या इमारतीच्या दर्शनी भागी असलेल्या दोन मोठ्या हॉलमध्ये वर्गांची व पिछाडीच्या एका खोलीत शाळेचे कार्यालय व व्हरांड्यात शाळेचे पुस्तकालय मांडण्यात आले.

११) मागील भागातील पाचसहा खोल्यांतून मुलांची निवासाची सोय करण्यात आली. या शाळेस जोडून असलेल्या या वसतिगृहास छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस शाखा नं. २ म्हणण्यात येत असे. येथील जेवणाची, स्वयंपाकाची सारी व्यवस्था धनिनीच्या बागेतील वसतिगृहाप्रमाणेच होती. धनिनीच्या बागेतील कै. रा. ब. काळे प्राथमिक शाळेतील सातवी पास झालेल्या व इंग्रजी चौथी नापास झालेल्या काही मुलांनाच सुरुवातीस स्वयंपाक गटाचे प्रमुख करण्यात आले व नवीन मुले त्यांच्या मदतीस देण्यात आली.

१२) या वसतिगृहात अधिक गुणवत्ता असलेल्या मुलांना जेवणाच्या बिलाच्या मोबदल्यात जमाखर्च लिहिण्याचे, भोजन सेक्रेटरीची, श्रम सेक्रेटरीची व भांडारपालांची कामे दिलेली असत. दररोज सकाळी ८ ते १० पर्यंत सर्व मुलांना 'चार भिंती'येथे दोन तास खडी फोडण्याचे, वडारांनी खोदलेली माती पसरून जमीन

सपाट करण्याचे काम असे. याशिवाय फलटण लॉजवर पावसाळ्यात अतिशय गवत वाढत असे ते कापून बैलासाठी पेंढ्या बांधून ठेवाव्या लागत. १९-१०-१९३६ रोजी सदर गांधी टेकडी (चार भिंती) चा ताबा भाऊरावांना दिला, तेव्हा हमीद ए. अली भाऊरावांना म्हणाले, "या

टेकडीशी टक्कर घेऊन कपाळमोक्ष करणार की काय?" पण सन १९५५ साली जेव्हा या टेकडीवर पायऱ्यापायऱ्याने संस्थेच्या शाखांच्या इमारती झालेल्या पाहिल्यावर हमीद ए. अलींनी भाऊरावांच्या दूरदर्शीपणाचे कौतुक केले. ही जागा काढून घेण्याचा प्रयत्नही हितशत्रूंच्याकडून झाला. पण १९३७ च्या काँग्रेस मंत्रिमंडळाने मात्र तो निर्णय रद्द केला. या महाराजा सयाजीराव हायस्कूलचे स्वरूप रयत शिक्षण संस्थेतर्फे सुरू होणाऱ्या इतर हायस्कूलसाठी आदर्श ठरले; तर छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस इतर हायस्कूल्सना जोडून असलेल्या वसतिगृहासाठी अनुकरणीय ठरले.

१३) या हायस्कूलमध्ये शारीरिक श्रमाच्या मोबदल्यात शिक्षणशुल्क माफ करण्याच्या विचाराचे मूळ भाऊरावांच्या खेड्यातील परिसराच्या अभ्यासात सापडते. मात्र डी. ई. सोसायटीने न्यू इंग्लिश स्कूल, पुणेची स्थापना करताना (facilitating and cheapening of Education) शिक्षणाची संधी व स्वस्ताई हे जे ध्येय स्वीकारले होते त्यामुळे ही चालना मिळाली. भाऊरावांना माहीत होते की खेड्यांत पालकांच्या तुटपुंज्या प्राप्तीत भर घालण्यासाठी, शाळेत जाण्यायोग्य मुले, शेळ्या व गुरामागे हिंडतात. शेण्या गोळा करतात, काडीफाटा गोळा करतात. किंवा हलकी सलकी कामे करतात. खेड्यातील मुलांचा हा वेळ वसतिगृहातील शारीरिक श्रमात लावल्यास त्यातून शाळेच्या शिक्षण शुल्काइतकी प्राप्ती खासच होऊ शकते. त्यातून 'कमवा व शिका' ही शैक्षणिक कल्पना भाऊरावांनी आपल्या मोफत शिक्षणाच्या प्रकल्पात मध्यवर्ती ठेवली, आणि पालकांची मने मुलांना माध्यमिक शिक्षण देण्याकडे वळविली. अशिक्षित पालक व शैक्षणिक अर्थशास्त्रज्ञही मुलांच्या ठिकाणी विद्यार्थिदशेत असलेली अर्थार्जनक्षमता आता मान्य करतात. सन १९६० सालापासून 'शैक्षणिक अर्थशास्त्र' ही अर्थशास्त्राची वेगळी शाखा मानतात. (प्रा. टी. डब्ल्यू. शुल्झ , प्रा. डेनिसन, प्रा. गॅलब्रेथ इ.) श्रीमंत पालक मात्र मुलांच्या ठिकाणची ही उत्पादनक्षमता उपयोगात न आणता आपल्या उत्पन्नातील अधिकाचा पैसा मुलांवर भांडवल म्हणून खर्च करतात. मुलांच्या

उपयोगात न आणलेल्या उत्पादनक्षमतेस त्यागलेले उत्पादन (forgone income) म्हणतात.

१४) प्राचीन भारतीय आश्रमीय शिक्षण पद्धतीत मुलांच्या ठिकाणची ही उत्पादनक्षमता शिक्षण शुल्क म्हणून उपयोगात आणली जात असे. गुरूच्या आश्रमात राहाणाऱ्या मुलांना शारीरिक श्रम करावे लागत. सांदीपनीच्या आश्रमात श्रीकृष्ण व सुदामा आदी रानातून लाकडे गोळा करून आणीत. आश्रमीय शिक्षण शब्दाचा अर्थच श्रमाकडे नेणारे शिक्षण. भाऊरावांनी मोठ्या व्यावहारिक दृष्टीने या प्राचीन प्रथेचा अर्वाचीन काळातही खेड्यातील परिसराच्या अभ्यासातून शिक्षणात उपयोग केलेला दिसून येतो.

१५) सन १९४५ साली या महाराजा सयाजीराव विद्यालयातून १२ विद्यार्थी मॅट्रिक पास झाले होते. दुसरे महायुद्ध संपण्याचा सुमार होता. या साली सयाजीराव हायस्कूल व साताऱच्या शासकीय व इतर हायस्कूलसमधून संस्थेच्या बोर्डिंगचे मॅट्रिक पास होणारे सुमारे २० विद्यार्थी होते, तर २८ विद्यार्थी निरनिराळ्या महाविद्यालयात शिकत होते. महायुद्धाच्या काळात (सन १९४०-१९४५) महागाई चौपटीने वाढली होती. वसतिगृहातील भोजन बील दरमहा ३ रुपयांवरून १२ रुपयांवर गेले होते. अशा समयास या वीस मुलांना बाहेरगावी शिकण्यास पाठविणे अवघड होते. रेशनमुळे धान्य खुल्या बाजारात मिळत नव्हते. युद्धामुळे वसतिगृहास मिळणारी (रु. १२००) ग्रँट बंद झाली होती. मग दुय्यम शिक्षण मोफत कसे करावयाचे? भाऊरावांपुढे मोठे आव्हान होते. तशात वसतिगृहातील मुले भूमिगत होऊन 'चले जाव' चळवळीत सामील होत होती. शासनाची वक्रदृष्टी होण्याचे संकटही उभे होते. अशा परिस्थितीचे आव्हान न स्वीकारतील ते भाऊराव कर्मवीर कसले!

१६) भाऊरावांनी ठरविले की, साताऱ्यातील एका माध्यमिक शाळेत खेड्यातील मुले आणण्यापेक्षा माध्यमिक शाळाच खेड्यातील मुलांच्या दारात नेणे रास्त. त्यास कारणे होती दोन. वसतिगृहातून शिकून तयार झालेली सुमारे १५ मुले पदवीधर होऊन संस्थेच्या कामाची

जबाबदारी पेलीत असल्याने भाऊरावांना उसंत होती. मॅट्रिक परीक्षा पास झालेल्या वरील मुलांनाही कामास लावणे जरूर होते. सन १९४५ च्या जून महिन्यात तत्कालीन सातारा जिल्ह्यातील (१) कुसूर, (२) उंब्रज, (३) डांबरखडी (४) सावर्डे (५) खानापूर - माहुली या ठिकाणी पाच माध्यमिक विद्यालये सुरू केली. सयाजीराव विद्यालयातील मॅट्रिक पास झालेल्या मुलांवर त्यांची जबाबदारी सोपविली. यापूर्वीच लोणंद येथील ग्रामस्थांनी आपली माध्यमिक शाळा संस्थेकडे १९४४ मध्ये दिली होती, तर त्याच साली संस्थेचे एक आजीव सभासद रामकृष्ण वेताळ खैरमोडे यांनी अष्टे गावी हायस्कूल सुरू केले होते. जून १९४६ मध्ये रामानंदनगर व भवानीनगर येथे दोन विद्यालये सुरू केली आणि ग्रामीण भागात माध्यमिक शिक्षण नेण्याची चळवळ सुरू झाली. या शाळांना जोडून वसतिगृहेही सुरू करण्यात आली आणि शेतकऱ्यांच्या दारात माध्यमिक शिक्षण नेण्यात आले. या शाळा सुरू करताना भाऊराव स्थानिक शेतकऱ्यांना मुलांच्या 'कमवा व शिका' योजनेसाठी जमिनी मागत आणि माळराने मिळत, त्यांची मुलांतर्फे मशागत करून ती पिकाऊ बनविली जात आणि शासनाच्या 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेसही मदत करीत.

१७) या माध्यमिक शाळा सुरू करीत असतानाच महाविद्यालय सुरू करण्याचे भाऊराव योजीत होते. हे स्वप्न भाऊराव १९४० सालापासूनच पाहत होते. या साली १० ऑक्टोबर रोजी मुंबई विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू श्री. आर. पी. मसानी यांच्या हस्ते सौ. लक्ष्मीबाई पाटील फिरते वाचनालय व ग्रंथालयाचे उद्‌घाटन झाले. दूरदर्शीपणाने भाऊराव कुलगुरूंची सहानुभूती मिळवून होते; पण त्याप्रसंगी महाविद्यालयाची वाच्यता भाऊरावांनी केली नाही.

१८) सन १९४४ साली मराठा मंदिर, मुंबई येथे श्री. भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखालील सभेमध्ये भाऊरावांनी सातारला छत्रपती शिवाजी कॉलेज काढण्याची घोषणा केली होती. त्यासही कारणे होती : (१) साताऱ्याच्या छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस शाखा नं. १ व सयाजीराव हायस्कूलमधून दरसाल सुमारे २५ विद्यार्थी मॅट्रिक पास होणार. त्यांची

महाविद्यालयीन शिक्षणाची सोय करणे गरजेचे होते. (२) परगावी या मुलांना ठेवणे संस्थेस परवडण्यासारखे नव्हते. कारण १९४६-४७ साली सिंधखेरीज मुंबई इलाख्यातील १५ शहरातच बी. ए., बी. एस्सी. ची फक्त ३२ महाविद्यालये होती. पैकी ११ मुंबईत व ६ पुण्यात होती. (३) दुसऱ्या महायुद्धात सामील झालेल्यांच्या पाल्यांसाठी किंवा मुक्त जवानांसाठी कांही जागा राखीव होत्या. त्यामुळे या महाविद्यालयांत गरीबांना प्रवेश मिळणे अवघड होते. (४) संस्थेचे कांही हितचिंतक व विद्यार्थी भाऊरावांना १९४५ साली ते मुंबईत के. ई. एम. इस्पितळात रक्तदाबाने आजारी असताना भेटावयास गेले. त्यांनी साताऱ्यात गरीब मुलांच्यासाठी शास्त्र महाविद्यालय सुरू करण्यास विनविले. कारण अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात प्रवेश मिळविणे अतिकठीण झाले होते. (५) सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेसने १९४५ साली मे महिन्याच्या १२ व १३ तारखेस भाऊरावांना १ लाखाची थैली अर्पण करण्याचा ठराव केला व तो महाराष्ट्र विद्यार्थी काँग्रेसने मान्य केला. (६) मुंबईचे खोक्याचे व्यापारी श्री. धोंडोजी पाटलोजी भोसले नागझिरीकर (सातारा) भाऊरावांना भेटण्यास के. ई. एम. इस्पितळात गेले होते. भाऊराव शिवाजी महाराजांचे नावे महाविद्यालय काढीत असल्याचे ऐकून आपल्या मुंबईतील घरी त्यांना जेवणाचे आमंत्रण दिले. आणि भाऊराव बरे होऊन त्यांच्या घरी गेल्यावर रु. ५,०००/- ची देणगी दिली. त्यांनी एकूण रु. ३०,०००/- दिले. त्यांच्या अवेळी निधनाने त्यांना रु. ७५,०००/- चे लक्ष्य पुरे करता आले नाही व संस्थेचा विशेषतः शिवाजी महाविद्यालयाचा मोठा आधारस्तंभ उन्मळून पडला.

१९) या पार्श्वभूमीवर ता. ५-११-१९४५ रोजी संस्थेच्या सचिवाकडून हे महाविद्यालय काढण्याची भूमिका एका पत्रकाद्वारे प्रसृत करण्यात आली. त्यातील महत्त्वाचा भाग असा, "जातीभेद, धर्मभेद, प्रांतभेद, भाषाभेद, संस्कृतिभेद इत्यादी भेदामुळे आमच्या देशाची हानी झाली आहे. यापुढे राष्ट्रीय एकात्मता निर्माण करता यावी व समाज एकजिनसी करता यावा म्हणून विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याची आवश्यकता आहे. याकरिता संस्थेने सातारा येथे वसतिगृहयुक्त महाविद्यालय सुरू

करण्याचे ठरविले आहे. या वसतिगृहयुक्त महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे चारित्र्य व शीलसंवर्धन या दोन महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष पुरविता येईल..... लोकशाहीच्या न्यायाने व्यक्तिगत विकासाची संधी राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला सारख्या प्रमाणात मिळणे जरूर आहे....... सुधारलेल्या राष्ट्रांत सर्व शिक्षण शक्यतो सर्वांना मोफत देण्याची सोय आहे. म्हणूनच आम्ही आपले महाविद्यालय मोफत करण्याचे ठरविले आहे.

"ज्या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजीसारखा जगप्रसिद्ध स्वराज्यसंस्थापक निपजला त्या महाराष्ट्रात वरील तऱ्हेच्या नवध्येयाने प्रेरित झालेले हे पहिलेच महाविद्यालय निघणार असल्याने सदर महाविद्यालय त्यांच्या स्मरणार्थ काढण्याचे नक्की केले असून त्यास छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा असे नाव देण्याचे योजिले आहे. आमची खात्री आहे व आम्हाला दृढ आशा आहे, की सदर महाविद्यालयामधून त्यागी, ध्येयवादी व कर्तृत्ववान रयतसेवक निर्माण होतील." (र. शि. संस्था अहवाल, १९६६-६९, पृ. ७०-७१) हे पत्रक खानदेशच्या एका मारवाडी धनिकाच्या पाहण्यात आले. त्यांनी आपले नाव महाविद्यालयास दिल्यास रु. दोन लाख देण्याचे आमिष दाखविले. भाऊरावांनी सांगितले, "एकादे वेळी मी माझ्या बापाचे नाव बदलीन; पण या कॉलेजचे नाव बदलणार नाही." आणि ही देणगी नाकारण्यात आली.

२०) ह्या महाविद्यालयात शिक्षण शुल्क आकारले जाणार नव्हते. स्वावलंबन व आत्मनिर्भरतेची अम्मलबजावणी 'कमवा व शिका' या तत्त्वानुसार केली जाणार होती. भाऊरावांना महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुले आपल्या भोजनखर्चासाठी पालकावर भारभूत होऊ नयेत असे वाटे. या मुलांनी दररोज चार ते दोन तास शारीरिक श्रम करून हा खर्च परस्पर मिळवावा ही त्यांची भावना होती. या महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांस कारकुनांच्या तांड्यात सामील न होता, बेकार न रहाता स्वतःच्या हिम्मतीवर कष्ट करून स्वतःस व कुटुंबास पोसणारा निघेल असे शिक्षण देण्यावर भर दिला जाणार होता.

२१) छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस व महाराजा सयाजीराव

विद्यालयात स्वावलंबन, श्रममाहात्म्य व जातपात, धर्मभेदविरहित शिक्षण देण्याचा प्रयोग यशस्वी झाल्याने तो महाविद्यालयीन स्तरावर अंमलात आणणे ओघानेच आले आणि तो वयस्कर असलेल्या विद्यार्थ्यांकडून. उदारमतवादी उच्च शिक्षण व शारीरिक श्रम एकत्र राहू शकत नाहीत, हा त्यांच्या मनातील न्यूनगंड काढून टाकण्याचा प्रमुख हेतू होता.

२२) ग्रीक व रोमन संस्कृतीतून इंग्लंडमध्ये, उच्चभ्रू सरदार-दरकदारांसाठी उदारमतवादी शिक्षण व कनिष्ठ मोलमजुरी करणाऱ्या कामगारांसाठी हाताने करण्याचे श्रमयुक्त शिक्षण देण्याची प्रथा १४ ते १६ व्या शतकात आली आणि तीच प्रथा इंग्रजांनी हिंदुस्थान काबीज केल्यावर भारतात सुरू केली. आणि भारतातील श्रमावर आधारलेली प्राचीन शिक्षण पद्धती बंद झाली. भाऊरावांनी आपल्या संस्थेत तिचे पुनरुज्जीवन केले 'ॲबट आणि वुड' आयोगाने (१९३७) पहिल्याने श्रमाचे माहात्म्य पटविण्याचा प्रयास आधुनिक काळात केला.

२३) योजिल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाविद्यालय जून १९४६ मध्ये सुरू होऊ शकले नाही. कारण दुसऱ्या युद्धोत्तर काळात शास्त्रीय साहित्य व प्रयोगशाळा साहित्य मिळू शकत नव्हते. म्हणून १९४७ साली जून महिन्यात शास्त्र महाविद्यालयाऐवजी कला महाविद्यालय सुरू करण्यात आले. ५० वर्षांपूर्वी साताऱ्यासारख्या अर्धग्रामीण शहरात महाविद्यालय काढणे म्हणजे कपिलाषष्ठीचा योग होता. तरी देखील मूळ योजनेत पुढील चार वर्षांत अनेक बदल करावे लागले. त्यास काही कारणे होती : पहिले कारण म्हणजे, या मोफत शिक्षणाच्या प्रयोगास तत्कालीन शिक्षण खात्याकडून एक पैसाही मदत मिळत नव्हती. हे महाविद्यालय सुरवातीस लहान असले तरी सन १९५१ पर्यंत र. शि. संस्थेने सुमारे दोन लाख रुपये त्यावर खर्च केले होते. हा प्रयोग पांढऱ्या हत्तीच्या स्वरूपाचा संस्थेस न परवडणारा ठरू लागला. संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाने सदर महाविद्यालय इतर महाविद्यालयाप्रमाणे शिक्षण शुल्क घेऊन चालवावे असे ठरविले. भाऊरावांची त्यास सम्मती नव्हती. म्हणून 'कमवा व शिका' योजना वसतिगृहात राहाणाऱ्यांनाच लागू करण्याचे ठरले.

२४) साताऱ्यातील नागरिकांनीही सदर महाविद्यालयात स्थानिक मुलामुलींना प्रवेश द्यावा असा आग्रह व्यवस्थापक मंडळापुढे धरला. या स्थानिक लोकांचा पूर्वीचा विरोध विसरून व्यवस्थापक मंडळाने भाऊरावांच्या सम्मतीने वसतिगृहातील मुलांसमवेत शारीरिक श्रम करण्याची तयारी असल्यास स्थानिक मुलांना महाविद्यालयात प्रवेश तसेच श्रममूल्याइतकी शिक्षणशुल्कात सवलत मिळेल असे जाहीर केले. नंतर स्थानिक गरीब मुलेही वसतिगहातील मुलांसमवेत काम करून शिक्षणशुल्कात सवलत मिळवू लागली. एवढेच नव्हे तर एकतृतीयांश शिक्षणशुल्काइतके श्रम केल्यास एकतृतीयांश शिक्षणशुल्क माफ करून राहिलेल्या दोनतृतीयांश शुल्कासाठी सौ. लक्ष्मीबाई पाटील फंडातून कर्जाऊ मदत देण्याचे ठरविण्यात आले व शारीरिक श्रम करणे ऐच्छिक ठेवण्यात आले. भाऊरावांच्या मूळ 'कमवा व शिका' योजनेत झालेला हा बदल त्यांनी आर्थिक विवंचनेमुळे मान्य केला. साताच्या, कराडच्या महाविद्यालयात सन १९४७ ते १९६० अखेर १०३४ मुलांनी या 'कमवा व शिका' योजनेचा फायदा घेतला. सन १९५९ साली ९ मे रोजी भाऊराव पुण्यात हृदयविकाराने मृत्यू पावल्यावर या योजनेकडे थोडे लक्ष कमी झाल्याचे दिसून येते.

२५) सन १९४८ साली जानेवारीच्या ३० तारखेस दिल्लीत म. गांधींचा वध झाला. साऱ्या देशात दुःखाची लाट पसरली. ता. १२ फेब्रुवारी १९४८ रोजी साताऱ्यात गांधी मैदानात म. गांधींना श्रद्धांजली अर्पण करताना भाऊरावांनी महाराष्ट्रात म. गांधींच्या स्मरणार्थ १०१ माध्यमिक शाळा व महात्मा गांधी ग्रामीण विद्यापीठ स्थापण्याची घोषणा केली. परंतु याच सभेत त्यांनी मुख्यमंत्री बाळासाहेब खेरांच्या पुण्यातील वक्तव्यावर टीका केली. त्याचा विपर्यस्त अहवाल सातारा काँग्रेसमधील हितशत्रूंनी दिल्याने त्यावेळचे मुंबई प्रांताचे शासन वक्रदृष्टीने भाऊरावांच्या कार्याकडे पाहू लागले. आकसाने र. शि. संस्थेची व तिच्या शाखांची अनुदाने स्थगित करण्यात आली. भाऊरावासह चार शिक्षकांवर खोटे आरोप करण्यात आले. परंतु चौकशीतून कांहीही निष्पन्न झाले नाही व शासनास बिनशर्त

अनुदाने द्यावी लागली. ना. बाळासाहेब खेर व गृहमंत्री मोरारजी देसाई यांच्यावर अनेक ठिकाणांहून टीका होऊ लागली. सांगलीचे दैनिक 'नेता', जळगावचे दैनिक 'बातमीदार', पुण्याचा 'ज्ञानप्रकाश' यांनी कडाडून टीका केली. खुद्द काँग्रेसमधील प्रांताध्यक्ष केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यास भरलेल्या सभेत श्री. बाळासाहेब खेर व श्री. मोरारजी देसाई यांच्यावर सभासदांनी त्यांच्या तोंडावर सडकून टीका करून त्यांच्या बेजबाबदार जातीयवादी भाषणाबद्दल व बहुजनसमाजाचे शिक्षण करणाऱ्या र. शि. संस्थेचे आकसाने अनुदान बंद केल्याबद्दल निषेधाचा ठराव पास करण्यात आला.

२६) संस्थेचे अनुदान तहकूब केलेल्या मुदतीत भाऊरावांनी अनेक ठिकाणी दौरे करून संस्थेची बाजू पटवून दिल्याने जनतेने २० खंडी धान्य व त्रेपन्न हजार रुपये इतकी मोठी रक्कम जमा करून दिली. भाऊरावांनी अशा सभा घेऊ नयेत म्हणून त्यांचेवर भाषणबंदी लागू केली होती. सारांश र. शि. संस्था मूळातून नष्ट व्हावी अशी साताऱ्यातील सनातनी भाऊरावद्वेष्ट्या काँग्रेस कार्यकर्त्यांची इच्छा होती. भाऊरावांची ना. बाळासाहेब खेरांवरील टीका हे कोलीत या हितशत्रूंना सापडले आणि खेरांनी अधिकची चौकशी न करता साताऱ्यातील या लोकांच्या खोट्या अर्जावर विश्वास ठेवून साप म्हणून भुई धोपटण्यास सुरुवात केली. भाऊरावांचे वय यावेळी ६१ वर्षांचे होते. त्यांना रक्तदाबाचा व संधिवाताचा विकार होता. त्यात या जीवघेण्या प्रसंगाने भर पडली. भाऊरावांचे आयुष्य कमी होण्यास हेही एक मोठे कारण ठरले.

२७) या संघर्षाच्या काळात संस्थेतील सर्व शिक्षक अर्धपगारावर काम करण्यास तयार झाले. माध्यमिक शाळेतील व महाविद्यालयातील मुले व्हालंटरी शाळेवर काम करण्यास तयार झाली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पूर्ण चौकशीअंती मे १९४८ मध्ये डॉ. धनंजयराव गाडगीळ सातारला कार्यकर्त्यांच्या सभेत भाऊरावांच्या भूमिकेचा गौरव करून म्हणाले, "राज्यशासन जेव्हा उद्दाम व उदंड होते तेव्हा त्यांना वठणीवर आणण्याचे काम ऋषीमुनींना करावे लागते. भाऊराव हे वर्तमानकाळातील यती

आहेत. त्यांनी जे केले ते रास्तच आहे याची मला खात्री पटली आहे."

२८) वास्तविक सन १९३७ साली ता. १७ ऑक्टोबर रोजी नामदार खेरांनी व सन १९३८ साली ता. १४ जानेवारीस श्री. मोरारजी देसाई यांनी र. शि. संस्थेस भेट देऊन, वसतिगृहात राहून भाऊरावांचे काम प्रत्यक्ष पाहिले असल्याने हितशत्रूंच्या सांगीवांगी अहवालावर विश्वास ठेवावयास नको होता. पण काय करणार ! सत्ता त्यांच्या डोक्यात भिनली होती ती उतरणार कशी ? या उभय गांधीवादी म्हणविणाऱ्याकडून गांधीवादी भाऊरावांचा हा छळ झाला एवढे मात्र खरे !

२९) भाऊराव शरीराने थकत चालले होते, तरी मनाची उभारी मात्र दांडगी होती. अशा स्थितीत भाऊरावांनी १५-८-१९४७ रोजी र. शि. संस्थेच्या भावी शैक्षणिक वाटचालीची घोषणा सातारच्या दैनिक 'ऐक्या'च्या 'स्वराज्य' अंकात केली होती की : (१) सातारा जिल्ह्यात एकही खेडे शाळेविना राहू द्यावयाचे नाही, (२) जिल्ह्यात माध्यमिक शाळा काढून १० हजार विद्यार्थ्यांना शक्यतो मोफत शिक्षण द्यावयाचे, (३) हुशार, गरीब व स्वाभिमानी एक हजार मुलांना संस्थेच्या कॉलेजमार्फत मोफत उच्च शिक्षण देण्याची सोय केली जाईल, (४) कै. सौ. लक्ष्मीबाई पाटील स्मारक फंडांतून रु. १० हजारच्या शिष्यवृत्त्या दिल्या जातील. या घोषणेनंतर ता. १२-२-१९४८ रोजी महाराष्ट्रात १०१ माध्यमिक शाळा व म. गांधी विद्यापीठ काढण्याची पूरक घोषणा केली. या पूरक घोषणेनंतर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणांहून माध्यमिक शाळा काढण्यासाठी अर्ज येऊ लागले. सन १९५८ पर्यंत ७६ माध्यमिक शाळा काढण्यात आल्या, त्या अहमदनगर, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यांत भराभर निघाल्या.

३०) अहमदनगर जिल्ह्यातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन होते, डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि मुख्य प्रवर्तक होते विठ्ठलराव विखे पाटील. या प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या आवारात र. शि. संस्थेमार्फत म. गांधींच्या नावे माध्यमिक शाळा सुरू करण्याचे ठरले. किर्लोस्करवाडी व सातारा रोड येथे कारखान्याच्या मालकाकडून सहकार्य मिळाले नव्हते; पण प्रवरानगरला संचालक

मंडळाने कारखान्यात गाळल्या जाणाऱ्या उसाच्या प्रत्येक टनामागे पंचवीस पैसे शिक्षणासाठी र. शि. संस्थेस देणगीरूपाने द्यावयाचे ठरविले. संस्थेने कारखान्याच्या आवारात व कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या प्रमुख खेड्यांत माध्यमिक शाळा मोफत चालवावी असे ठरले, मात्र कारखान्यात मुलांना अंशकालिक काम देण्याची भाऊरावांची योजना मान्य झाली नाही. म्हणून कारखान्याच्या आवारात बहुउद्देशीय शाळा व तंत्रनिकेतन सुरू करावे हे मान्य झाले. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शाळांच्या व्यवस्थापनासाठी स्थानिक व्यवस्थापन समिती नेमण्यात आली. प्रवरानगरच्या माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक (मी स्वत:) या समितीचे सचिव व श्री. विठ्ठलराव विखे अध्यक्ष होते. आज प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याच्या आवारात तंत्रनिकेतन व बहुउद्देशीय शाळा आहे. प्रवरानगर येथील प्रयोगाचे अनुकरण अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव, गणेशनगर, अशोकनगर आदी सहकारी साखर कारखान्यांत झाले. र. शि. संस्थेमार्फत या कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात माध्यमिक शाळा सुरू झाल्या.

३१) सन १९५१ साली प्रवरानगरला माध्यमिक शाळा सुरू करताना भाऊरावांची दृष्टी अशी होती की कारखान्याच्या परिसरातील मुलांना स्थानिक गरजेनुसार छोटीछोटी तांत्रिक पाठ्यक्रमे व प्रात्यक्षिके शिकवून मुलांना स्वावलंबी बनवावे. नोकरीसाठी त्यांनी इतरत्र भटकू नये. कोठारी आयोगाने मान्य केले होते की कारखान्यांनी आपल्या कारखान्यास उपयुक्त ठरतील अशा छोट्या पाठ्यक्रमाच्या व्यावसायिक शाळा कारखान्यांनी स्वत:च चालवाव्यात. तेव्हा कारखान्यांनी अशा शाळा चालविण्याची जबाबदारी स्वीकारावी हे सांगताना भाऊराव किती अचूक व दूरदृष्टीने विचार करीत होते हे दिसून येते.

३२) कर्मवीर भाऊराव ९ मे १९५९ रोजी निधन पावले. त्या साली माध्यमिक शाळा ८५ होत्या. त्यांच्या मृत्यूनंतर एका वर्षात म्हणजे १९५९-६० साली ही संख्या १११ झाली आणि भाऊरावांनी १९४८ साली जाहीर केल्याप्रमाणे १०१ माध्यमिक शाळा सुरू करण्याचे त्यांचे अभिवचन त्यांच्या पश्चात त्यांच्या शिष्यांनी व सहकाऱ्यांनी पुरे केले.

३३) सन १९४८ साली महात्मा गांधी ग्रामीण विद्यापीठ सुरू करण्याचे जाहीर केल्यापासून, माध्यमिक शाळांच्याबरोबर महाविद्यालय सुरू करण्याकडे त्यांचे लक्ष लागले होते. सन १९५३ पासून सातारच्या शिवाजी महाविद्यालयात पदवीपरीक्षेचे वर्ग सुरू झाल्यापासून विद्यार्थीसंख्या वाढत राहिली व ते महाविद्यालय आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर झाले.

३४) भाऊरावांना तालुक्यांच्या ठिकाणी महाविद्यालये सुरू करण्याची इच्छा होती. त्यासाठी पहिले कराड हे गाव निवडले. सन १९५३ साली विजयादशमीच्या दिवशी कराडला संत गाडगे महाराज यांचे नावे जून १९५४ पासून महाविद्यालय सुरू करण्याचे जाहीर केले. तालुक्याचे गाव असले तरी पंचक्रोशीत या महाविद्यालयात पुरेशी मुले येतील अशा अनेक माध्यमिक शाळा होत्या. कॉलेजच्या जागेचा प्रश्न कराडच्या पूर्वेस एका बंद पडलेल्या कारखान्याच्या इमारती मिळवून सुटला. पुणे विद्यापीठाने परवानगी दिली. पुण्याच्या मंडईतील भाजीविक्रेत्याकडून श्री. बाबूराव सणस व मेयर शंकरराव उरसळ यांनी एका दिवसाची कमाई देणगीरूपाने मिळवून पुणे विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे भरावी लागणारी रक्कम उभी केली व हे महाविद्यालय सुरू झाले.

३५) भाऊरावांच्या हयातीत सुरू झालेले तिसरे महाविद्यालय म्हणजे सातारचे आझाद शिक्षण महाविद्यालय. सन १९५४ सालापर्यंत र. शि. संस्थेच्या ५५ माध्यमिक शाळा होत्या. यापैकी अनेक शाळांवर शिक्षण खात्याच्या नियमानुसार बी. टी. किंवा बी. एड. मुख्याध्यापकच नेमावे लागत. बेळगाव, कोल्हापूर, मुंबई येथील शासकीय बी. एड्. महाविद्यालयात मोजक्याच पदवीधरांना प्रवेश मिळत असे. म्हणून जून १९५५ पासून सातार्‍यात बी. एड. महाविद्यालय सुरू करण्यासाठी पुणे विद्यापीठाकडे अर्ज करण्यात आला होता. कराडला गाडगे महाराज महाविद्यालय सुरू केल्याने आर्थिक अडचण होती तरीदेखील धाडस करून हे महाविद्यालय सुरू करण्यात आले. मुंबईचे श्री शेठ त्रिकमदास ठाकुरदास यांनी डॉ. आर. के. भोसले यांचेमार्फत रु. ५,००० पाठविले. त्याशिवाय संस्थेच्या प्रवरानगर शाखेतर्फे मी काही रक्कम दिली व विद्यापीठाच्या

नियमानुसार या महाविद्यालयासाठी रक्कम उभी करण्यात आली. संस्थेतर्फे निघतील तेवढी माध्यमिक विद्यालये सुरू करण्यास वेग आला. या सालापासून बी. एड. कॉलेजमध्ये शेकडा ७५ विद्यार्थी-शिक्षक संस्थेच्या शाळेतीलच असत. संस्थेच्या महाविद्यालयातून तयार झालेले टी. डी. शिक्षक व हे बी. एड. शिक्षक उपलब्ध झाल्याने रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शाळांत विनीत शिक्षकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले व त्याबरोबरच गुणवत्तेच्या प्रमाणात मोठा व लक्षणीय फरक पडला. बी. एड. कॉलेजचे पुढे आझाद शिक्षण महाविद्यालय नामकरण करण्यात आले.

३६) भाऊरावांचा आजार सन १९५५ पासून फारच बळावला. त्यांचे हृदय प्रमाणाबाहेर विस्तारले होते. संधी वाताने त्यांचे पाय सुजलेले असत. प्रवास व फिरणे जवळ जवळ थांबले होते. उपचारासाठी वाई, पुणे आदी ठिकाणी त्यांना हलवावे लागे. त्यांचे मन नवनवीन योजना आखण्यात गढले असावयाचे; पण दुर्बल शरीर साथ देत नव्हते. स्वत: होऊन धडपडून अस्तित्वात आणलेले बी. एड्. कॉलेज ही शेवटची शाखा होय. त्यातूनहि स्वीय सहाय्यकाची मदत घेऊन महत्त्वाच्या समारंभास ते हजर राहात. यापुढे संस्थेच्या दृष्टीने त्यांचे अस्तित्व मोलाचे होते. आजीव सेवक व त्यांचे स्नेही त्यांना प्रवास व शारीरिक श्रम टाळून विश्रांती घेण्यास सुचवीत. पण विश्रांती हा त्यांचा स्वभावधर्म नव्हता. त्यांचा आजारच त्यांना सक्तीने विश्रांती घ्यावयास लावीत होता; आणि त्यानेच शेवटी त्यांना ९ मे १९५९ रोजी चिरनिद्रा घ्यावयास लावली.

३७) रयत शिक्षण संस्थेची सन १९३५ साली रा. ब. रावजी रामचंद्र काळे यांनी पहिली घटना तयार केली. ती डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणेच्या घटनेवर बेतली होती. प्राचार्य व्ही. एस. आपटे यांनी डेक्कन एज्युकेशन संस्थेची घटना १८८० त मंजूर करताना प्रवर्तकापुढे सांगितले की, "आमची महत्त्वाकांक्षा आहे की वेळेनुसार या प्रांताच्या बहुतांश भागात स्वतंत्र खाजगी संस्थेच्या (म्हणजे डी. ई. सोसायटीच्या) माध्यमातून शाळांचे जाळे विणण्यात येईल; आणि हे ध्येय साध्य करण्यासाठी आपले स्वत:चे महाविद्यालय पाहिजे की जेथून आपल्या

देखरेखीखाली व आपल्या प्रणालीप्रमाणे चांगल्या कामासाठी स्वार्थत्याग करणारे पदवीधर मिळतील." (डी. ई. सोसायटीच्या प्रा. पी. एम. लिमयेकृत इतिहास,) १९३५, पृष्ठ ७२). डी. ई. सोसायटीची प्रणाली होती ती स्वाभिमान व राष्ट्रभक्ती तरुणांत रुजविण्याची. तसेच पारतंत्र्यात पडलेल्या आपल्या राष्ट्राची भौतिक, नैतिक व धार्मिक उन्नती करण्यास व पुढारलेल्या राष्ट्राच्या पंक्तीत त्यास आणण्यास शिक्षण हेच मानवी संस्कृतीतील प्रमुख साधन आहे, असे प्रा. आपट्यांनी वरील भाषणात म्हटले आहे. (उक्त ग्रंथ पृ. ७१)

३८) प्राचार्य आपट्यांनी सांगितलेल्या या उद्दिष्टापासून डी. ई. सोसायटी पुढे ढळली. त्यास प्रा. लिमयांनी वरील ग्रंथात काही कारणे दिली ती अशी : (१) लहान लहान केंद्राच्या ठिकाणी माध्यमिक शाळा सुरू करणे हे स्थानिक लोकांच्या इच्छेवर व आर्थिक मदतीवर अवलंबून असल्याने सोसायटीच्या कामावर बंधने पडत. (२) स्थानिक कार्यकर्त्यांच्या जिव्हाळ्यावर व स्थानिक पाठिंबा मिळविणाऱ्यांनाच हे क्षेत्र योग्य होते. (३) फर्ग्युसन महाविद्यालय ही नियोजित माध्यमिक शाळांसाठी सेवाभावी शिक्षक तयार करणारी संस्था न राहता उच्च दर्जाचे सर्वांगीण शिक्षण देणारी संस्था झाल्याने संस्थापकांच्या मूळ उद्दिष्टापासून ढळली. त्यापेक्षाही माझ्या मते भाऊरावासारखा ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचणारा नेता डी. ई. सोसायटीकडे नव्हता.

३९) कर्मवीर भाऊराव पाटलांनी मात्र डी. ई. सोसायटीने केलेली चूक सुधारून, प्राथमिक शिक्षणापासून तिच्या राहिलेल्या कामास हात घातला; प्राथमिक शाळा व ट्रेनिंग कॉलेज, माध्यमिक शाळा, छत्रपती शिवाजी महाविद्यालय व आझाद शिक्षण महाविद्यालय काढून ग्रामीण भागातील शाळांसाठी शिक्षक तयार केले. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांतूनच शिक्षक तयार केले असल्याने त्यांच्या ठिकाणी स्थानिक शाळांविषयी प्रेम व आस्था असे. स्थानिक शेतकरी व धनिक त्यांच्या मदतीस येत. त्यामुळे ग्रामीण भागांत भराभर माध्यमिक शाळा निघू शकल्या, व डी. ई. सोसायटीचे राहिलेले कार्य कर्मवीर भाऊरावांनी पुरे

केले. हे डॉ. जी. एस. महाजनी यांनी २३-९-१९७३ रोजी सातारला संस्थेच्या कार्यकर्त्यांपुढे आग्रहाने मांडले. या शाळांत मुलांची संख्या पुरेशी राहावी म्हणून सोबत वसतिगृहे आवश्यक ठेवली. या वसतिगृहातूनच या मुलांवर स्वाभिमानाचे, स्वावलंबन व श्रममाहात्म्याचे संस्कार केले जात.

४०) डी. ई. सोसायटीच्या संस्थापकांच्या उद्देशामध्ये एक भाग महत्त्वाचा होता, तो हा की, एका मध्यवर्ती संस्थेच्या छत्राखाली ही माध्यमिक विद्यालये व महाविद्यालये चालावीत. तो भागही भाऊरावांनी यशस्वी करून दाखविला. डी. ई. सोसायटीचे अनुकरण अनेक संस्थांनी केले. पण र. शि. संस्थेने अनुकरण केलेल्या बाबी पुढीलप्रमाणे होत. (१) प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांच्या माध्यमातून ग्रामीण समाजास नेतृत्व पुरविले. (२) शिक्षकांच्या बाबतीत स्वार्थ त्याग व स्वावलंबनाचा आदर्श ठेवल्याने कमी पगारावर डी. ई. सोसायटीच्या आजीव सेवकाप्रमाणे रयत शिक्षण संस्थेचे आजीव सेवक काम करीत.

४१) दोन पावले पुढे जाऊन भाऊरावांनी या अनुकरणात नवीन भर टाकून ग्रामीण भागात शैक्षणिक संस्था चालविण्यासाठी एक नवीन आदर्श निर्माण केला. भाऊरावांनी सामान्य जनतेच्या शिक्षणासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकरण व लोकशाहीकरण हे ध्येय ठेवले. श्रमातून शिक्षण घेता येते ही नावीन्यपूर्ण कल्पना राबविली, आणि डी. ई. सोसायटीचे शिक्षणाच्या स्वस्ताईकरणाचे तत्त्व मोफत शिक्षणाच्या पातळीवर आणून ठेवले. सारांश, स्वावलंबन व स्वार्थत्याग यांचे व्यवहारीकरण करून भाऊरावांनी शिक्षणप्रसाराच्या बाबतीत ग्रामीण भागासाठी एक वस्तुपाठ तयार करून ठेवला, पण त्याची बैठक मात्र महात्मा फुल्यांच्या मानवतावादी कारुण्याची राखली. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत भाऊरावांचा दृष्टिकोन बंडखोरीचा व परिवर्तनवादी असला तरी शैक्षणिक सुधारणांच्या बाबतीत तो समन्वयवादी होता.

■

प्रकरण दहावे

# भाऊरावांचे शैक्षणिक तत्वज्ञान

१) 'तत्त्वज्ञान' शब्द उच्चारताच वाचकांची अशी कल्पना होते की आत्म्याच्या ऐहिक किंवा पारलौकिक जीवनाविषयी सांगितलेली काही तरी धीरगंभीर क्लिष्ट विचारधारा. भाऊरावांनी असले विचार काही सांगितलेले नाहीत. त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणजे शिक्षणाकडे पाहण्याची त्यांची एक जीवनदृष्टी आहे. सर्वसामान्यांना समजेल, पेलवेल अशी व्यवहारी, आचरणात आणण्याजोगी एक शैक्षणिक पद्धती त्यांची आहे. तिचा येथे विचार करावयाचा आहे.

२) शिक्षणामध्येही तात्त्विक व उपयोजित पद्धती असतात. पहिल्या पद्धतीत मूलभूत सिद्धांत मांडण्याचा प्रयास असतो. दुसऱ्या प्रकारांत कृतींवर भर असतो. भाऊरावांनी आपल्या शिक्षणप्रसाराच्या व सामाजिक उत्थानाच्या चळवळीत कृतीवर जास्त भर दिलेला दिसून येतो. या कृतीतून इतरांना अनुकरणासाठी जे निष्कर्ष निघाले ते भाऊरावांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान होय. सर्वसामान्य सुशिक्षित माणसांची कल्पना असते की, शैक्षणिक तत्त्वज्ञान सांगणारा मनुष्य विद्यापीठाच्या पदव्यांनी युक्त विद्वान असला पाहिजे. विद्यापीठ पदव्यांनी विभूषित 'उच्चभ्रू' लोकांचा हा गैरसमज आहे. असे लोक नाके मुरडून तुच्छतेने म्हणतात, "भाऊराव आणि तत्त्वज्ञान सांगणार!" हा त्यांचा बौद्धिक अहंकार भाऊरावांच्याबाबतीत अप्रस्तुत आहे.

३) सर्वसामान्य बुद्धिमत्ता असलेला व सभोवतालच्या सामाजिक व्यवहाराचा चिंतन करणारा मनुष्य जीवनाविषयी, मानवी व्यवहाराविषयी जे विचार करतो ते त्याचे तत्त्वज्ञान होऊ शकते. फरक एवढाच असतो की विद्यापीठीय शिक्षणाच्या अभ्यासातून पदवीधर विद्वान मनुष्य एकाद्या विषयावर सखोल, सुसंगत व शास्त्रीय पद्धतीने विचार मांडू शकतो, तेव्हा पदवीचा आणि जीवनाविषयी किंवा एकाद्या विषयाविषयी तत्त्वज्ञान सांगण्याचा तसा संबंध कमीच. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाने बुद्धीला विशिष्ट दिशेने अभ्यास करण्याची किंवा संशोधन करण्याची सवय लागते हे खरे ! अशी सवय हे साधन आहे. तत्त्वज्ञान शोधणे हे साध्य आहे. बुद्धीची देणगी असलेला, पण संशोधनाचे औपचारिक शिक्षण नसलेला मनुष्यही सुसंगत तत्त्वज्ञान देऊ वा सांगू शकतो. भाऊरावांच्याबाबतीत हे घडले आहे.

४) भाऊरावांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान त्यांनी शाळा, महाविद्यालये व वसतिगृहे यांत केलेल्या प्रयोगांतून निर्माण झालेले आहे. त्यांना व्यावहारिक असामान्य बुद्धी होती व तिला औपचारिक संशोधनाची बैठक नव्हती हे मान्य करूनही त्यांनी शिक्षणक्षेत्रात मौलिक भर टाकली हे मान्यच करावे लागते. अशी काही उदाहरणे भूतकाळात घडली आहेत. पहिले उदाहरण आहे ते अकबर बादशहाचे. अकबर जवळ जवळ निरक्षर होता, पण नैसर्गिक बुद्धिमत्ता असल्याने त्याने शिक्षणात भर घातली. त्याने शिक्षणाच्या पद्धती व अभ्यासक्रम यात सुधारणा केल्या. मुलांच्या स्वाध्यायावर त्याने भर तर दिलाच, पण शेती, हिशेब, प्रशासन यासारखे विषय अभ्यासक्रमात घातले. हिंदूंनाही मदरसा व मक्तबमधून अभ्यासाची सोय करून धार्मिक शिक्षणावरील जोर कमी केला. अपदवीधर स्वामी रामकृष्ण परमहंसाचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान त्यांचे परमशिष्य स्वामी विवेकानंदाने सुसंगत मांडले, हे दुसरे उदाहरण आहे. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड (तिसरे) महाराजांना औपचारिक शालेय व महाविद्यालयीन शिक्षण मिळाले नाही तरी उपजत अलौकिक बुद्धिमत्तेमुळे, स्वाध्यायाने ते पट्टीचे राजकारणी, अर्थतज्ज्ञ व सामाजिक व शैक्षणिक सुधारक झाले. त्यांनी भाऊरावांच्या प्रयोगाची स्तुती केली होतीच. महाराजा सयाजीराव हे

तिसरे उदाहरण; तर चौथे उदाहरण महात्मा फुल्यांचे आहे. त्यांना महाविद्यालयीन औपचारिक शिक्षण मिळण्याची सोयच १८४० ते १८४८ दरम्यान नव्हती. मुंबई विद्यापीठ १८५७ मध्ये सुरू झाले. नैसर्गिक अलौकिक बुद्धिमत्ता असल्याने ते पट्टीचे समाजसुधारक झाले व सत्यधर्मासारखे तत्त्वज्ञान त्यांनी सामान्य जनांसाठी सांगितले व ग्रंथरूपाने सिद्ध केले, पण चिपळूणकरशास्त्र्यांसारख्या पदवीने विभूषित असलेल्या व्यक्तीने त्यांचा उपहास केला. एवढेच काय, महात्मा गांधींनी मूलोद्योगी शिक्षणाची व्याख्या करताच काही विद्यापीठीय कुलगुरूसह अनेक पुस्तकपंडितांनी त्यांचा उपहास केला. परंतु कालांतराने 'कार्यानुभव' सारख्या नावाने कम्युनिटी स्कूल शिक्षण पद्धतीतून 'मूलद्योगाची' कल्पनाच निराळ्या स्वरूपात आता स्वीकारलेली दिसते. तेव्हा 'भाऊरावांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान काय असणार !' असा उपहास करणारे करोत. मी भाऊरावांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा आढावा येथे घेत आहे.

५) हेही लक्षात घेतले पाहिजे, की पुस्तकी औपचारिक शिक्षण म्हणजे सुसंस्कृतपणा नव्हे. डेन्मार्कच्या जनता कॉलेजचे प्रवर्तक डॉ. ग्रंडीग म्हणतात, "विषयांतील बौद्धिक प्रभुत्वे म्हणजे सुसंस्कृतपणा नव्हे, बुद्धिमान लोक सुसंस्कृत असतीलच असे नाही. मात्र दोहोत विरोध नाही. कांहींच्या ठिकाणी बुद्धिमत्ता व सुसंस्कृतपणाही एकत्र असू शकेल." हे डॉ. राधाकृष्णन समितीच्या उच्च शिक्षणावरील अहवालात (१९४८-४९) म्हटले आहे. याशिवाय "सर्व संशोधनापैकी काहीसाठी पदव्या किंवा प्रयोगशाळा लागतातच असे नाही. फक्त संशोधकांत जिज्ञासू वृत्ती हवी. सामाजिक व शैक्षणिक संशोधनाच्या बाबतीत हे प्रामुख्याने खरे आहे." हे वरील अहवालातील विचार (पृ. ५६१ - ८३) भाऊरावांना लागू पडतात. थॉमस रीड नावाच्या लेखकास सामान्य व्यवहारी तत्त्वज्ञानाच्या शाखेचा प्रवर्तक मानले जाते. त्या सामान्य व्यवहारी तत्त्ववेत्त्यांत भाऊरावांची गणना करावी लागते व त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानास सामान्य व्यवहारी शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणावे लागते.

६) प्रा. हुमायून कबीर 'शिक्षणाचे भारतीय तत्त्वज्ञान' या

आपल्या ग्रंथात म्हणतात, "शिक्षणाचे तत्त्वज्ञान लोकांच्या तत्कालीन सामाजिक पार्श्वभूमीशी निगडित पाहिजे आणि त्या आधारेच देशाचे शैक्षणिक धोरण ठरले पाहिजे." असे दिसून येते की विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत महाराष्ट्रात जी सामाजिक स्थिती होती ती पाहूनच भाऊराव लोकशिक्षणाकडे वळले. या लोकशिक्षणाच्या दिशेने वाटचाल करताना भाऊरावांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानावर पौर्वात्य व पाश्चिमात्य शिक्षणाचा परिणाम निश्चितच झाला. डॉ. रवींद्रनाथ टागोर किंवा महर्षी अरविंद यांच्यासारखी त्यांची समन्वयाची विचारसरणी होती, पण भाऊरावांनी आत्मा, मोक्ष आणि आत्म्याचे परमात्म्याशी मीलन यावर जोर दिला नाही. भाऊरावांनी जनतेच्या ऐहिक गरजा भागवून राजकीय, सामाजिक आणि भौतिक जोखडातून त्यांना मुक्त करण्याकडे लक्ष दिले. त्यातूनही मुलांच्या चारित्र्यसंवर्धनाकडे व सर्वांगीण उन्नतीकडे अधिक लक्ष दिले की जेणेकडून ते समाजाचे आदर्श सेवक होतील. हाच त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. आध्यात्मिक मुक्तीची कल्पना त्यांनी ऐहिक पातळीवर राबविली. त्यामुळे प्राचीन धार्मिक बाबीस त्यांच्या प्रयोगात वाव नव्हता. शिक्षण हे परकीयांच्या गुलामगिरीतून व स्वकीयांच्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचे प्रभावी साधन आहे हे सांगत असतानाच पाश्चात्य शिक्षणातील सामाजिक समता, न्याय व संधीची समानता या तत्त्वांची त्यांनी पौर्वात्य आध्यात्मिक मुक्तीच्या कल्पनेशी ऐहिक मुक्तीच्या पातळीवर सांगड घातली.

७) व्यक्तीच्या सर्वांगीण प्रगतीची आश्रमीय पद्धत त्यांनी वसतिगृहाच्या स्तरावर राबविली. मुलांनी स्वतःच्या प्रगती . व उपजीविकेसाठी शेती करणे, जनावरांची निगा राखणे, सरपण फोडणे, शेतीसाठी व पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करणे, स्वतःसाठी झोपड्या बांधणे, स्वतःचा स्वयंपाक करणे व इतर अनुषंगिक आश्रमीय कामे करणे यावर त्यांचा भर असे. दुधगावच्या पहिल्या वसतिगृहास त्यांनी विद्यार्थी आश्रम असेच नाव दिले होते. भाऊराव हायस्कूलच्या मुलांच्या अभ्यासावर तर ही मुले प्राथमिक शाळेतील मुलांच्या अभ्यासावर लक्ष

ठेवीत. या वसतिगृहातील दिनचर्येमुळे उद्योगप्रियता, आत्मनिर्भरता, साधी राहणी व उच्च विचारसरणी, समाजसेवा व दुसऱ्याच्या दु:खाची कदर करणे, दुसऱ्याच्या श्रमांचा गैरफायदा न उचलणे व श्रमाची महती जपणे या गुणांचा मुलांत परिपोष होई व त्यांची सन्मार्गी राहण्याकडे प्रवृत्ती तयार करण्याचा हेतू असे. हाताने श्रम करण्याची, 'कमवा व शिका' ही योजना ऐहिक उन्नती व मोफत शिक्षणाचा पाया होता.

८) जैन धर्मात मानवाच्या मुक्तीसाठी चतुर्विध दाने सांगितली आहेत. वसतिगृहाच्या स्थापनेमुळे त्यांचे आपोआप आचरण होत असे. **विद्यादाना**मुळे वसतिगृहात मुलांना **अन्नदान** मिळे. आजारी मुलांना **औषधदान** मिळे. गरीब अनाथांना **अभयदान** मिळे. लोकशिक्षणाकडे वळण्यात या दान संकल्पनेचाही भाऊरावांकडून अम्मल होत असे. समाजातील कमकुवत घटकांतील मुले, निराधार मातृपितृविहीन मुले, शूद्र व दलित अस्पृश्य मुले व मुली यांच्यासंबंधी अपार करुणा भाऊरावांच्या ठिकाणी होती. सन १९२९ सालातील स्टार्ट समितीपुढील त्यांची साक्ष याचे द्योतक आहे.

९) या वसतिगृहातून भाऊरावांनी आपल्या कार्याची धुरा वाहणारे स्वाभिमानी, निर्भय, आत्मनिर्भर आपणासारख्याच तरुणांच्या पिढ्या तयार केल्या. 'रयत सेवक' तयार करणारे ते शिल्पकार ठरले. विशेषत: शारीरिक श्रमावर भर देण्यामागे दोन हेतू होते. ग्रामीण व शहरी मुलांत 'लाथ मारीन तेथे पाणी काढीन' ही प्रवृत्ती वाढवावी. व अस्पृश्य लोक जी हलकीसलकी कामे करतात त्याविषयी तिरस्कार करू नये म्हणून वसतिगृहात झाडलोट करणे, शौचालये साफ करणे, सर्वांना सक्तीचे होते.

१०) ही हलकीसलकी स्वच्छतेची कामे करण्याने मुलांच्या ठिकाणी उपजीविकेसाठी कोणतेही काम करणे कमीपणाचे नाही याची जाणीव व आत्मविश्वास निर्माण व्हावा ही अपेक्षा होती. शिक्षणानंतर मुलांना आपल्या गरीब पालकांविषयी लाज वाटता कामा नये. उलट, त्यांच्या मदतीसाठी कंबर कसून ते तयार झाले पाहिजेत. तसेच नोकरी करीत असताना स्वत्व, स्वाभिमान यांची लाचारीशी तडजोड करता कामा

नये, मात्र दिलेले काम अनेक अडचणी सोसून पुरे करण्याची विद्यार्थ्याची प्रवृत्ती बनेल याकडे भाऊरावांचे लक्ष असे. सन १९४८ साली शिक्षण खात्याने अनुदान बंद केल्यावर शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी जी प्रवृत्ती दाखविली हे त्यांचे ज्वलंत उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी भिक्षा मागणे भाऊरावांच्या तत्त्वात बसत नव्हते. 'कमवा व शिका' यामागे स्वाभिमान जागृत ठेवून सर्वांगपरिपूर्ण लोकोपयोगी नागरिक बनवणे ही दृष्टी होती. म्हणूनच र. शि. संस्थेच्या घटनेत माधुकरीसारख्या प्रथेचा त्यांनी समावेश केला नाही.

११) स्वावलंबन व स्वत:ची मदत स्वत:च करणे या डी. ई. सोसायटीच्या आजीव सभासदाच्या तत्त्वाचा शिक्षकांच्या बाबतीत; तर मुलांच्या बाबतीत अमेरिकेतील बुकर टी. वॉशिंग्टनच्या टस्कघी विद्यापीठातील 'हाताचे शिक्षण' शेतीच्या कामात व इमारती बांधण्याचे कामात स्वीकारल्याचे दिसते. आणि 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' (सेल्फ हेल्प इज अवर मॉटो) हे ध्येय ठरवून शासनाकडे, शेतकऱ्याकडे 'आम्हांस पडीक जमीन (वेस्ट लँड) द्या; आम्ही तिचे सुपीक (बेस्ट लँड) जमिनीत श्रमाने रूपांतर करू,' असे भाऊराव जाहीरपणे सांगत. ही मागणी करताना जनतेस शिक्षणाभिमुख करून शेतीच्या बाबतीत त्यांच्यामध्ये शास्त्रीय दृष्टिकोन रुजविण्याचा हेतू होता.

१२) स्वावलंबन आणि आत्मनिर्भरता हे गुण तरुणांच्यावर कसा परिणाम करतात हे सांगताना श्री. ए. पी. मॅकडोनेल म्हणतात, "स्वावलंबनाची निर्मिती आत्मसंयमातून होते, आणि आत्मसंयम केवळ ज्ञानग्रहणाच्या पद्धतीच्या पलीकडे जाऊन नैतिक आचरण व संस्थेच्या ध्येयाशी तादात्म्यातून निर्माण होते." भाऊरावांच्या विद्यार्थ्यांनी सन १९३७ साली आजीव सेवक होण्याच्या शपथा घेतल्या. त्यांची बैठक संस्थेच्या ध्येयधोरणाशी तादात्म्य, कृतज्ञता, आत्मसंयम व स्वावलंब यातून निर्माण झाल्याचे दिसते.

१३) भाऊरावांच्या या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा अंतिम हेतू पिळवणूकरहित एकसंध भारतीय समाजनिर्मितीचा होता. जातपात, भेद

यांना थारा न मिळता सर्वांना मानव म्हणून शिक्षणाची व प्रगतीची संधी मिळाली पाहिजे. भारतास आत्मनिर्भर, संपन्न राष्ट्र बनविण्याचा तोच मार्ग आहे अशी त्यांची ठाम समजूत होती. परंतु हे ध्येय साध्य करण्यासाठी भाऊरावांनी आपल्या वसतिगृहातील कमकुवत स्तरातील मुलांना, जात-पात, जातिबहिष्कृतता, स्पृश्याकडून होणारी पिळवणूक व जुलूम यापासून निर्भय बनण्यास प्रथम शिकविले. भित्रा मनुष्य बंडखोर बनू शकत नाही. सांप्रदायिकता, जातपात, विवेकशून्य रूढी यांच्या भयापासून मुलांना मुक्त करून त्यांना मुक्त मानव बनविण्याचे भाऊरावांचे तत्त्वज्ञान होते; आणि हे काम परकीय सत्तेच्या भयापासून मुक्त करण्यास पूरक होते.

१४) महाराष्ट्राच्या बाबतीत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद निरर्थक असल्याचे १९५३ साली त्यांनी पहिल्या महाराष्ट्र सामाजिक परिषदेत जाहीरपणे सांगितले होते. याची जाण भाऊरावांनी सन १९२२-२३ साली 'कुऱ्हाड' साप्ताहिकासाठी प्रबोधनाच्या पहिल्या प्रस्तावनेत स्पष्ट केली होती. सन १९५८ साली साताऱ्याच्या जिल्हा परिषदेने भाऊरावांना त्यांच्या आजारपणाच्या स्थितीत मानपत्र देऊन सत्कार केला, त्यावेळी भाऊराव म्हणाले, "ब्राह्मण समाजावर तरुणपणाच्या अविचारी अवस्थेत त्या काळास अनुसरून त्यांनी टीका केली; त्याबद्दल त्यांना पश्चात्ताप होतो आहे. आता हा वाद गाडून टाकला पाहिजे." आंतरजातीय विवाह हा वाद मोडण्यास पूरक आहे अशी त्यांची धारणा असल्याने अशा लग्नसमारंभास भाऊराव स्वत: हजर राहून वधूवरांना आशीर्वाद देत. आचार्य अत्र्यांच्या विवाहास ते हजर होते. कारण अत्र्यांचा तो विवाह आंतरजातीय होता.

१५) सारांश, भाऊरावांचें तत्त्वज्ञान मानवतावादावर आधारलेले होते. पॉल फ्रेअरी या ब्रॅझेलियन शिक्षणतज्ज्ञाच्या व्याख्येप्रमाणे भाऊराव हे प्रागतिक, मानवतावादी सामाजिक मुक्तीचे पुरस्कर्ते 'शिक्षणाचार्य' होते असे म्हणावे लागते. शिक्षणक्षेत्रात जागतिक स्तरावर शिक्षणाच्या तत्त्ववेत्त्यांनी शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाचे चार औपचारिक विभाग पाडले आहेत, ते असे: स्वभाववाद (नॅचरॅलिझम), आदर्शवाद (आयडियालिझम), वास्तववाद (रिॲलिझम) आणि व्यवहारवाद

(प्रॅग्मॅटिझम). या खेरीजही वेगळ्या तऱ्हेने हे वर्गीकरण काही शिक्षणतज्ज्ञ करतात. भाऊरावांचे तत्त्वज्ञान व्यवहारवादात मोडते. शिक्षणप्रसार करीत असताना भाऊरावांना ज्या अडचणी आल्या किंवा आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली की त्यांना कसे तोंड द्यावयाचे? त्यांच्यावर कशी मात करावयाची किंवा त्यांना कसे टाळावयाचे याचा ते शोध घेत. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत महाराष्ट्रात शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीत एक प्रकारची कोंडी झाली होती. ती फोडण्यासाठी कोणते धाडस करावयाचे? परिस्थितीस कसे वळण द्यावयाचे वा तिचा कसा उपयोग करावयाचा? यासाठी जाणकारांची आवश्यकता होती. भाऊरावांजवळ ती जाण व कौशल्य होते. भाऊराव म्हणत, "माझ्याकडे रयत शिक्षण संस्थेच्या वाढीचा निश्चित आराखडा नव्हता. अंधारात हातात बॅटरी घेऊन चालणाऱ्याप्रमाणे माझे काम होते. बॅटरीच्या प्रकाशात दिसेल तेवढा मार्ग आक्रमावयाचा. वाटेतील खड्डे, अडथळे टाळावयाचे, पुन्हा बॅटरीचा प्रकाश टाकावयाचा व पुढचा दिसणारा मार्ग तुडवावयाचा, वाटेत येणारे विषारी सर्प व प्राणी टाळावयाचे!" भाऊरावांचे हे वागणे सुरवातीच्या अमेरिकन वसाहतवाल्यासारखे होते. जंगल तोडत, वसाहत करीत, जमीन पादाक्रांत करावयाची. अशा अमेरिकनांच्या या वृत्तीस इंग्रजीत प्रॅग्मॅटिझम हा शब्द प्रथम वापरण्यात आला. मराठीत प्रागतिक व्यवहारवाद किंवा प्रायोगिक पद्धती म्हटले आहे. शैक्षणिक क्षेत्रातील अज्ञानाचे जंगल, प्रायोगिक पद्धतीने साफ करण्याचे काम भाऊरावांना करावयाचे होते. अमेरिकन शिक्षणशास्त्रज्ञ डॉ. जॉन ड्युई यांनी शिक्षणक्षेत्रातील कूटप्रश्न प्रयोगाद्वारे सोडविण्याच्या प्रायोगिक पद्धतीस वा प्रागतिक प्रायोगिक शिक्षणपद्धतीस प्रॅग्मॅटिझम हे नाव दिले. भाऊरावांनीही प्रयोगाद्वारे आपले शैक्षणिक तत्त्वज्ञान सांगितले आहे. त्यास आपण भारतीय प्रॅग्मॅटिझम हे नाव देणेच योग्य ठरेल. डॉ. जॉन ड्युईनी प्रथम प्रश्न अंदाजून त्यास प्रयोगाद्वारे उत्तरे शोधली. भाऊरावांपुढे प्रथम प्रश्नच उभे राहिले व त्यास उत्तरे कष्टसाध्य प्रयोगातून आपोआप मिळत गेली. असा फरक डॉ. जॉन ड्युई व भाऊरावांच्या प्रायोगिक शिक्षण पद्धतीत आहे. मात्र भारतातील

निरक्षरांस साक्षर करण्याचा व त्यावर माध्यमिक व उच्च शिक्षणाचा इमला उभारण्याचा अवाढव्य प्रश्न भाऊरावापुढे होता. डॉ. जॉन ड्युईपुढे मूळात साक्षर असलेल्या जनतेच्या उच्चतर शिक्षणात सुधारणा करण्याचा प्रश्न होता. हा मूलभूत फरक दोघांत होता. भाऊरावांनी भारतीय शिक्षणसंस्थांच्या पुढे या प्रागतिक प्रायोगिक शिक्षणपद्धतीचा एक वेगळाच आकृतिबंध आपल्या प्रयोगातून व त्यासोबतच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानातून अनुकरणासाठी ठेवला.

■

प्रकरण अकरावे

# रयत शिक्षण संस्थेची अर्थव्यवस्था

१) रयत शिक्षण संस्थेच्या कार्याने प्रभावित झालेल्या कोणाही जिज्ञासूला पहिला प्रश्न पडतो की संस्था आपल्या वैविध्यपूर्व कार्यासाठी पैसा कसा उभा करते ?

सुरवातीस भाऊरावांनी हितचिंतकांच्या देणग्या व उभय पतिपत्नीच्या आर्थिक त्यागावर भर दिलेला दिसून येतो. सत्यशोधक समाजाचा प्रचारक म्हणून हिंडताना त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला. सन १९१९ व १९२१ साली काले व नेर्ले या ठिकाणी पहिली वसतिगृहे रयत शिक्षण संस्थेमार्फत सुरू करताना ग्रामीण जनतेचा भाऊरावांच्या नि:स्वार्थी व निरिच्छ वृत्तीवर पूर्ण विश्वास होता. लोकांनी वसतिगृहे चालविण्यास धान्य, इमारत व पैसेरूपाने मदत केली. साताऱ्यास सन १९२४ साली छत्रपती शाहू वसतिगृह चालविताना मात्र भाऊरावांना मोठ्या प्रमाणावर पदरमोड करावी लागली. स्वत:च्या प्राप्तीपैकी किर्लोस्कर कंपनीचे सहभाग, विम्यातून मिळालेली रक्कम, पत्नीच्या - सौ. लक्ष्मीबाई पाटलांच्या - अंगावरील मंगळसूत्रासह दागिने यांचा त्यात समावेश होता. या त्यागात त्यांच्या निरिच्छपणाने परिसीमा गाठल्याचे दिसून येते.

२) आर्थिक दृष्टीने भाऊरावांची परिस्थिती मोठ्या सुबत्तेची होती अशातला भाग नाही. परंतु त्यांच्या संन्यस्त निरिच्छपणामुळे त्यांच्या सान्निध्यात आलेला श्रीमंत असो किंवा गरीब असो, तात्काळ त्यांच्या

त्यागीवृत्तीने भारावून जाई व वसतिगृहासाठी लहानमोठे आर्थिक साहाय्य करीत असे. याची प्रमुख उदाहरणे म्हणजे बडोद्याचे सयाजीराव महाराज, फलटणचे राजे मालोजीराव नाईक निंबाळकर व कोल्हापूरचे छत्रपती शहाजी महाराज आणि ग्वाल्हेरचे महाराज जिवाजीराव शिंदे. या उलट नेर्ल्याच्या लंगोटीबहाद्दर शेतकऱ्याने आपल्या फाटक्या मुंडाशात बांधलेले चार आणे भाऊरावांना दिले. ग्रँटबंदीच्या काळात पायली-अधोलीने शेतकऱ्यांनी धान्य दिले. सारांश, लोकसंग्रहातून जनतेचा फार मोठा आधार रयत शिक्षण संस्था चालविण्यास भाऊरावांना त्यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत मिळत राहिला. हे कसे घडले? तर भाऊराव दाखवून देत की, गरीब व हुशार मुलांच्या शिक्षणात गुंतविलेले हे जनतेचे भांडवल आहे.

३) संस्थेच्या अर्थव्यवस्थेस त्रिकोणाची संज्ञा देता येते. श्री. भाऊरावांचा वैयक्तिक त्याग हा पाया आहे. वरील आर्थिक त्रिकोणाची जनसहाय्य ही एक भक्कम बाजू आहे. दुसरी बाजू आहे संस्थेच्या आजीव सेवकांनी, शिक्षकांनी व मुलांनी स्वावलंबन व आत्मनिर्भरतेच्या तत्त्वानुसार केलेला त्याग. शिक्षकांनी कमी पगारावर कामे करून संस्थेच्या अर्थव्यवस्थेत मोलाची भर घातली, तर विद्यार्थ्यांनी स्वावलंबन व स्वकष्टातून वसतिगृहाचा खर्च कमीतकमी ठेवण्यासाठी अंतर्गत काटकसर अवलंबिली होती. या भक्कम पायाभूत त्रिकोणावर इमारत उभी करण्याचे काम शासनाकडून वेळोवेळी मिळालेल्या अनुदानातून झाले आहे.

४) यापूर्वी सांगितल्याप्रमाणे शिक्षणातून ग्रामीण नेतृत्व तयार करण्यासाठी भाऊराव स्वत:चा व जनतेचा पैसा वसतिगृहातील मुलांवर खर्च करीत. सन १९३७ साली रयत शिक्षण संस्था चालविण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांतून काही आजीव सेवक तयार केले. म्हणजे मानवी साधनसंपत्ती निर्मिण्यात पैसे गुंतविण्याची कल्पना शास्त्रीय किंवा आर्थिक परिभाषेत त्यांनी अक्षरबद्ध केली नव्हती तरी कृतीतून प्रकट झालेली दिसते. त्यांचे विचार अल्फ्रेड मार्शल या अर्थशास्त्रज्ञासमान आहेत. शिक्षणावरचा खर्च म्हणजे संधीची किंमत होय (opportunity cost), असे ते मानत.

५) मानवी साधनसंपत्तीच्या निर्मितीसाठी गुंतवणूक ही कल्पना

अगदी अलीकडे (१९६०) शिक्षणाचे अर्थशास्त्र या नवीन अर्थशास्त्राच्या शाखेत प्राध्यापकद्वय टी. डब्ल्यू. शुल्झ व जे. के. गालब्रेथ यांनी विकसित करून शब्दबद्ध केली. परंतु ती २०० वर्षांपूर्वीच प्रा. ॲडॅम स्मिथने सांगून ठेवलेली होती. भाऊराव अर्थशास्त्रज्ञ नव्हते, त्यांनी अंमलात आणलेला व्यवहार अर्थशास्त्रीय भाषेत त्यांनी मांडलेला नाही एवढेच. भारताच्या मध्यवर्ती शासनाने सुद्धा गेल्या काही वर्षांपासूनच 'ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट मंत्रालय' सुरू केलेले आहे. म्हणजे जुन्या व्यवहारास हे नवीन नाव देण्यात आलेले आहे.

६) सन १९११ ते १९३५ या कालावधीनंतर मानवी साधनसंपत्तीत गुंतवणूक हा विचार संस्थेच्या ध्येयधोरणाच्या स्वरूपात पक्का झाला. शिक्षण हेच एक असे क्षेत्र होते की यातून निर्माण झालेली मानवी साधनसंपत्तीची पुनर्गुंतवणूक याच क्षेत्रात संस्थेने मोठ्या प्रमाणात केली. संस्थेच्या पहिल्या घटनेत ध्येयामध्ये तरुण पिढीस शिक्षण देण्यासाठी शिक्षक तयार करणे व ग्रामोद्धारासाठी, उद्योगधंद्यासाठी ग्रामसेवक तयार करणे हे दुसऱ्या व तिसऱ्या कलमात आहे. आपणांस असे दिसून येते, की सातारच्या ट्रेनिंग कॉलेजमधून तयार झालेले प्राथमिक शिक्षक संस्थेच्या स्वयंसेवी शाळात मुरले, ते आणि संस्थेच्या माध्यमिक शाळेतील व महाविद्यालयातील मुले शिक्षकी पेशाची टी. डी. किंवा बी. एड. पदवी घेऊन तयार झालेले शिक्षक म्हणजे हे मानवी भांडवल पुन्हा शिक्षणक्षेत्रात, संस्थेच्या शाळांत पुनर्गुंतवणूक म्हणून सामील झाले आणि भाऊरावांचा रयत शिक्षण संस्थारूपी सेवाभावी शैक्षणिक 'उद्योग समूह' उभा राहत गेला.

७) सुरुवातीच्या काळात, आपल्या मुलांच्या शिक्षणावर भांडवल म्हणून पैसा खर्च करणे, सामान्य अडाणी निरक्षर जनतेस पटविणे भाऊरावांना फारच अवघड जात असे. त्यासाठी औद्योगिक माध्यमांचा किर्लोस्करवाडी व सातारा रोड येथे प्रयोग केला. तो अयशस्वी झाल्याने भाऊराव व त्यांच्या पत्नीने वैयक्तिक त्यागातून ही गुंतवणूक समाजाच्या हितासाठी केली ती वसतिगृहात. हा मानवी साधनसामग्रीत गुंतवणुकीतील

पहिला टप्पा होता. दुसरा टप्पा माध्यमिक शाळांच्या व कॉलेजच्या स्थापनेपासून सुरू होऊन सन १९५४ सालात संपतो. व तिसरा टप्पा बी. एड. कॉलेजच्या स्थापनेपासून सुरू होतो. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, समाजातील उच्चवर्णीयांकडून अवहेलना झाली तरी भाऊरावांवरील सामान्य जनतेचा विश्वास व पाठिंबा वाढत गेला. सन १९४८ ते १९५४ ही वर्षे सोडल्यास महाराष्ट्र शासनही भाऊरावांच्या कार्यास आर्थिक पाठबळ देत राहिले.

८) १९३५-३८ च्या अहवालात (पृ. १४) रयत शिक्षण संस्थेस 'प्लँट' म्हटले आहे. भाऊराव हे अर्थतज्ज्ञ किंवा योजनातज्ज्ञही नव्हते. मात्र समाजाच्या उणीवा व दु:खे यांचे त्यांना अचूक निदान करता येत असे. भारतातच शैक्षणिक पुनर्रचना किंवा नियोजन ही कल्पना पहिल्या पंचवार्षिक योजनेनंतर आली. तेव्हा भविष्यकालीन वाढीचे रयत शिक्षण संस्थेचे नियोजन व त्यासाठी आर्थिक तरतूद भाऊरावांना सुचली नसल्यास काही आश्चर्य नाही. ही बाब शासनाने शैक्षणिक योजनेतून खाजगीसंस्थांना आर्थिक मदत देण्यास सुरुवात केल्यानंतरच संस्थेत आली. मात्र अंदाजपत्रक व काटकसर यांची अम्मलबजावणी सन १९२४ सालापासूनच वसतिगृहात होती. आजीव सभासद मंडळ १९४८ मध्ये स्थापन झाल्यानंतर त्यास व्यवस्थित स्वरूप आले.

९) १९८३-८४ या वर्षीच्या अहवालावरून असे दिसते की रयत शिक्षण संस्थेवर वरील तिन्ही किंवा चारही स्रोतातून खर्च झालेली रक्कम रु. २६ कोटी ६१ लक्ष ९० हजार ९२३ इतकी होती. पैकी इमारतीवर रु. ७ कोटी ५९ लक्ष ३५ हजार ३१६, शैक्षणिक साहित्यावर रु. २ कोटी २३ लक्ष ३३ हजार ५०५ व शिक्षकांच्या वेतनावर रु. १६ कोटी ७९ लक्ष २२ हजार १०२ खर्च झाले. सन १९२४ सालापासूनची रक्कम यापेक्षाही बरीच मोठी होती.

१०) 'शिक्षणाचे अर्थशास्त्र' या शाखेनुसार शैक्षणिक संस्थांना उद्योग संबोधण्यात आले आहे. त्यात सजीव, निर्जीव साधनसंपत्तीचा उपयोग होतो. रयत शिक्षण संस्थेने उभे केलेल्या इमारती, शास्त्रीय

साहित्य, फर्निचर ही निर्जीव साधन- संपत्ती आहे. त्यात संस्थेच्या सन १९८४-८५ च्या ४८१ शाखांतील यावरील साहित्याचा समावेश होतो; तर या शाखांमधून शिकविणारे, शिकणारे व इतर व्यक्तींचा सजीव साधनसंपत्तीत समावेश होतो. इमारती इत्यादींची निर्मिती विक्रीयोग्य उत्पन्नात समाविष्ट होऊ शकते. मात्र या संस्थेतून बाहेर पडलेले विद्यार्थी, पदवीधर इत्यादींनी मिळविलेले ज्ञान, कौशल्य किंवा शिक्षकांनी नवीन ज्ञानात टाकलेली भर, वस्तुनिष्ठपणे मोजता येत नाही. मात्र वर सांगितलेली रक्कम गुंतवून भाऊरावांच्या संस्थेने सन १९८४ -८५ सालात २ लक्ष ३३ हजार १७२ मुलांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. यासाठी ११ हजार २४९ इतर मनुष्यबळ शिक्षक व त्यांचे सहाय्यक रूपाने वापरले. म्हणजे २ लक्ष ३३ हजार १७२ संख्येइतकी मानवी साधनसंपत्ती निर्माण करण्याचा व इतर व्यवसायांसाठी दरसाल उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला.

११) हीच मानवी साधनसंपत्ती निर्माण करण्यास शासनास कित्येक पटीने खर्च करावा लागला असता. एक उदाहरणार्थ देतो. रयत शिक्षण संस्थेने सन १९३८-३९ ते १९५६-५७ या सालांत प्राथमिक स्वयंसेवी शाळा चालविण्यास शासनाच्या अनुदानासह ५७८ शाळांवर रु. ३७ लक्ष ५८ हजार २३६ खर्च केले. शासनानेच या शाळा चालविल्या असत्या तर रु. ६४ लक्ष ९६ हजार ६९० खर्च आला असता. अर्थात हे प्राथमिक शिक्षकांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केलेल्या स्वार्थत्यागामुळे घडले व शासनाचे म्हणजे राष्ट्राचे रु. २७ लक्ष ३८ हजार ४५४ वाचले. हे तत्त्व इतर शाखांच्या बाबतीतही लागू पडते. मानवी साधनसंपत्ती निर्माण करण्यामध्ये रयत शिक्षण संस्थेने अंतर्गत काटकसरीचे धोरण ठेवल्याने हे घडले. वाचविलेला पैसा मिळविलेल्या पैशाइतकाच महत्त्वाचा असतो. इतकेच नव्हे, तर माध्यमिक शाळा व महाविद्यालयांच्या इमारती बांधताना संस्थेच्या शिक्षकांनी, मुलांच्या मदतीने इमारतीवरील शारीरिक श्रमाच्या रूपाने इमारतीचा खर्च एकचतुर्थांश रकमेने कमी केला. उदा. साताऱ्याच्या शिवाजी महाविद्यालयाच्या शास्त्र शाखेची एक इमारत

बजेटप्रमाणे रु. ४५ हजार खर्चून बांधावी लागली असती. मुलांनी श्रमदान केल्याने रु. १५ हजार वाचले व इमारत रु. ३० हजारांत पुरी केली.

१२.) सन १९५९-६० सालात म्हणजे भाऊरावांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्र शासनाने आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या मुलांना फीमाफीची सवलत जाहीर केली. तसेच याच सुमारास विद्यापीठ अनुदान मंडळाकडून महाविद्यालयांना इमारती, शास्त्रीय साहित्य व शिक्षकांच्या पगारासाठी ८०% अनुदाने मिळू लागल्याने, शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनीही त्याग करण्याच्या युगाचा अंत झाला. त्याबरोबर शिक्षणक्षेत्रातील मानवतावादी दृष्टिकोनाचा ऱ्हासही झाला. सारांश, भाऊरावांच्या मृत्यूनंतर स्वावलंबन व आत्मनिर्भरतेच्या तत्त्वास तिलांजली मिळाली. याचा दृश्य परिणाम म्हणजे सर्व काही शासनाने करावे ही दृष्टी जनतेत आली. जनतेच्या ठिकाणची दातृत्वाची भावना लोपली. १००% अनुदानाच्या सवलतीचा महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रात गैरवापर होऊ लागला. शिक्षणदान त्यागाचे न राहता भोगाचे क्षेत्र बनत गेले.

■

प्रकरण बारावे

## भाऊरावांच्या कर्तृत्वाचा सन्मान

१) महाराष्ट्रामध्ये सामाजिक सुधारकांचे दोन प्रवाह स्पष्ट दिसून येतात असे डॉ. धनंजयराव गाडगीळांनी कर्मवीर भाऊराव पाटलांच्या डॉ. मॅथ्यूकृत इंग्रजी चरित्राच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. पहिल्या प्रवाहाचे अध्वर्यू होते न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे. त्यांचे व प्राचार्य गोपाळ गणेश आगरकरांचे सामाजिक सुधारणेचे कार्य शहरी उच्चवर्णीयांत होते व ते वैचारिक स्तरावर होते. मात्र या प्रवाहातले कर्ते पुरुष होते भारतरत्न डॉ. धोंडो केशव कर्वे. त्यांच्या कार्याचा कळस म्हणजे हिंगणे स्त्री शिक्षण संस्था व नाथीबाई ठाकरसी विद्यापीठ हे होय.

२) या प्रवाहाशी समांतर असा प्रवाह होता ग्रामीण समाजातील सुधारकांचा. त्यांच्या अग्रभागी होते महात्मा जोतीबा फुले. मात्र दुसऱ्या प्रवाहात होते अनेक कर्ते समाजसुधारक. त्यात महात्मा फुले व राजर्षी शाहू यांच्या सामाजिक सुधारणांना प्रादेशिक मर्यादा पडत होत्या. फुल्यांचे कार्य त्यांच्या हयातीत पुणे जिल्हा, मुंबई व नगर जिल्ह्याचा काही भाग यात पसरले. शाहू महाराजांना संस्थानाच्या मर्यादा पडत होत्या, पुढे मात्र या मर्यादेच्या पलीकडे जाण्याचे धाडस त्यांनी केले, पण त्यांना दीर्घायुष्य न लाभल्याने त्यांचे कार्य काही काळ खंडित झाले, मात्र मृत्यूपूर्वी दोन वर्षे त्यांनी अस्पृश्यांच्या व दलितांच्या सामाजिक सुधारणाची पताका सन १९२० साली माणगावच्या परिषदेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खांद्यावर दिली. इतर मध्यमवर्गीयांच्या, शेतकऱ्यांच्या

बाबतीत हेच काम सत्यशोधकाच्या माध्यमातून सर्वश्री लठ्ठे, डोंगरे, भास्करराव जाधव यांच्यावर सोपविली. या सत्यशोधक समाजातील एक पायिक म्हणून भाऊरावांनी सामाजिक सुधारणेची पताका खांद्यावर घेतली. पण जेव्हा हा समाज ब्राह्मणेतर पक्ष म्हणून राजकारणात सन १९२० साली उतरला; तत्पूर्वी एक वर्ष भाऊरावांनी ओळखले, की राजकारण हे आपले क्षेत्र नव्हे आणि सामाजिक क्षेत्र हे आपले खरे क्षेत्र आहे व त्यातल्या त्यात शिक्षण हे त्याच्या मर्मस्थानी आहे. भाऊरावांनी शिक्षण हे सामाजिक सुधारणाचे माध्यम डॉ. धोंडो केशव कर्वे यांच्याप्रमाणे स्वीकारले व रयत शिक्षण संस्थेचा व पहिल्या वसतिगृहाचा जन्म काले गावी ४-१०-१९१९ रोजी झाला.

३) सन १९२२ साली मुंबई प्रांतातील शिक्षण खाते लोकनियुक्त मंत्री नामदार डॉ. रघुनाथराव परांजपे यांच्याकडे आले. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे

व सार्वत्रिक करण्याचा कायदा १९२३ साली केला. भाऊरावांनी हा कायदा पास होण्यासाठी डॉ. परांजप्यांच्या पाठीशी लोकमत आपल्या प्रचारसभातून उभे केले; तर महात्मा गांधींच्या ग्रामीण उद्योगधंद्याच्या संघटनेकडे भाऊराव सन १९२४ सालापासून आकर्षित झाले. ग्रामीण शिक्षण व ग्रामोद्धार याकडे भाऊरावांनी आपले लक्ष केंद्रित केले. सन १९३२ साली पुण्यास सांगलीच्या राजेसाहेबांच्या अध्यक्षतेखाली दुसरी ग्रामोद्धार परिषद भरली. या परिषदेत भाऊरावांनी भाषण करून तिसरी परिषद सातारा जिल्ह्यात किर्लोस्करवाडी येथे घेण्याचे रा. ब. रा. रा. काळ्यांच्या संमतीने जाहीर केले, व सन १९३३ साली किर्लोस्करवाडीस ही परिषद भरली. या परिषदेची धुरा भाऊरावांनी स्वीकारली होती. फलटणचे राजेसाहेब अध्यक्ष व औंधचे राजेसाहेब स्वागताध्यक्ष होते. या परिषदेत भाऊरावांच्या शैक्षणिक व ग्रामोद्धाराच्या कार्याची मुक्तकंठाने स्तुती करण्यात आली व त्यांचे ग्रामीण जनतेवरील वजनही ओळखण्यात आले. (रयत शिक्षण संस्थेचा अहवाल; १९३५-१९३८, पृ. ४)

४) रयत शिक्षण संस्थेच्या वरील पहिल्या अहवालात ऑ. सेक्रेटरी

ॲड. बारटक्के यांनी भाऊरावांचे वर्णन केले आहे : "A man of no university qualification, but of strong common sense, of no money but of good physic and sound mind; undaunted courage and untining energy, uninterrupted perseverance and efforts, Mr. Bhaurao Patil, a giant and all round worker, a villager himself, resolved to sacrifice his
life and to devote it to the uplift of his brother villagers".

अशा या ग्रामोद्धाराच्या चळवळीत त्यावेळच्या श्री. हमीद ए. अली (आय. सी. एस.) या जिल्हाधिकाऱ्यांनी भाऊरावांचा फारच चाणाक्षपणे उपयोग करून घेतला. (नोव्हें. १९३३ ते ऑक्टोबर १९३६) या ग्रामोद्धाराच्या कामासाठी भाऊरावांना ते जिल्हाभर व्याख्यानासाठी नेत. हमीद ए. अली जिल्ह्याच्या ग्रामोद्धार समितीचे अध्यक्ष व भाऊराव सभासद होते.

५) सारांश, कर्ते समाजसुधारक म्हणून भाऊरावांनी कामास सुरुवात केली ती सन १९१० सालच्या दुधगावच्या विद्यार्थी आश्रमापासून. या ग्रामोद्धाराच्या चळवळीकडे वळण्यापूर्वी भाऊराव सत्यशोधक समाजिस्ट म्हणून १९११ पासून जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेरही जलशाबरोबर व्याख्यान देत हिंडत असत व ठिकठिकाणी भरणाऱ्या सत्यशोधक समाज परिषदांना कार्यकर्ता म्हणून हजर राहत. या सत्यशोधक परिषदा एका अर्थाने सामाजिक परिषदाच होत्या. त्यांचे प्रमुख कार्य शिक्षण, सामाजिक सुधारणा व पुरोहितांच्या धार्मिक वर्चस्वास विरोध असा होता. पुढे सन १९२० साली ब्राह्मणेतर पक्ष राजकारणात शिरण्यासाठी स्थापन झाल्यावर मुंबई कौन्सिलात जातवार जागा मागण्यास मराठा समाजापासून सुरवात झाली. जातवार परिषदांना ऊत आला आणि सामाजिक सुधारणा व राष्ट्रीय एकता या विचारास खो बसत चालला होता. महात्मा गांधींचे समाजकारण, स्वदेशीचा पुरस्कार, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा, अस्पृश्यता निवारण यासाठी होते. तेव्हा सन १९२१ साली किर्लोस्कराकडील नोकरीचा राजीनामा देताना सत्यशोधक

समाजाच्या तत्त्वांपैकी शिक्षणच प्रथम भाऊरावांनी हाती घेतले व त्यासाठी डॉ. परांजपे,
श्री. रावबहादूर काळे यांच्यासारख्या प्रागतिकांची शिक्षणाच्या कामी भाऊरावांनी
मदत घेतली व त्यास ग्रामोद्धार चळवळीची जोड दिली.

६) महात्मा गांधींच्या ग्रामसुधार चळवळीत खेड्यातील उद्योगधंद्यांच्या सहकारी संस्था व त्यांचेमार्फत उत्पादनाची विक्री, शेतीची आधुनिक पद्धतीने मशागत व सुधारणा, उत्तम बेण्याचा वापर यावर व त्यासाठी शिक्षणावर भर देण्यात आला होता. भाऊरावांनी किर्लोस्कराकडील नांगराचा प्रसार करताना या बाबीवरच आपल्या सत्यशोधकी व्याख्यानातून भर दिलेला असे. परंतु शिक्षणाच्या बाबतीत खेड्यांतील शिक्षकच मार्गदर्शक असल्याने भाऊरावांनी मागासवर्गीय शिक्षकांच्या संघटनांशी संबंध जोडले व सन १९२२ साली अंगापूरच्या प्राथमिक शिक्षकांच्या अधिवेशनात त्यांच्यासाठी ट्रेनिंग कॉलेज काढण्याची घोषणा केली. व तत्पूर्वी सन १९१९ व १९२१ साली काले व नेर्ले येथे सर्व जाती-जमातीच्या मुलांसाठी वसतिगृहे सुरू केली. तिसरे वसतिगृह साताऱ्यात १९२४ साली सुरू केले. ही वसतिगृहेच भाऊरावांच्या समाजसुधारणाची केंद्रे होती, ती अशी :

७) या वसतिगृहात सर्व धर्मांच्या, जातींच्या व अस्पृश्यांच्या मुलांना प्रवेश असल्याने सामाजिक दृष्टीने अस्पृश्यता निवारणाचे मोठे काम झाले. आपण कितीही घसा कोरडा करून, मोठ्या आवाजात म्हटले की आम्ही भारतवासीय सांस्कृतिक दृष्ट्या एक आहोत; पण ते सांगण्यापुरते झाले आणि ते उच्चवर्णीय पुढारलेल्या लोकांपुरते झाले. फार तर शहरवासीयापुरते झाले. खेड्यात आजही काय दृश्य आहे ! महार, मांग, चांभार, ढोर यांची वसाहत वेशीबाहेर, घाणीने भरलेल्या परिसरात असते. त्यांचा पाणवठा वेगळा असतो. त्यांचे व्यवसाय अस्वच्छतेत बुडालेले असतात. आरोग्य व सामाजिक सुधारणेस शिक्षण हा महत्त्वाचा घटक असतो. म्हणून भाऊरावांनी समाजसुधारणासाठी वसतिगृहेच भावी

भरारीची केंद्रे बनविली. या वसतिगृहात अठरापगड जातींच्या मुलांना एका घरातील मुलाप्रमाणे एकत्र राहणे, एकत्र स्वयंपाक स्वहस्ते करणे व एकत्र एका पंगतीत जेवणे अनिवार्य केले. जे ग्रामोद्धार समितीच्या खेडोपाडी घेतलेल्या व्याख्यानातून सांगितले ते या वसतिगृहातून मुलांकरवी आचरणात आणविले.

८) प्रत्येक खेड्यात शाळा हवी. परंतु गावकऱ्यांनी शाळा सुरू केली तर चालविण्यालायक शिक्षक पाहिजे म्हणून प्रथम भाऊरावांनी सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग स्कूल सुरू केले. या ट्रेनिंग स्कूलमध्ये सुतारकाम, लोहारकाम व शेती शिक्षणावर भर दिला. अस्पृश्यता निवारणाचे हे शिक्षक अग्रदूत बनावेत म्हणून त्यांचे जेवणखाण व राहणे शाहू बोर्डिंग हाऊसमधील इतर मुलांसमवेत होते. अत्यल्प खर्चात एकत्र राहण्याची व जेवणाची त्यांची सोय करण्यात आली होती. महात्मा गांधींनी छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसचे नामकरण करताना अस्पृश्यता निवारणाचे काम व स्पृश्य-अस्पृश्य मुले एकत्र बंधुभावाने राहत असल्याने पाहून भाऊरावांची पाठ थोपटली होती व म्हणाले होते की, "भाऊराव, मला जे साबरमती आश्रमात करता आले नाही ते तुम्ही केले." हे जगजाहीर आहे की साबरमती आश्रमात दुदाभाई, त्यांची पत्नी सौ. दानीबेन व मुलगी लक्ष्मी यांना घेण्यास स्पृश्य गुजराती समाजाने महात्मा गांधींना प्रतिबंध केला होता. भाऊरावांचे हे वसतिगृह स्पृश्य सनातन्यांना 'सबगोलंकारी' वाटे. त्यामुळे साताऱ्यात सार्वजनिक हौदावर वसतिगृहातील मुलांना पाणी भरण्यास व आंघोळीस मज्जाव होई; मग मुले बंड करून उठत, या हौदावर पाणी भरीत, आंघोळी करीत. भाऊरावांच्या सामाजिक सुधारणेच्या मर्मस्थानी अस्पृश्यता निवारण हे पहिल्या प्रतीचे काम होते. सन १९५३ मध्ये पुण्यास न्यायमूर्ती डॉ. प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिली महाराष्ट्र सामाजिक परिषद झाली. भाऊराव तिच्या प्रवर्तकापैकी एक असल्याने अस्पृश्यता व जातीभेद मानणार नाही अशी एक शपथ सभासदांना घ्यावी लागे. या शपथेवर भाऊरावांचा आग्रह असे. या अस्पृश्यता निवारणाच्या कामामुळेच दिल्लीच्या हरिजन सेवक संघाने सन १९३३-३६ या चार

सालांत शाहू बोर्डिंग हाऊसला दरसाल रु. ५०० मदत दिली.

९) भाऊरावांनी खेड्यांतील लोकशिक्षण, ग्रामोद्धार, अस्पृश्यतानिवारण आणि प्राथमिक स्वयंसेवी शाळांची सांगड आपल्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये तयार झालेल्या प्राथमिक शिक्षकांमार्फत घालून सामाजिक सुधारणेचा पाया ग्रामीण भागात घातला. त्यांचे हे काम तळागाळातून सुरू झाल्याने (ग्रासरूट लेव्हल) जनतेने त्यांचे नेतृत्व निस्संकोचपणे स्वीकारले व भाऊरावांचे लोकसंग्रहाचे व लोकसाहाय्याचे काम सुकर झाले व त्यांचे समाजसुधारणेचे काम महाराष्ट्रात सुदूर अनेक जिल्ह्यांत पसरले.

१०) आपल्या संस्थेसाठी मदत गोळा करताना आजचे अनेक संस्थाचालक जसे पालकांना वेठीस धरून प्रवेश देताना जबरदस्तीची देणगी गोळा करतात, तसे भाऊराव कधीही करीत नसत. पायास भिंगरी बांधल्याप्रमाणे ते सतत हिंडत असत. ग्रामीण भागातील त्यांचे स्नेहीसोबती, संस्थेचे चाहते, हितचिंतक आपण होऊन, पैसे व धान्यरूपाने त्यांना मदत देत. भाऊराव म्हणत, "शेतकऱ्यांनी माणशी एक रुपयाप्रमाणे मदत द्यावी. एकाद्या धनिकाने हजार रुपये देण्यापेक्षा ते अधिक मोलाचे आहे. कारण माझी संस्था त्यामुळे हजार शेतकऱ्यांच्या अंतःकरणात स्थान मिळवील."

११) डी. ई. सोसायटीच्या शिक्षकांचा आदर्श संस्थेच्या आजीव सेवकांपुढे असल्याने शिक्षक स्वेच्छेने त्याग करीत. आज शिक्षकांना अनेक मोठ्या वेतनश्रेणीप्रमाणे शासनाकडून १००% पगार मिळतो व ज्या संस्थेमुळे आपले अस्तित्व आहे, तिच्यासाठी किरकोळ त्याग करावयास ते तयार होत नाहीत. अर्थात त्यास कारणही आहे. आजच्या अनेक संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थांना संस्थान बनविले आहे. सर्व सत्ता त्यांच्या हातात एकवटली आहे. शिक्षक केवळ वेतनाचे अधिकारी नोकर झालेत. त्यांना संस्थेच्या कारभारात काडीचाही अधिकार नाही. मजूर व मालक असे शिक्षकांचे व संस्थाचालकांचे संबंध निर्माण झाले आहेत. 'जनसेवा ही ईश्वरसेवा' हा भाऊरावांचा आदर्श असल्याने ते संस्थापक असले तरी

त्यांचे विद्यार्थी व शिक्षक तोच आदर्श स्वतः पुढे ठेवून संस्थेचा कारभार चालवीत. 'संस्था माझी आहे, मी तिच्यासाठी आहे,' (सेन्स ऑफ बिलाँगिक) ही भावनाच शिक्षकांत आज नष्ट झाली आहे. कारण उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे स्वार्थत्यागी संस्थापकही आज नाहीत. जे आहेत त्यांचा लोकसंग्रहही थिटा आहे, आणि संस्था स्थापणे म्हणजे स्वतःचे व स्वतःच्या गोतावळ्यांचे चरण्याचे कुरण तयार करणे व समाजसेवा म्हणजे स्वतःच्या सग्या-सोयऱ्यांची सेवा असे शिक्षण क्षेत्रास स्वरूप आले. त्यास प्रमुख कारण स्वार्थी, राजकीय अनुयायांच्या हाती त्या संस्था सत्तास्थानी असलेल्या राजकीय नेत्यांच्या चुकीच्या धोरणामुळे व कृपाप्रसादाने आल्या. हे घडले व घडत आहे. स्वातंत्र्य चळवळीतून राज्यशकटाची धुरा वाहण्यास आलेले पहिले नेते राजकारणी असले तरी प्रथम ते समाजसेवकच होते. आज तशी स्थिती नाही. राजकीय सत्ता समाजसेवेसाठी, राष्ट्रोद्धारासाठी राबविण्यापेक्षा स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी राबविण्याकडे आजचे नेते तयार आहेत. म्हणून शिक्षण क्षेत्र हे इतर क्षेत्राप्रमाणे भ्रष्टाचाराने पोखरले आहे. सेवाभावी शिक्षक तयार केले ही भाऊरावांची सर्वात मोठी समाजसेवा आहे हे मान्य करावे लागते. या पार्श्वभूमीवर भाऊरावांचे समाजसेवकांतील स्थान जोखल्यास ते उत्तुंग व अद्वितीय असल्याचे जाणवते. भाऊरावांनी आपल्या शिक्षणसंस्थेतून समाजसेवेच्या अनेक अंगोपांगांनाही स्थान दिले होते, ते असे.

१२) भाऊराव स्वतः शेतकरी असल्याने शेतकऱ्यांच्या हिताच्या गोष्टीकडे लक्ष देत. १८ ऑगस्ट १९२९ रोजी पुण्यात जेधे मॅन्शनमध्ये मुंबई इलाखा शेतकरी संघाची स्थापना सातारच्या आर. जी. राणे वकिलांच्या अध्यक्षतेखाली झाली. भाऊराव तिचे सभासद होते. त्यांनी ठराव मांडला की सन १९२० नंतर ज्या ज्या तालुक्यांत सारावाढ झाली असेल तेथे फेरचौकशी होण्यासाठी चळवळ उभी करावी व तो ठराव पास झाला. या सभेत शेतकऱ्यांच्या को-ऑपरेटिव्ह सोसायट्या असाव्यात असे ठरले होते. भाऊरावांनी यापूर्वीच १९२० सालच्या नोव्हेंबर महिन्यांत इस्लामपूरला सहकारी पेढ्यांची परिषद भरविली होती व तिच्यापुढे प्रा. वा.

गो. काळे यांचे 'सहकारिता व मागासलेले वर्ग' या विषयावर व्याख्यान करविले होते. (रा. अ. कडियाळकृत ना. भा. वि. जाधव यांचे चरित्र व कार्य, पृ. १५१-१७६). रयत शिक्षण संस्था स्थापन केल्यानंतर सन १९४० साली शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या अडचणीच्या वेळी उपयोगी पडावी म्हणून रयत सेवक को-ऑप. क्रेडिट सोसायटी स्थापन केली. तिचे आज विशाल सहकारी बँकेत रूपांतर झाले आहे.

सन १९१५ साली किर्लोस्करवाडीस काम करीत असताना तेथील कामगारांना पहिल्या महायुद्धामुळे जीवनावश्यक वस्तू मिळणे अवघड झाल्याने भाऊरावांनी त्यांच्यासाठी सहकारी स्टोअर्स सुरू केले होते. त्याच धर्तीवर दुसऱ्या महायुद्धकाळी वसतिगृहाच्या मुलांना व संस्थेच्या सेवकांना जीवनावश्यक वस्तू व धान्य मिळावे म्हणून रयत सेवक को-ऑप. स्टोअर्सची स्थापना सन १९४२ साली केली. सन १९४०-४१ साली स्थापन केलेल्या. सौ. लक्ष्मीबाई पाटील स्मारक फंडाचे शिक्षणोत्तेजक सहकारी पतपेढीत रूपांतर करून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना कर्जाऊ रकमा शिक्षणासाठी देण्याची सोय सन १९५७ पासून करण्यात आली. माण तालुक्यात राजेवाडी तलावाशेजारची शेती करण्यासाठी सहकारी शेती संस्था व पिंगळीस मेंढ्यांचे पैदास केंद्र सुरू केले.

१३) छत्रपती शाहू बोर्डिंगला भाऊरावांच्या प्रयत्नाने बॅकवर्ड क्लास वसतिगृह म्हणून सन १९३४ साली मान्यता मिळाली होती. त्यास भाऊरावांची डिसेंबर १९२९ मधील श्री ओ. बी. एच. स्टार्ट कमिटीपुढील साक्ष कारणीभूत होती. या समितीपुढे अस्पृश्यांच्या शाळांचा व देवदासींच्या पुनर्वसनाचा व त्यांच्यामधील वेश्याव्यवसाय थांबविण्याचा प्रश्न त्यांनी आग्रहाने मांडला. हेच श्री. स्टार्ट बॅकवर्ड क्लास ऑफीसर झाल्यानंतर त्यांचेपुढे भाऊरावांनी बालगुन्हेगार कोर्टाकडील मुलांचा प्रश्न मांडला होता, कारण सन १९३७ पासून ते या बोर्डाचे सभासद होते. त्यांचे म्हणणे की, तुरुंगासमान बोर्स्टल स्कूल्स येरवड्याच्या शाळेत या बाल-गुन्हेगारांची सुधारणा होणार नाही. त्यांचे सहानुभूतीपूर्ण मुक्त वातावरणातच संगोपन व शिक्षण झाल्यास ते उत्तम नागरिक बनतील. या प्रयोगासाठी भाऊरावांनी या

बालगुन्हेगारांना छत्रपती शाहू बोर्डींग हाऊसमध्ये दाखल करण्यास सुरुवात केली. व या मुलामुलींतून उत्तम नागरिक बनवून दाखविले. छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसला मुक्त वातावरणात आल्यावर ही मुले पळून जाण्याचा विचार सोडून देत शेती, बागकाम, स्वयंपाक आदींमध्ये रमल्याने त्यांना शिक्षणाबरोबर खेळाचा व नवनिर्मितीचा आनंद मिळे. या मुलांपैकी अनेकजण द्विपदवीधर होऊन संस्थेत काम करीत आहेत. सन १९३८ सालीच छत्रपती शाहू बोर्डींग हाऊसला अशा गुन्हेगार मुलांसाठी सुधारगृह व शाळा म्हणून मान्यता मिळाली होती. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून तुटलेल्या या बालगुन्हेगारांस परत मूळ प्रवाहात आणणे ही फार मोठी जोखमीची समाजसेवा होती. ती भाऊरावांनी पार पाडली. मुलींच्या बाबतीत, वेश्याव्यवसाय किंवा तत्सम अनैतिक व्यवहारापासून त्यांना मुक्त करण्याची शिक्षण हीच गुरुकिल्ली असल्याचे त्यांचे मत होते. म्हणून मुलींना शाळेत पाठविण्यास व त्यांना सर्व सवलती मोफत देण्यावर त्यांचा भर होता. मुलींच्यासाठी पाच वेगळ्या स्वयंसेवी शाळा सुरू केल्या होत्या.

१४) धार्मिक बाबतीत भाऊराव धर्मभोळे किंवा अंधश्रद्ध नव्हते. या विश्वचक्राच्या मागे ईश्वर किंवा निर्मिक नावाची शक्ती आहे किंवा असावी असे ते मानीत. मात्र ते मूर्तिपूजक नसल्याने जैन मंदिरात जात नसत. जैन समाजाच्या अधिवेशनास ते हजर राहात. कर्मठ जैनांच्या प्रबोधनाद्वारे त्याच्यांत दीनदलित व अस्पृश्यांच्याप्रती प्रेम व सहानुभूती निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असे . त्याबरोबरच रयत शिक्षण संस्थेच्या कार्यास मदत मिळविण्याचा हेतू असे. सनातनी व अस्पृश्यता पाळणाऱ्या जैनांस जाहीरपणे ते वाक्ताडन करीत. हाच दृष्टिकोन मराठा व कर्मठ ब्राह्मण माणसांबद्दल त्यांचा असे. अठरापगड जातीस मराठा समाजानें आपणात मिळवून बृहन्मराठी समाज तयार करावा अशी त्यांची विशाल दृष्टी असल्याने आंतरजातीय विवाहास भाऊराव प्रोत्साहन देत. संस्थेत असे कांही विवाह त्यांनी घडवून आणले. सारांश, धार्मिक बाबतीत ते दुराग्रही नव्हते व पुरोहितकृत कर्मठ रूढी, आचारविचार व संस्कार यांच्या बाबतीत भाऊराव रूढीभंजक होते. मग हे पुरोहित, जैनातील असोत,

ब्राह्मणातील असोत किंवा मराठ्यातील असोत, त्यांच्या बाबतीत रूढीभंजक मानवतावादी दृष्टिकोन भाऊरावांचा होता. त्यासाठी संस्कारकेंद्रेही सुरू केली होती.

१५) आधुनिक महाराष्ट्राच्या शंभर निर्मात्यांमध्ये (प्रा. गं. बा. सरदार आदींनी संपादिलेल्या महाराष्ट्र जीवन, भाग २, पृ. ५६७) भाऊरावांचा समावेश करण्यात आला आहे. परंतु सामाजिक सुधारक म्हणून जेव्हा भाऊरावांचा विचार केला जातो, तेव्हा असे दिसते की महात्मा फुल्यांच्यानंतर विसाव्या शतकाच्या पहिल्या साठ वर्षात छत्रपती शाहू महाराज सोडले तर महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक कार्य करणाऱ्या समाजसेवकांमध्ये भाऊराव पाटील यांचे स्थान अत्युच्च होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय गतिमान होते. शिक्षण व सामाजिक क्षेत्रास त्यांनी दिलेले नेतृत्व अतुलनीय असेच होते. जवळ जवळ ४४ वर्षे ते महाराष्ट्रीय जनतेचे हृदयसम्राट होते. अनेक वेळा त्यांची कुचेष्टा करण्यास आलेले महाभाग त्यांच्या कार्यापुढे विनम्र होऊन, हात जोडून त्यांची स्तुती करू लागत. असा होता त्यांच्या कार्याचा महिमा. त्यांच्या अव्यभिचारी ध्येयनिष्ठेचा व अतुलनीय त्यागाचा हा परिणाम होता. त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वापुढे इतर सामाजिक सुधारक खुजे वाटतात. सुरवातीस अव्यवहार्य दिसणाऱ्या त्यांच्या कल्पना व विचार आकारास येताच मोठे अर्थशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ अचंबा व्यक्त करून आपल्या जिव्हेवर नियंत्रण ठेवीत. भाऊराव सत्य-अहिंसेचे पुजारी असले तरी अन्याय दिसताच नाठाळांचे माथी तुकोबारायाप्रमाणे काठी उगारण्यास ते मागेपुढे पाहत नसत. त्यांच्या हातातील काठी जणू त्याचे प्रतीक होते.

१६) पिळवणूकरहित एकसंध, एकात्म अशा भारतीय समाजनिर्मितीचे भाऊरावांचे ध्येय असल्याने त्यासाठी ते विविधांगाने झटत राहिले. ग्रामोद्धार व शिक्षण ही त्या ध्येयसिद्धीची आयुधे होती. या आयुधांच्या द्वारे लढत असताना त्यांचा गौरव होण्याचे अनेक प्रसंग आले.

१७) भाऊरावांचा पहिला गौरव लक्ष्मणराव किर्लोस्करांनी आपल्या २९-१०-१९२१ च्या पत्रात भाऊरावांचा राजीनामा

स्वीकारताना त्यांच्या **देशभक्तिपर सेवेचा** केलेला आहे. त्याच्या पुढील महिन्यात ८-१२-१९२१ रोजी नेर्ले येथे वसतिगृह सुरू करताना तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. एन. एल. मॉयसी यांनी भाऊरावांचा 'सत्यशोधक मिशनरी' म्हणून सत्कार केला आहे. भाऊरावांनी शैक्षणिक कार्यास व ग्रामोद्धार चळवळीस वाहून घेतल्यावर साताराचे जिल्हाधिकारी हमीद ए. अली सन १९३५ ते १९३८ च्या अहवालास प्रस्तावना लिहिताना भाऊराव, त्यांची रयत शिक्षण संस्था व छ. शाहू बोर्डिंग हाऊसबद्दल म्हणतात,

"It is one of India's most splendid activities. The great banyan tree under which Chhatrapati Shahu Boarding House has its life, is indeed an appropriate symbol of the work done by Mr. Bhaurao Patil and his Colleagues, and who can see that banyan tree and see Bhaurao without feeling that they are not alike but identical, the same burly flowing figure, the same indomitable will to spread for giving more and ever more a truly religious shade to all corners !"

(या प्रस्तावनेनंतरच रयत शिक्षण संस्थेचे बोधचिन्ह वटवृक्ष झाले.) त्यानंतर श्री. हमीद अलीनी म्हटले, "Here one sees the foundation being laid of the education that India wants. The success of Bhaurao's Work is a magnificiant justification of his un-conquerable faith and sacrifices and gives confidence in the fineness of humanity." (पृ. ४-५)

यानंतर भाऊरावांचा गौरव किर्लोस्करवाडीस सन १९३३ साली भरलेल्या तिसऱ्या ग्रामोद्धार सभेत, तेथे जमलेल्या प्रमुख नेत्यांकडून त्यांच्या ग्रामीण जनतेसाठी चाललेल्या कामाबद्दल अभिनंदनासह करण्यात आला आणि त्याच साली महाराज सयाजीराव गायकवाड (३ रे) यांनी छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस पाहून फार मोठा गौरव केला. याची माहिती पूर्वी दिलेली आहेच. (उक्त अहवाल, पृ. १३)

१८) यापूर्वी १९२६ साली ऑगस्ट महिन्यांत भाऊरावांच्या जीवन व कार्याचा त्रोटक परिचय श्री. के. सी. ठाकरे यांनी प्रबोधन मासिकातून केला होता. त्यांनी भाऊरावांना 'आदर्श समाजसेवक' म्हटल्याची आठवण धनंजय कीरांनी आपल्या चरित्रात दिली आहे. (पाहा बा. म. ठोकेकृत कर्मवीर भाऊराव पाटील, पृ. ६८) किर्लोस्करवाडीच्या ग्रामोद्धार परिषदेनंतरच भाऊरावांना कर्मवीर या उपाधीने जनतेने भूषविलेले दिसते. पण भाऊरावांना स्वत: 'रयतसेवक' म्हणवून घेणे पसंत होते. त्यामुळे संस्थेच्या सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग कॉलेजच्या सन १९४१-४२ अहवालात (पृ. ३२) प्रथम भाऊरावांना 'कर्मवीर' उपाधी लावण्यात आल्याचे दिसते. परंतु १९३४ पासून त्यांना काहीजण कर्मवीर म्हणत असल्याचे दिसते. (बा. म. ठोकेकृत कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र, पृ. १२८)

१९) १९४५ साली सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेसने भाऊरावांना एक लाखाची थैली देण्याचा ठराव कापील गावी साने गुरुजींच्या अध्यक्षतेखाली १३-५-१९४५ ला केला. त्यांत भाऊरावांचा महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील असा उल्लेख करण्यात आला आहे. पण 'रयतसेवक' ही उपाधी अगोदर देण्यात आली आहे. (डॉ. रा. अ. कडियाळकृत कर्मवीर भाऊराव पाटील, इंग्रजी चरित्र, पृ. ३०९)

२०) भाऊरावांचा म. गांधींनी छत्रपती शाहू बोर्डिंगच्या नामकरण विधीप्रसंगी गौरव केला होता. त्याचा पूर्वीच उल्लेख केलेला आहेच. यामुळे हरिजन सेवक संघाने रयत शिक्षण संस्थेस अनुदान देऊन भाऊरावांचा गौरव सन १९३३ साली केला.

२१) सन १९४५ साली मे महिन्याच्या २२ तारखेस कोल्हापूरच्या उद्यमनगर व शाहूपुरीच्या गूळ व्यापाऱ्यांनी भाऊरावांना रु. २५,१५१ ची थैली कोल्हापूरचे मंत्री नामदार गुलाबराव देशमुख यांच्या हस्ते देऊन त्यांचा भव्य सत्कार केला. (काटकरकृत कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र, पृ. ७०)

२२) भाऊरावांच्या दृष्टीने दोन गौरव समारंभ महत्त्वाचे होते.

भाऊरावांना संधिवाताच्या विकाराने अनेक प्रसंगी जागीच खिळून ठेवल्याने, संस्थेच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी त्यांना एक मोटार घेऊन देण्याचे ठरविले. त्यासाठी रु. ११ हजार जमविण्यात आले होते. तसेच सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेसने एक लाखाची थैली देण्याचे ठरवून सद्गुरू गाडगे महाराज यांच्या उपस्थितीत ता. २७ व २८ नोव्हेंबर १९४८ रोजी हे दोन्ही समारंभ उरकण्यात आले. महाराष्ट्रातल्या बहुजन समाजाच्या मुलांसाठी भाऊरावांनी आजपर्यंत काम केले, त्याची जाण विद्यार्थ्यांनी ठेवल्याने भाऊराव विद्यार्थ्यांच्या या कृतज्ञतेने भारावून गेले होते. हे समारंभ म. गांधींच्या हस्ते व्हावयाचे; पण नोवाखालीत उसळलेला जातीय दंगा थांबविण्यासाठी म. गांधींना जावे लागल्याने त्यांनी संदेश पाठविला की, "श्री भाऊराव पाटील की सेवा ही उनका सच्चा कीर्तीस्तंभ है। फिर भी छात्रोंने जो प्रवृत्ती की है, वह उनके लिये तो स्तुत्य है। श्री भाऊराव दीर्घ कालतक सेवा करते रहे।" (९-१-१९४८)

२३) सन १९४८-४९ मध्येच अहमदनगर जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्ष होत्या सौ. हिराबाई भापकर. त्यांनी भारतरत्न महर्षी अण्णासाहेब कर्वे, हरिजनसेवक काकासाहेब बर्वे व गुरुवर्य बाबुरावजी जगताप यांच्यासह भाऊरावांना, त्यांच्या प्रदीर्घ समाजसेवेबद्दल ता. १७-३-१९४९ रोजी संयुक्त मानपत्र देऊन गौरव केला. सन १९५७ साली भाऊरावांच्या शैक्षणिक कार्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी ग्वाल्हेरचे महाराज जिवाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या सुवर्ण महोत्सव फंडास महाराष्ट्र शासनाने रु. २ लाख दिले. मात्र भाऊरावांना हा फंड निर्माण करणे मान्य नव्हते. भाऊरावांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. हे जाणून सातारा जिल्हा लोकल बोर्डाने ता. २३ जुलै १९५८ रोजी मानपत्र दिले. आजारी अवस्थेतही भाऊराव या समारंभास हजर राहिले.

२४) ता. ३ नोव्हेंबर १९५८ रोजी भाऊराव किर्लोस्करवाडीच्या कारखान्याच्या सुवर्ण महोत्सव समारंभातील सत्कारास हजर राहिले. वाडीहून साताऱ्यास परतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने

त्यांना पुण्यास उपचारासाठी हलविण्यात आले. या किर्लोस्करवाडीच्या किर्लोस्करांच्या कारखान्यातील कामगारांनी सन १९५२ मध्ये ता. ११ मार्च रोजी नामदार डी. पी. करमरकर यांच्या हस्ते रु. २५ हजारांची थैली दिली होती व सत्कार केला होता.

२५) सन १९५८ मधील हा आजार शेवटचा होता. बाबुराव सणसांच्या बंगल्यावर भाऊरावांना ठेवून डॉ. बोधे त्यांच्यावर उपचार करीत होते. पण तो आजार वाढत चालला होता. २० नोव्हेंबरला त्यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. भारत सरकारच्या दप्तरी भाऊरावांच्या कार्याची नोंद सन १९४९ साली ३० सप्टेंबरला प्रा. हुमायून कबीर यांनी संस्थेस भेट दिल्यापासून होती. विशेषत: मौलाना आझाद व डॉ. आंबेडकर यांनी मध्यस्थी केल्याने महाराष्ट्र शासनाने संस्थेवरील अन्याय्य ग्रँटबंदी उठविली होती. नोव्हेंबर ५८ मध्ये भाऊराव अत्यवस्थ असल्याने ता. २६ जानेवारी ५९ रोजी भाऊरावांना राष्ट्रपतींनी पद्मभूषण हा किताब बहाल केला. त्यानंतर ५ एप्रिल १९५९ रोजी पुणे विद्यापीठाकडून भाऊरावांना सन्माननीय डी. लिट. पदवी रँग्लर डॉ. र. पु. परांजपे यांच्या हस्ते ससून हॉस्पिटलमध्ये देण्यात आली.

२६) ता. ६ मे १९५९ रोजी अहमदनगर येथे डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या हस्ते भाऊरावांना अहमदनगर जिल्ह्याने जमविलेले रु. १ लाख डॉ. धनंजयराव यांच्यामार्फत देण्यात आले. भाऊरावांना दवाखान्यातून हलण्यास डॉ. मोदींनी परवानगी दिली नव्हती. हा अहमदनगरचा सत्कार व गौरव समारंभ भाऊरावांच्या आयुष्यात शेवटचा ठरला. कारण ता. ९ मे १९५९ रोजी भाऊरावांनी ससून इस्पितळात वॉर्ड नं. ७ मधील बिछान्यावर शेवटचा श्वास घेऊन आपली इहलोकीची यात्रा संपविली. डॉ. चिंतामणराव सौ. दुर्गाबाई देशमुखांसह ता. ७ रोजी ससून इस्पितळात भाऊरावांना मृत्यूपूर्वी भेटले. सन १९५७ साली डॉ. देशमुखांच्या हस्तेच भाऊरावांचे डॉ. मॅथ्यूलिखित इंग्रजी चरित्र प्रसिद्ध झाले होते. भाऊरावांच्या मृत्यूने सारा ग्रामीण महाराष्ट्र हळहळला. साऱ्या प्रमुख वृत्तपत्रांनी त्यांच्यावर मृत्युलेख लिहिले. विशेषत: आचार्य अत्र्यांचा लेख हृदयस्पर्शी होता.

२७) भाऊरावांच्या वरील चरित्राकडे व कार्याकडे पाहिल्यानंतर असे दिसून येते की त्यांना सुखात लोळण्याची संधी असूनही त्यांनी हे समाजसेवेचे व लोकशिक्षणाचे व्रत स्वेच्छेने स्वीकारले होते. भाऊराव हे मानवतेचे पुजारी होते. भाऊरावांच्या काळात पारतंत्र्य हटविण्याचे दोन मार्ग होते. पहिला मार्ग राजकीय चळवळीचा व दुसरा मार्ग होता सामाजिक सेवेचा. भाऊरावांनी पणतीप्रमाणे मंदपणे, कणाकणाने जळून प्रकाश देण्याचे सामाजिक व शैक्षणिक कार्य स्वीकारले. त्यास प्रमुख कारण म्हणजे तत्कालीन सत्यशोधक समाजाची सामाजिक चळवळ व छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक प्रबोधनाची प्रेरणा. भाऊरावांचे समाजसुधारक म्हणून सर्वात मोठे कार्य कोणते? असा प्रश्न विचारल्यास त्यास उत्तर हे की, शिक्षण हे दास्यविमोचनाचे प्रभावी शस्त्र असून व्यक्तिगत व राष्ट्रीय उत्थानाची ती मोठी शक्ती आहे. याची जाण गरीब व अठराविश्वे दारिद्र्यात लोळणाऱ्या जनतेस त्यांनी करून दिली. हितसंबंधी लोक दास्यविमोचनाच्या कार्यात अडथळे आणतात तेव्हा शिक्षणाचा प्रसार करणे म्हणजे हा अडथळा नष्ट करणे होय. समाजातील सुशिक्षित व अशिक्षित यांतील द्वंद्व नष्ट करण्यानेच भारतीय समाज एकसंध होईल अशी त्यांची धारणा होती.

२८) भाऊरावांचा एक व्यक्ती म्हणून विचार करीत असताना त्यांच्या अंगी असलेल्या संन्यस्त वृत्ती व बंडखोरपणा या गुणांचे बारकाईने अध्ययन केल्यास असे दिसते की हे दोन गुण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांच्या संन्यस्त वृत्तीमध्ये, सत्याची आराधना, त्याग, साधेपणा व करुणा या गुणांचा अंतर्भाव होता. जनसेवेसाठी ही संन्यस्त वृत्ती राबवीत असताना त्यांची श्यामवर्ण धिप्पाड देहयष्टी पांढऱ्याशुभ्र दाढीने, शुभ्र खादीने, अनवाणी पायाने चालताना पाहून न्यायमूर्ती
डॉ. पी. बी. गजेंद्रगडकरांना भाऊरावांच्या ठिकाणी प्राचीन ऋषीचा भास झाला. डॉ. ध. रा. गाडगीळांनी भाऊरावांना यती म्हटलेच होते. अस्पृश्य, परित्यक्त, मातृपितृविहीन बालकांना पाहून त्यांची संन्यस्त वृत्ती करुणेचे रूप धारण करी व त्यांना मदत देऊन या करुणेत सहभागी होण्यास इतरांनाही ते भाग पाडीत. हा असा होता त्यांच्या संन्यस्त वृत्तीचा परिणाम.

२९) भाऊरावांचा बंडखोरपणा ही नाण्याची दुसरी बाजू. सत्यान्वेषी गुण हे त्याचे एक स्वरूप. अण्णासाहेब लठ्ठ्याविरुद्ध खोटी साक्ष देण्याचे नाकारून कोल्हापूर डांबर प्रकरणात व खुद्द लठ्ठ्यांच्या विरुद्ध बंड करून वसतिगृहाचा त्याग करण्यात हा सत्यान्वेषी गुण प्रगट झाला आहे. या बंडखोरपणातच सत्य अहिंसेचा त्यांनी पुरस्कार केला होता. जैनांनी अस्पृश्यता पाळणे व अस्पृश्यांना दूर राखणे म्हणजे जैनांच्या 'अभयदान' या तत्त्वाची व मानवतेची हिंसा आहे असे ते जैनांना व्याख्यानातून सांगत. ब्राह्मण किंवा मराठ्यांना अहिंसेचे व अस्पृश्यता न पाळण्याचे तत्त्व पटविताना त्यांनी शारीरिक बळाचा उपयोग केला नाही. औदुंबर किंवा सज्जनगड येथे प्रसादाची पंगत सर्वांच्यासाठी एक असावी म्हणून व्याख्यानाचा उपयोग केला, अनुयायांना सबुरीचा उपदेश केला, बळाचा नाही.

३०) रंजल्या गांजलेल्याची सेवा करण्यासाठी या सत्य-अहिंसायुक्त बंडखोरीचा उपयोग भाऊरावांनी केल्याचे दिसते. म्हणून 'कर्मवीर' उपाधीपेक्षा 'रयतसेवक' ही उपाधी त्यांना प्रिय होती व प्रत्येक पत्रात आपल्या सहीखाली 'रयत सेवक' उपाधी लिहीत. जनतेच्याकडून मिळणाऱ्या साहाय्यात ईश्वरीय प्रेरणा असल्याची त्यांची श्रद्धा होती. महात्मा फुले, महात्मा गांधी, सद्गुरू गाडगे महाराज या महामानवांच्या ठिकाणी त्यांना ईश्वरीय मोठेपणा जाणवत असे. स्वावलंबन व आत्मनिर्भरता ही ईश्वरीय देणगी आहे आणि शारीरिक कष्टातून कपाळावर उभे राहिलेले घामाचे मोती हा मानवाचा सर्वश्रेष्ठ अलंकार आहे असे ते मुलांना सांगत.

३१) सारांश, जनतेची सेवा करण्यासाठी महाराष्ट्रात जन्मलेले भाऊराव एक महामानव होते. त्यांनी जनतेचे मन व धन आपल्या निष्काम कृतीने मिळविले व ते तिच्याचसाठी वापरले. लोकशाही ही मानवतेचे अपत्य आहे. भाऊराव मानवतेचें व लोकशाहीचे मोठे भक्त होते. लोकशाहीसाठी लोकशिक्षणाचे सार्वत्रिकरण हा त्यांचा ध्यास होता. मात्र या लोकशिक्षणातून बुद्धिजीवी परोपजीवी वर्गही तयार होऊ नये म्हणून बुद्धी व श्रम यांची 'कमवा व शिका' योजनेत सांगड घालण्याचा प्रयत्न या महामानवाने नव्हे, महान समाजशिक्षकाने केला. अमेरिकेचे महान अध्यक्ष अब्राहम लिंकन हे

आपल्या मुलाच्या हेडमास्तरांना लिहितात, "सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात. नसतात सगळेच सत्यनिष्ठ. हे शिकेल माझा मुलगा कधी ना कधी. मात्र त्याला हे शिकवा, जगात प्रत्येक बदमाषांगणिक असतो एक साधुचरित पुरुषोत्तमही. स्वार्थी राजकारणी असतात जगात; तसे असतात अवघे आयुष्य समर्पित करणारे नेतेही. असतात टपलेले वैरी, तसे जपणारे मित्रही. सगळ्या गोष्टी झटपट नाही शिकवता येत, तरीही जमलं तर त्याच्या मनावर ठसवा - घाम गाळून कमावलेला एक छदाम आपल्याला मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान आहे. हार कधी स्वीकारावी हे त्याला शिकवा आणि विजयाचा आनंद संयमाने व्यक्त करायला.... त्याला द्वेष मत्सरापासून दूर राहायला शिकवा. शिकवा त्याला आपला हर्ष संयमाने व्यक्त करायला. गुंडांना भीत जाऊ नको म्हणावं. त्यांना नमवणं सोपं असतं. जमेल तेवढं दाखवीत चला त्याला ग्रंथभांडाराचं अद्भुत वैभव. मात्र त्याबरोबरच मिळू दे त्याच्या मनाला निवांतपणा."

अध्यक्ष लिंकन हे मानवाचे महान शिक्षक होते. आपल्या मुलाच्या रूपाने ते अमेरिकन तरुणांना पाहत होते.

३२) भाऊरावही महाराष्ट्राचे महान शिक्षक होते. अब्राहम लिंकनच्या वरील स्वरूपाचाच उपदेश ते आपल्या संस्थेतील तरुण शिक्षकांना करीत होते. यापूर्वी मी म्हटले आहेच की पॉल फेअरी या शिक्षणशास्त्रज्ञाने सामाजिक शिक्षकास लावलेली बिरूदावली "radical humanist liberator & educationist" भाऊरावांना तंतोतंत लागू पडते.

३३) असा हा महान समाजसुधारक, समाजाचा ऋषितुल्य शिक्षक सन १९५९ साली अंतर्धान पावला. आपल्यात समजूत आहे की दिवा विझण्यापूर्वी मोठा होतो, तसा हा महान समाजसुधारक मृत्यूपूर्वी अनेक पदव्या व सत्काराने मोठा व विभूषित होऊन, ग्रामीण शिक्षणाची नवी दिशा दाखवून, मोठ्या सन्मानाने आपल्यातून निघून गेला तो नांदणी मठाचा पीठाचार्य न बनता महाराष्ट्राच्या लोकशिक्षण पीठाचा आचार्य बनून.

■

प्रकरण तेरावे

# भाऊरावांचे कुटुंबीय

१) या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात भाऊरावांच्या कुटुंबात मातोश्री सौ. गंगाबाई, वडील पायगौडा, तिघे भाऊ व दोन बहिणी असल्याचे सांगितले आहेच. वडिलांच्या निवृत्तीनंतर या सर्वांना सांभाळण्याचे व त्यांना पोसण्याचे काम भाऊरावांवर येऊन पडले होते.

२) भाऊरावांचे वडील, बांध्याने सडपातळ, उंच व श्यामल वर्णाचे होते. त्यांचा नेहमीचा पेहराव, धोतर, बंद गळ्याचा शर्ट, क्वचित प्रसंगी कोट व त्यावर उपरणे आणि डोक्यास रुमाल असे. तशी त्यांची राहणी अति साधी होती. स्वभावाने कामसू, करारी व मितव्ययी होते. शेतकऱ्यांना शेतीत फळझाडे, विशेषत: आंब्याची झाडे लावण्यास उत्तेजन देत. व्यसन म्हणाल तर मित्रासमवेत चिलीम ओढण्यास त्यांना आनंद वाटे. किर्लोस्कर आणि ओगले यांच्याकडे भाऊराव किर्लोस्करवाडीस असेपर्यंत भाऊरावांकडे त्यांचे वास्तव्य होते. भाऊरावांनी सन १९२३ नंतर साताऱ्यात वसतिगृहाच्या कामात स्वत:ला झोकून दिल्यानंतर वडील जयसिंगपूरला आपल्या वकील असलेल्या तात्या नावाच्या मुलाकडे राहत. भाऊराव अधून मधून आपल्या आईवडिलांना भेटण्यास जयसिंगपूरला जात असत. भाऊरावांच्या लोकोपयोगी शैक्षणिक कामाचे महत्त्व सन १९३८ नंतर वडिलांना प्रकर्षाने जाणवू लागले होते. भाऊराव जयसिंगपूरला भेटीस आल्यावर पायगौंडा पाटील येण्याजाण्याचा भाडेखर्च

भाऊरावांस देत. सार्वजनिक पैसा स्वत:च्या प्रवासावर खर्च करू नये अशी भाऊरावांना त्यांची ताकीद असे. एका बाळंतपणाच्या प्रसंगी सौ. गंगाबाईंनी त्यांना सुईणीस बोलावून आणण्यास सांगितले होते. पण पायगौंडा पाटील आपली चिलीम ओढण्यात गर्क होते. सौ. गंगाबाई रागावल्यावर पायगौंडांनी चिलीम टाकून दिली. सुईणीस आणण्यास बाहेर पडले. त्या दिवसापासून त्यांनी पुन्हा चिलमीस हात लावला नाही. भाऊरावांबद्दल त्यांना सार्थ अभिमान होता. पायगौंडा पाटील एक सज्जन कुटुंबवत्सल गृहस्थ होते. सन १९४२ साली भाऊराव पाटील बडोद्यास असताना पायगौडा पाटील जयसिंगपूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे निधन पावले. भाऊराव धाय मोकलून रडले.

३) भाऊरावांच्या मातोश्री या कोल्हापूर संस्थानातील कुंभोज गावच्या चतुर्थ जैन घराण्यातील होत्या. या चतुर्थ जैनातील कर्मठपणा व स्पर्शास्पर्शसारख्या रूढीवर त्यांची श्रद्धा होती. पाणी भरताना ब्राह्मणाचा स्पर्श झाल्यास त्या घागर रिकामी करीत. उलट ब्राह्मण त्यांना आपल्या पाणवठ्यावर पाणी भरू देत नसत. पती पायगौंडा पाटलांच्या मानाने त्या ठेंगण्याच होत्या. मात्र नाकीडोळी निटस. गौर वर्णाच्या, अंगोपांगाने दणकट होत्या. दिसण्यात सुंदर आणि स्वभावाने कणखर व धाडसी होत्या. छत्रपती शाहू महाराजांपुढे आपल्या मुलाची कैफियत स्वत: समक्ष रथास आडवे जाऊन मांडण्याचे धैर्य त्यांनी दाखविले होते. भाऊरावांवर त्यांचा अतिशय जीव होता; तरी देखील आपल्या प्रिय पुत्राचे मरण सन १९५९ साली धैर्याने त्यांनी पचविले. भाऊरावांच्या मृत्यूनंतर २ वर्षांनी सन १९६१ साली वयाच्या ९६ व्या वर्षी गंगामातेने देह ठेवला.

४) भाऊरावांचे धाकटे बंधू तात्या भाऊरावांपेक्षा वयाने २ वर्षांनी लहान होते. मध्यम बांधा, श्याम वर्णाचे व सडपातळ होते. मॅट्रिक झाल्यानंतर आईवडिलांबरोबर भाऊरावांवर अवलंबून किर्लोस्करवाडीस राहत होते. या ठिकाणीच असताना त्यांच्या वडिलांनी जयसिंगपूरला जागा घेतली होती. तेथेच तात्यांनी कायमचे वास्तव्य केले. जयसिंगपूरला राहून कोल्हापूर संस्थानातील वकिलीची सनद मिळवून तेथेच शेवटपर्यंत वकिली

करीत राहिले. भाऊरावांइतकी तडफ किंवा सार्वजनिक कामात रस दाखविण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. वकील म्हणूनही फार मोठा लौकिक मिळविला असेही नव्हते. एक सामान्य विवाहित माणसाचे जीवन ते जगले. शर्ट, टोपी, धोतर व कोट हा त्यांचा पेहराव होता.

५) भाऊरावांचे तिसरे बंधू श्री. बळवंतराव किंवा बाळूकाका लग्न झाल्यानंतरही काही दिवस किर्लोस्करवाडीस वडील भावाकडेच राहत असत. मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी अबकारी खात्यात नोकरी पत्करली. चौतीस वर्षांच्या सेवेनंतर ते निवृत्त झाले व कोल्हापुरात स्थायिक झाले. ते मध्यम बांध्याचे, पण जाडजूडही नव्हते. वर्ण सावळाच होता. शासकीय सेवेत असल्याने शर्ट, पँट, कोट असा आधुनिक पेहराव असे. घरी धोतर वापरीत.

६) भाऊरावांचे धाकटे कनिष्ठ बंधू बंडेंद्र ऊर्फ बंडूकाका मध्यम बांध्याचे, सडपातळ, श्याम वर्णाचे होते. ते मॅट्रिकपर्यंतही शिकले नव्हते. पोलीस खात्यात त्यांनी नोकरी केली. शिक्षणासाठी किर्लोस्करवाडीस व त्यानंतर सन १९२४ पासून साताऱ्यास भाऊरावांकडे होते. साताऱ्यातील वसतिगृहातील पहिल्या चार मुलांपैकी ते होते. पोलीस जमादार होऊन ते निवृत्त झाले.

हे तिघे बंधू भाऊराव पाटलांना अतिशय मान देत, त्यांच्या आज्ञेचे त्यांनी कधी उल्लंघन केल्याचे ऐकिवात नाही.

भाऊरावांच्या मातोश्री गंगाबाई मात्र चारी मुलांकडे अधूनमधून राहत. भाऊरावांच्या मृत्यूसमयी त्या कोल्हापुरास बळवंतरावाकडे होत्या. भाऊरावांच्या गाडीचा ड्रायव्हर त्यांना ता. १० मे १९५९ ला कोल्हापुराहून घेऊन आला. हा उद्धव कामते ड्रायव्हर, केवळ ड्रायव्हरच नव्हता तर तो कर्मवीरांच्या कुटुंबापैकीच एक झाला होता. प्रवासात तो कर्मवीरांचा वैयक्तिक सहचर व सेवक होता. कर्मवीरांच्या मृत्यूने तोही घायाळ झाला होता.

७) कर्मवीर भाऊरावांच्या दोन बहिणींची लग्ने पायगौंडा पाटलांनीच उरकली होती. द्वारकाबाई ही बहीण कोल्हापूरचे प्रतिष्ठित

व्यापारी आदगौंडा पाटील यांना दिली होती. दुसरी बहीण ताराबाई कऱ्हाडचे नामवंत वकील श्री. एस. आर. ऊर्फ बाबासाहेब चौगुले यांना दिली होती. भाऊरावांची नातेवाईक मंडळी जैन असल्याने पूर्ण शाकाहारी होती. भाऊरावांच्या भावापैकी व मेव्हण्यापैकी कोणीही आज हयात नाहीत.

८) भाऊरावांचे लग्न सन १९०९ साली कुंभोज मुक्कामी झाले होते. भाऊरावांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई (माहेरचे नाव आदक्का). भाऊरावांचे वडील कोरेगावला असतानाच नांदावयास आल्या होत्या. त्यावेळच्या रूढीनुसार त्यांना स्वयंपाक आदी घरकामे सासूच्या मार्गदर्शनानुसार करावी लागत. सन १९२७ साली साताराला धनिनीच्या बागेत राहावयास जाईपर्यंत त्या आपला स्पर्शास्पर्शसंबंधीचा सनातन आचार बाळगून होत्या. कर्मवीरांची दुसरी मुलगी बेबी (सन १९२८ साली वारली) वसतिगृहातील मुलांच्या ताटातील अन्न खात असे किंवा वसतिगृहातील स्वयंपाकघरातील भाकरीचा तुकडा हातात धरून सौ. लक्ष्मीबाईच्या चुलीजवळ नेत असे. सौ. लक्ष्मीबाईच्या ठिकाणी असलेल्या जात, पंथ, धर्म आणि स्पर्शास्पर्शाच्या कल्पना या बेबीमुळे नष्ट झाल्या. त्या भाऊरावांच्या जात-धर्मनिरपेक्ष मानवतेच्या विचाराशी पूर्ण समरस झाल्या. त्या स्वत:च वसतिगृहाच्या मुलांना उत्तम स्वयंपाक करण्यास, कालवणास फोडणी देण्यास किंवा सणावारास गव्हाची खीर करण्यास शिकवू लागल्या. वसतिगृहातील मुलांचे आपल्या घरातील चुलीपर्यंत येण्यास, भांड्यास स्पर्श करण्यास त्या विरोध किंवा मज्जाव करीनाशा झाल्या.

९) या बदलास किर्लोस्करवाडीतील जातीनिरपेक्ष समारंभ व लग्नकार्यात, किर्लोस्कर पतीपत्नीची वागणूकही मार्गदर्शक ठरली होती. सौ. राधाबाई किर्लोस्कर यांच्यामुळेच त्या परधर्मीय पुरुषामार्फत स्वत:च्या पोटाचे ऑपरेशनही करून घेण्यास तयार झाल्या होत्या. त्या ता. ३०-३-१९३० रोजी साताराच्या सिव्हिल रुग्णालयात बाळंतपणात वारल्या. वसतिगृहातील मुले सौ. लक्ष्मीबाईंना वहिनी म्हणत. वहिनी वारल्या त्याच्या दुसऱ्या दिवशी पाडवा होता. मृत्युशय्येवर त्या भाऊरावांस म्हणाल्या, "आता मी जगत नाही. माझ्या जाण्याने वसतिगृहातील

पाडव्याचा सण थांबवू नका आणि मांझ्या अंत्ययात्रेस सर्व धर्माची मुले असू द्या आणि त्यांचेपैकीच चौघांनी माझी तिरडी आपल्या खांद्यावरून न्यावी."
या माऊलीने एके प्रसंगी वसतिगृहातील धान्य संपले असताना आपले परम पवित्र मंगळसूत्र गहाण ठेवून त्यातून आलेल्या पैशातून, वसतिगृहाच्या मुलांच्या तोंडी घास घातला होता. आपल्या पतीच्या कार्यात त्यांनी सर्वस्व ओतले होते. या सौ. लक्ष्मीच्या पोटी भाऊरावांना दोन अपत्ये किर्लोस्करवाडीस असताना झाली. पहिले आप्पासाहेब पाटील १९१७ साली जन्मले. दुसरे अपत्य म्हणजे कुमारी शकुंतला. ही सन १९१९ साली झाली. कर्मवीरांनी आपल्या हयातीत या दोघांची लग्ने उरकली होती. कर्मवीरांच्या हयातीनंतर संस्थेने आप्पासाहेब पाटलांवर संघटक पदाची जबाबदारी सोपविली आहे. कोल्हापूरच्या आप्पासाहेब देसाई या तरुण वकिलाशी शकुंतलेचे लग्न झाले होते. आप्पासाहेब देसाईंनी १९४१-४४ सालात छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसचे मानसेवी अधिक्षक म्हणून वकिली करीत काम पाहिले होते.

१०) कर्मवीर भाऊरावांच्या दिनचर्येविषयी लिहिताना सन १९२४ नंतरच्या आयुष्याचाच मी प्रामुख्याने इथे उल्लेख करीत आहे.

सन १९०९ ते १९१५ पर्यंतच्या त्यांच्या भर तारुण्याचा काळ निश्चित चाकोरीचा नव्हता. कोल्हापुरात असताना किंवा तत्पूर्वीची एकदोन वर्षे भाऊरावांच्या वैचारिक घडणीचा व त्या विचारांच्या प्रयोगाचा काळ म्हणावा लागतो; त्यासोबत उपजीविकेसाठी धडपडण्याचा काळ म्हणावा लागतो.

११) किर्लोस्करवाडीस असताना एक उद्योजकविक्रेता ही त्यांची भूमिका होती. त्या सोबत सत्यशोधक समाजाचा प्रभावी प्रचारक म्हणून हिंडत असल्याने सामाजिक विषमतेचे ते निरीक्षक होते. त्यांच्या भावी ध्येयाच्या चाचपणीचा हा काळ होता. येथेही सुनिश्चित अशी दिनचर्या ठरलेली नव्हती. परंतु सन १९२१ ते २३ ही तीन वर्षे भाऊरावांच्या आंतरिक तसेच बाह्य बदलाची वर्षे होती. महात्मा गांधींच्या प्रभावाखाली आल्यानंतर भाऊरावांनी पूर्णपणे स्वदेशीचे व्रत घेतले. खादीचा शर्ट,

खादीचे धोतर, खांद्यावर महात्मा फुल्याप्रमाणे घोंगडे व काही काळ जाडीभरडी घोंगडीची टोपी ते वापरीत. थंडीपासून संरक्षण म्हणून थंडीच्या दिवसांत भाऊराव लोकरीचे नेहरू जाकीट वापरीत.

१२) सन १९२४ साली साताऱ्यास आल्यावर भाऊरावांनी बाह्य वेषात आणखी बदल केला. डोक्यावरील टोपीचा त्याग केला. पायात वहाणा वापरण्याचे बंद केले व दाढी वाढविली. हा बाह्य साधेपणा त्यांच्या मानसिक शुचितेची व धारण केलेल्या व्रताची बाह्य चिन्हे होती. त्यांचे ध्येय व व्रत पुढील आयुष्यात १०० टक्के यशस्वी झाल्याचे दिसते. शरीराने ते आईप्रमाणे स्थूल व श्यामल रंगाचे होते. साताऱ्यात आल्यानंतर त्यांच्या दिनक्रमास विशिष्ट रूप प्राप्त झाले ते असे :

भल्या पहाटे उठून वसतिगृहातील मुले ज्या ज्या ठिकाणी भाड्याच्या घरात राहत तेथे जाऊन त्यांना प्रार्थना व अभ्यासास बसवून त्यांवर देखरेख करणे ही पहिल्या क्रमाची बाब होती. सन १९२७ साली धनिनीच्या बागेत वसतिगृह गेल्यावर या देखरेखीत काटेकोरपणा आला. जिल्ह्यात किंवा इतरत्र वसतिगृहासाठी धान्य गोळा करताना किंवा देणग्या मिळविताना दिवसात कधी जेवण मिळेल याची निश्चिती नसल्याने ज्या कोणा हितचिंतकाच्या घरी थांबले असतील तेथे आंघोळीनंतर अर्धी ते एक शिळी भाकर, तेल व चटणी अशी न्याहारी करीत. सोबत दही किंवा ताक मिळाल्यास त्यांना अधिक आनंद होई. या न्याहारीनंतर कधी कधी उपासही घडे.

१३) साताऱ्यात असताना सन १९३५ ते १९४५ या दरम्यान त्यांनी काढलेल्या शाखांना व वसतिगृहांना भेटी देणे व तेथील अडीअडचणी जाणून घेणे हा भाऊरावांचा नित्यक्रम असे. प्रथम पहाटेच छत्रपती शाहू बोर्डिंगच्या शाखा नं. १ व २ यांना पायी किंवा वसतिगृहाच्या छकड्यातून भेट देत असत. मुले कंदिलाभोवती बसून अभ्यास करतात ना, कोणी झोपी जात नाही ना, हे पाहत.

सोमवार पेठेतील संस्थेच्या कार्यालयात बसण्यापूर्वी त्यांची शिळ्या भाकरीची न्याहारी होत असे. दुपारच्या जेवणात त्यांना ताक फार आवडे. त्यासोबत ज्वारीच्या कण्यांची आंबील असल्यास ते अति खूष असत.

१४) सयाजीराव विद्यालय सुरू झाल्यानंतर सकाळी ९ ते १० च्या दरम्यान ते चार भिंती या संस्थेच्या डोंगरावर मुले शारीरीक श्रम करताना, डबर फोडून खडी तयार करताना किंवा जमिनीचे सपाटीकरण करताना पाहत थांबण्यात त्यांना धन्यता वाटे. कारण सपाटीकरण म्हणजे लाक्षणिक अर्थाने विद्यार्थीवर्गात असलेल्या भेदभावाचे समानीकरण वाटे, टेकाडावरील एकाद्या झाडाखाली थांबून राहात. येथील खडी, कच, तोडी, डबर शिवाजी महाविद्यालयाच्या, सयाजीराव हायस्कूलच्या इमारतीच्या कामी लावण्यात येत असे.

१५) रयत शिक्षण संस्थेच्या कामाची जसजशी लोकांत आणि शासनात जाण निर्माण होई तसतसे लोक, मंत्री व शासकीय अधिकारी भेटीस येत. त्यांना संस्थेच्या शाखेतील काम दाखविणे हेही त्यांच्या दिनचर्येचा भाग असे. सन १९३८ नंतर खेड्यापाड्यात साक्षरताप्रसारासाठी स्वयंसेवी प्राथमिक शाळा काढणे हाही त्यांच्या कामाचा भाग झाल्याने साताऱ्यातील संस्थांची जबाबदारी पदवीधर झालेल्या आपल्या अनुयायांवर सोपवून ते जिल्हाभर हिंडत, स्नेह्यांना मदतीसाठी भेटत, कोणी व्याख्यानास बोलाविल्यास जात. स्नेह्यांच्या मुलामुलींच्या लग्नास व इतर समारंभप्रसंगी प्रवासाची दगदग सोसूनही हजर राहात. हेतू दोन असत. एक, संस्थेस देणगी मिळविणे आणि जमल्यास आपल्या उपवधू झालेल्या तरुण सेवकांसाठी वधू शोधण्याचे काम करणे. साताऱ्यास परत आल्यावर या स्नेह्यांना, किंवा शासकीय अधिकाऱ्यांना वा मंत्र्यांना स्वत:च्या सहीने किंवा सचिवांच्या सहीने पत्रे लिहिणे हा आपल्या दिनचर्येचा आवश्यक भाग मानीत. उतारवयात तर ते 'चार भिंती'वर बांधलेल्या संस्थेच्या पत्र्यांच्या छोट्या शेडमध्ये राहत व संस्थेचे काम, विशेषत: तेथे असलेल्या वसतिगृहाकडे आणि तेथे लावलेल्या केळी-नारळीच्या बागेकडे पाहत वेळ व्यतीत करीत. याच चार भिंतीवर शेवटी त्यांनी चिरनिद्रा घेतली. आज तेथेच त्याची समाधी आहे.

■

## संदर्भ ग्रंथसूची


१) बागल मा. खं. (संपा.) : *सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ*, कोल्हापूर, शाहू सत्यशोधक ग्रंथ प्रकाशक मंडळ, १९३४.

२) डॉ. कडियाळ रा. अ. : *सत्यशोधक कै. नामदार भास्करराव जाधव यांचे जीवन व कार्य*, कोल्हापूर, इंदुमती प्रकाशन १९९०.

३) काटकर मा. भि. : *कर्मवीर भाऊराव पाटील*, सातारा, सौ. सरोजनी मा. काटकर प्रकाशन, १९८२.

४) जाधव, रा. बा. (संपा.) *कर्मवीर भाऊराव पाटील गौरव विशेषांक*, सातारा, ग्रामोद्धार प्रेस, २७ नोव्हेंबर, १९४८.

५) मोरे शं. शा. : *प्राथमिक शिक्षण*, पुणे, मोरे प्रकाशन, १९३७.

६) पळणीटकर चं. ह. : *पुरुषोत्तम (रा. रा. काळे चरित्र)*, सातारा, प्रकाशक स्वत:, १९३७.

७) पाटील पां. ग. : *कर्मवीरोपनिषद*, सातारा, प्रकाशक एन. डी. पाटील, १९६४.

८) डॉ. संगवे वि. अ. : *दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास* (१८९९-१९७५), सांगली, द. भा. जैन सभा, १९७६.

९) साळुंखे पा. बा. (संपा.) : *राजर्षी शाहू गौरव ग्रंथ*, मुंबई, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग मंत्रालय, १९७६.

१०) सरदार गं. बा. (संपा.) : *महाराष्ट्र जीवन, भाग १ व २*, पुणे - २, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, १९६०.

११) *श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, भाग १ व २*, मुंबई दामोदर सावळाराम आणि मंडळी, भाग १ - १९३६, भाग २ - १९३७.

१२) ठाकरे के. सी. : *माझी जीवनगाथा*, मुंबई-१४, सोमय्या पब्लिकेशन प्रा. लि. १९७३

१३) मद्वाण्णा य. दा. : *स्वर्गीय अण्णासाहेब लठ्ठे : जीवन व कार्य*, सांगली, लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, १९७९.

१४) ठोके बा. म. : *मला समजलेले कर्मवीर भाऊराव पाटील*, सातारा, प्रकाशक सौ. कमल बाबुराव ठोके, १९९३.

## शासकीय अहवाल

1) *A Review of Education in Bombay State* 1855-1955, Department of Education, Poona, Director, Govt. Printing, Publications and stationery, Bombay, 1958.
2) *Report on Public Instruction in the Bombay Province, 1939-40 & its supplement,* Bombay, superintendent Govt. Printing and Stationery, 1943.
3) *Quinqnennial Report on Public Instruction in Bombay, for 1942-47,* Vol. I & II, Bombay, Superintendent, Govt. Pinting and Stationery, 1950.
4) *Report of the Education Commission 1964-1965,* Govt. of India, Ministry of Education, New Delhi, Govt. of India Press, 1966.
5) *Report of the University Education Commission 1948-49 Vol.* I Delhi, Manager of Publications, Govt. of India, Simla, 1950.
6) *Papers Relating to Discipline and Moral Training in schools and colleges, Selections from the Records of the Govt. of India,* Home Department Sr. No. 8 Calcutta, superintendent Govt. Printing, 1890.
7) Abbot A. and Wood S. H. : Vocational Education in India, Govt. of India Press, Simla, 1937

## रयत शिक्षण संस्थेचे अहवाल

1) *Rayat Shikshan Sanstha, Satara, First Triennial Report for the years 1935-1938,* Baroda, B. S. Bartakke. Hon. Secretary, Arya Bhushan Press, Pune, 1939.
2) *Report of the Shri. Chhatrapati Shahu Boarding House,* Satara, for the years 1941-42, 1942-43, 1943-44 Satara, A. D. Desai, Hon. Superintendent, 1944.
3) *Report of the Shri. Chhatrapati Shahu Boarding House for the year 1944-45,* Satara, *R.* S. Patil, superintendent, 1945.
4) *Report on the working of the Silver Jubilee Rural Training College,* Satara, for the year 1940-41, Satara, K. S. Dixit, 1941.
5) ------- *For the year 1941-42* (Marathi) Satara, S. B. Sukhatankar, 1942.
6) *Rules and Regulations of the R. S. Sanstha* (n.d.)

## इंग्रजी ग्रंथ


1) Blaug M. (Ed.) : *Economics of Education 2 Vols.*, England, Penguin Books, 1969.
2) ______ : *An Introduction to the Economics of Education*, England, Penguin Books, 1970
3) Chintamani, C. Y. : *Indian Politics Since the Mutiny*, Waltaire, Andhra University, 1937.
4) Curtis S. J. : *An Introduction to the Philosophy of Education (2nd Ed.)* London University, Tutorial Press, 1968.
5) Freire Paulo : *Cultural Action For Freedom*, London Penguin Books (Reprint) 1975.
6) ______ *Pedagogy of the Oppressed, Trans.* M.B. Ramos, England, Penguin Books (Reprint) 1973,
7) Kabir Humayun : *Indian Philosophy of Education*, Bombay, Asia Publishing House, (Reprint) 1971.
8) Dr. Kadiyal R. A. : *Karmaveer Bhaurao Patil : His Contribution to Education in Maharashtra*, Kolhapur, Indumati Publication, 1987.
9) Limaye P.M. : *History of the Deccan Education Society*, Pune, D. E. Society, 1935.
10) Dr. Matthew Anjilvel V. : *Karmaveer Bharurao Patil : An Amazing story of Leadership and Organization in Rural Education*, Satara, R. S. Sanstha, 1957.
11) Mayhew, Arthur, *Education in India, (1835-1920)* London, Faber and Gwyer, 1926.
12) Pavate D. C. : *Memoirs of An Educational Administrator*, New Delhi, Prentice Hall Pvt. Ltd. 1964.
13) Stead H. G. : *Education of Community - Today and Tomorrow*, London, University of London Press, 1944.

...ग्रंथालय

संस्थेच्या महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक व उपप्राचार्य. सन १९६३ ते १९६९ संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाचे सभासद. सन १९६३ ते १९६८ कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात विधानसभेचे, कार्यकारिणीचे सभासद, सन १९६८ साली शिवाजी विद्यापीठात उपकुलसचिव. सन १९८३ साली कुलसचिव, १९८४ साली कुलसचिवपदावरून निवृत्त.

**ग्रंथसंपदा** - कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यावर इंग्रजीत पीएच. डी. चा प्रबंध, १९८०, १९८७ साली सदर ग्रंथ प्रकाशित, त्याच्या मध्यवर्ती शासनाने १०० प्रती घेतल्या.

सन १९८३ प्राथमिक शिक्षकांच्या उद्‌बोधनासाठी कर्मवीर भाऊराव पाटील पुस्तिका लिहिली. प्रकाशक इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे.

सन १९९० मध्ये कै. भास्करराव जाधव यांचे जीवन व कार्य हा ग्रंथ प्रकाशित. विविध मासिकांतून वैचारिक स्फुटलेखन व कथा प्रसिद्ध,

'एका अनामिकाची कहाणी' हा आत्मचरित्रपर ग्रंथ प्रसिद्धीच्या प्रतीक्षेत.

3